**अध्यक्ष महोदय,**

मी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १२५ आणि १२६ ई अन्वये सन २०१०-११ या आर्थिक वर्षाकरिता अर्थसंकल्प 'अ'(निधी संकेतांक-११,१२,६०,७०), 'ब' (निधी संकेतांक-२१,२२,२३) आणि 'ग' (निधी संकेतांक-४०) च्या बाबतीतील प्राप्ती, उत्पन्न आणि खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज स्थायी समितीस सादर करीत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेचा आयुक्त म्हणून प्रथमच मुंबई महानगरपालिकेचे अर्थसंकल्पीय अंदाज सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

देशातीलच नव्हे तर जगातील एका अग्रगण्य शहराच्या महानगरपालिकेच्या प्रशासनाचा प्रमुख म्हणून डिसेंबर-२००९ मध्ये मी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त पदाचा पदभार स्वीकारला त्यावेळी दोन प्रमुख समस्यांना मला सामोरे जावे लागले. त्यापैकी प्रमुख समस्या म्हणजे या वर्षी अपुऱ्या पावसामुळे मुंबईकर नागरिकांना भेडसावणारी पिण्याच्या पाण्याची समस्या आणि दुसरी म्हणजे महानगरपालिकेची चिंताजनक असलेली आर्थिक स्थिती.

**पाणी पुरवठयाची समस्या** :

पाणी हे जीवनदायी आहे परंतु त्याची उपलब्धता ही सर्वस्वी मोसमात पडणाऱ्या पावसाच्या प्रमाणावर अवलंबून आहे. मुंबई शहराला प्रतिदिन सरासरी ३४०० दशलक्ष लिटर पाणी पुरवठ्याची आवश्यकता आहे. मात्र, मागील वर्षाच्या ऑगस्ट महिन्यातील चार दिवस वगळता पावसाने संपूर्ण महाराष्ट्राकडे पाठ फिरविली. परिणामी, मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या व ऑगस्ट मध्यापर्यंत भरुन वाहणाऱ्या तानसा, वैतरणा, भातसा, अप्पर वैतरणा, विहार ह्या सर्व तलावांच्या पाणीसाठ्यात आवश्यक

असणाऱ्या पातळीपर्यंत वाढ झाली नाही. त्यामुळे, २३ ऑगस्ट ते २२ ऑक्टोबर या कालावधीत तलाव क्षेत्रात कृत्रिम पाऊस पाडून तलाव भरण्याचा प्रयत्न करण्यात आला. दरम्यानच्या काळात, काही प्रमाणात पुन्हा झालेला नैसर्गिक पाऊस व कृत्रिम पाऊस यामुळे तानसा व मोडक सागर या तलाव क्षेत्रात पाणी पातळीत काहीशी वाढ झाली. तथापि, मुंबई परिक्षेत्र वगळता ऑक्टोबर-नोव्हेंबर नंतर महाराष्ट्रात सर्वत्र अवकाळी पाऊस झाला, परिणामी मुंबई परिक्षेत्र मात्र कोरडेच राहीले. ऑक्टोबर नंतर पूर्णपणे पाऊस थांबल्यामुळे मुंबई शहराला पुढील वर्षाच्या जुलै अखेरपर्यंत आवश्यक तेवढा पाणी पुरवठा करण्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

पाणी प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन, नागरिकांमध्ये याबाबत सजगता निर्माण व्हावी यासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासनाचे अधिकारी व विभागातील नागरिक यांच्या विभागवार संयुक्त बैठका आयोजित करण्यात आल्या. दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या या प्रश्नाच्या तीव्रतेची प्रसारमाध्यमांनीही आवश्यक ती दखल घेऊन, बातम्या, लेख व अन्य प्रकारे या प्रश्नाचे गांभीर्य जनमानसात रुजविले व पाण्याच्या प्रश्नाबाबत जनजागृती करण्यात हातभार लावला.

दरम्यान, पाणी प्रश्न घेऊन झालेल्या आंदोलनाच्या अनुषंगाने घडलेल्या एक-दोन अप्रिय घटना वगळता, मुंबईकर जनतेची याबाबतची भूमिका ही अतिशय संयमाचीच राहिली आहे आणि या नैसर्गिक संकटाचा मुकाबला करण्यासाठी मुंबईकर जनतेची मानसिकता तयार झाली आहे याचा या ठिकाणी आवर्जून उल्लेख करणे आवश्यक आहे.

मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या तलावक्षेत्रात सध्या उपलब्ध असलेला पाणीसाठा हा पुढील पावसाळ्यापर्यंत पुरविण्याकरिता सावधगिरीचा उपाय म्हणून प्रशासनाने पाणीकपात करण्याचा निर्णय घेतला व सर्व लोकप्रतिनिधींनी त्यास अनुमती दिली.

मुंबईत निर्माण झालेल्या पाणी समस्येची महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन, जानेवारी महिन्यात भातसा व अप्पर वैतरणा धरणाच्या निभावणी साठ्यातून १९९ टि.एम.सी. इतके पाणी मुंबई शहराला उपलब्ध करुन दिले आहे. मुंबईतील पाणी समस्येबाबत मुंबईकर जनता, महाराष्ट्र शासन, मुंबई महानगरपालिकेचे सर्व नगरसेवक यांनी प्रशासनास आतापर्यंत जे सहकार्य केले आहे त्याबद्दल मी या सर्वांचे आभार मानतो.

**महापालिकेची आर्थिक स्थिती**

सन २००९-१० चे अर्थसंकल्पीय अंदाज स्थायी समितीला सादर करताना तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांनी आपल्या निवेदनात महापालिकेच्या विद्यमान व भविष्यातील आर्थिक स्थितीवर सविस्तर भाष्य केले होते. त्यावेळी जागतिक आर्थिक मंदीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे परिणाम मुंबई महापालिकेच्या वित्त व्यवस्थेवर आणि अंतिमत: तिने हाती घेतलेल्या आणि हाती घेणार असलेल्या प्रकल्पांवर, कामांवर होऊ शकतो असे सूचित केले होते. तसेच महापालिकेच्या महसुली उत्पन्नाचा एक प्रमुख स्त्रोत असलेल्या जकात संकलनामध्ये अशा मंदीच्या काळात मोठ्या प्रमाणात घट होऊ शकते अशी शक्यताही वर्तविली होती. त्याचबरोबर एकीकडे अंदाजित उत्पन्न कमी होण्याची शक्यता आहे, तर दुसरीकडे खर्चाचा बोजा मात्र वाढलेला आहे हेही विशेषत्वाने नमूद केले होते. महापालिकेतील कर्मचारीवृंदाला सुधारित वेतनश्रेण्या लागू केल्याने आस्थापना खर्चात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे व आगामी वर्षात त्यात अतिरिक्त वाढ होण्याची शक्यताही वर्तविण्यात आली होती. त्यामुळे सीमित उत्पन्नाच्या मर्यादेत प्रकल्प कामांसाठी मोठ्या प्रमाणात तरतूद करावयाची ठरविल्यास महापालिकेच्या आर्थिक स्थितीवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो असेही नमूद केले होते.

सन २००९-१० चे सुधारित अंदाज व २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांबाबत सविस्तर विवेचन करण्यापूर्वी महापालिकेच्या सध्याच्या आर्थिक स्थितीच्या अनुषंगाने काही बाबींवर पुन:श्च भाष्य करणे मला आवश्यक वाटते. गतवर्षी महापालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत जी साधार भीती अधोरेखीत केली होती ती थोड्याफार प्रमाणात खरी ठरल्याचे निदर्शनास येते. जागतिक मंदीच्या पार्श्वभूमीवर मुंबई महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नाचा एक प्रमुख स्त्रोत असलेल्या 'जकात' या स्त्रोतापासून मिळणाऱ्या महसुली उत्पन्नात या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीच्या ६ महिन्यांच्या कालावधीत निदर्शनास आलेली लक्षणीय घट, सन २००९-१०चे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना भांडवली खर्च भागविण्यासाठी महसुली लेख्यांतून कोणत्याही प्रकारचे न देता आलेले अंशदान, सन २००९-१०चा रु.५९७५.१८ कोटी एवढा भांडवली खर्च भागविण्यासाठी प्रामुख्याने अंतर्गत निधीमधून करावी लागलेली कर्जउभारणी आणि दीर्घकालीन धोरणाचा भाग म्हणून ठेवलेल्या विशेष निधींमधून रु.२४७०.५० कोटी एवढ्या मोठ्या प्रमाणावर काढावी लागलेली जवळजवळ सर्वच रक्कम तर दुसऱ्या बाजूला दि.१.४.२००५ च्या पूर्वलक्षी प्रभावाने सहाव्या वित्त आयोगाच्या धर्तीवर महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू केल्याने आस्थापना खर्चात प्रतिमाह होणारी असाधारण वाढ, सन २००९-१० या वर्षात पार पडलेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकींच्या अनुषंगाने लागू करण्यात आलेल्या आचारसंहितेच्या कालावधीत नवीन प्रकल्प कामांच्या निविदा न मागविता आल्याने व इतर अन्य कारणांमुळे काही खात्यांच्या प्रकल्पकामांच्या विद्यमान कंत्राटातील मोठ्या प्रमाणावर झालेले फेरफार व त्यामुळे महानगरपालिकेवर आलेले मोठ्या प्रमाणावरील आर्थिक दायित्व अशा पार्श्वभूमीवर महापालिकेच्या सद्य व भविष्यातील आर्थिक स्थितीचा आढावा घेणे क्रमप्राप्त झाले होते.

या अनुषंगाने आर्थिक काटकसरीच्या उपाययोजनांसंबंधातील परिपत्रक प्रसृत करण्यात आले. त्याचबरोबर महापालिकेची सद्य व भविष्यातील आर्थिक स्थिती स्थायी समितीला अवगत व्हावी या दृष्टीकोनातून आर्थिक स्थितीबाबतचा अहवाल स्थायी समितीच्या माहितीकरिता सादर करण्यात आला. सदर अहवाल अद्यापही स्थायी समितीच्या विचाराधीन आहे.

काटकसरीच्या उपाययोजनांसंबंधातील परिपत्रकात, किरकोळ कामे कंत्राटदारांकडून पार पाडावयाच्या कामांमध्ये २५% बचत सुचविली होती व अन्य महसुली खर्चामध्ये १०% बचत सुचविली होती. या दोन्हींपासून अंदाजे रु.४०० ते ४५० कोटींची खर्चात बचत अपेक्षित होती. महापालिकेच्या सन २००९-१० मधील आर्थिक स्थितीबाबत स्थायी समितीसमोर ठेवण्यात आलेल्या अहवालावर सविस्तर चर्चा स्थायी समितीत झाली. या बैठकीच्यावेळी माननीय स्थायी समिती सदस्यांनी महसुली अर्थसंकल्पीय तरतुदीतून प्रस्तावित २५% बचतीस तीव्र आक्षेप घेतला व ही कपात पूर्णपणे रद्द करावी असा आग्रह धरला. सविस्तर चर्चेअंती मी सन्माननीय नगरसेवकांनी व्यक्त केलेल्या भावनांचा विचार करुन सद्य:स्थितीत 'विभागविकास निधी' व 'नगरसेवक निधी' या संदर्भात ही २५% बचतीची अट लागू होणार नाही असा निर्णय जाहीर केला आहे व या निर्णयाबाबत सर्व संबंधितांना अवगत करण्यासाठी परिपत्रक प्रसृतही करण्यात आले आहे.

## २. अर्थसंकल्पीय सुधारणा

### २.१ फलश्रुतीवर आधारित अर्थसंकल्पाबाबतच्या कामाची उल्लेखनीय प्रगती

सन २००९-१० च्या अर्थसंकल्पीय अंदाजांवरील माझ्या निवेदनामधील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या फलश्रुतीवर आधारित अर्थसंकल्पासंबंधीच्या प्रकल्पाच्या अनुषंगाने मला आपणास अवगत करण्यास आनंद होत आहे की, आपण गेल्या वर्षामध्ये फलश्रुतीवर आधारित अर्थसंकल्पासाठी

प्रतिमान विकसित करण्यामध्ये यशस्वी झालो आहोत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व १९ खात्यांमधील उपक्रमांची प्रगती आणि कामगिरीचे मोजमाप करण्याकरिता आऊटपूट बेस्ड परफॉर्मन्स इंडिकेटर्स आणि आऊटकम बेस्ड परफॉर्मन्स इंडिकेटर्स या प्रकल्पाचे सल्लागार 'सोसायटी फॉर डेव्हलपमेंट स्टडीज (एस.डी.एस.)` यांनी संशोधन कामाच्या आधारावर तयार केलेले आहेत. सल्लागारांनी याबाबत तयार केलेल्या संपूर्ण अहवालाचा अभ्यास करण्यात येत असून या अहवालावर सखोल चर्चा झाल्यावर व महापालिका प्रशासनाने तो अंतिमत: स्वीकारल्यावर त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही केली जाईल.

डाटाबेसचा दर्जा आणि त्याचे व्याप्तीक्षेत्र या बाबतीत मोठया प्रमाणात सुधारणा करावयाच्या बाकी असल्या तरीसुध्दा डाटा निर्मिती, प्रचालन नोंदी, कामगिरी पार पाडताना येणारे अडथळे (Road Blocks) व कामगिरी या बाबींकडे, सर्वसाधारणपणे अद्यापि जिथे योग्य प्रमाणात लक्ष दिले जात नाही, अशा शासकीय यंत्रणेच्याबाबतीत ही निश्चितच उल्लेखनीय कामगिरी आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील प्रचालनाच्याबाबतीत व्यापक आणि विश्वासार्ह डाटाबेस विकसित करण्यामध्ये उद्‌भवणाऱ्या मोठया अडथळयांचे सन २०१०-११ मध्ये प्रभावीपणे निराकरण करण्यात येईल असा मला विश्वास वाटतो.

## २.२ कार्यान्वित केलेला आऊटकम रोडमॅप

कामगिरीची पातळी समाधानकारक नसलेल्या प्रकरणी फलश्रुतीवर आधारित अर्थसंकल्पाकरिता संबंधित वर्षामध्ये हाती घेतलेल्या चार पथदर्शी खाते कार्यक्रमांच्याबाबतीतील महत्त्वाचे अडथळे आणि त्यामागील कारणात्मक घटक शोधण्यात आले आहेत.

तसेच आपल्या कार्यक्रमांच्याबाबतीत वर्षानुवर्षे प्रकर्षाने वारंवार परिवर्तित होणाऱ्या उपक्रमांची आपण छाननी केली आहे. अशा बाबी या बाबतीतील अडथळे आणि ते निवारण्याकरिता केलेल्या उपाययोजना नोंदल्या न गेल्यामुळे तसेच नंतरच्या वर्षांमध्ये कार्यक्रम नियोजन आणि अर्थसंकल्पीय उपक्रम यांच्यामध्ये मूलभूत स्वरुपाचे परिणाम प्रतिबिंबित न झाल्यामुळे निर्माण होत असतात. आपल्या शहर नियोजन आणि कार्यक्रम चौकटीमधील प्रचालनाच्या बाबतीतील अडथळे निश्चित करण्यासाठी आपण सन २००९-१० मध्ये सद्य:स्थितीत मर्यादित स्वरुपात का होईना पण अशी प्रक्रिया सुरू केली आहे.

## २.३ सन २०१०-११ साठी आऊटकम वर्क प्लॅन

फलश्रुतीवर आधारित अर्थसंकल्पामधील अडथळयांच्या निराकरणाकरिता आणि सॅपकरिता तांत्रिक आणि वित्तीय अशा दोन्ही अधिकारी वर्गाच्या क्षमता वाढीसाठी सन २०१०-११ मध्ये संनियंत्रण आणि मूल्यमापन पध्दती (Monitoring and Evaluation System) हाती घेण्यात येईल.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये फलश्रुतीभिमुख एकात्मिक प्रकल्प नियोजन, अर्थसंकल्पन आणि व्यय संनियंत्रण प्रणाली यांची प्रस्थापना करण्यासाठी व त्यांच्या प्रगतीवर देखरेख करण्याकरिता आपण **आऊटकम ॲडव्हायझरी बोर्ड** स्थापन करणार आहोत व त्याकरिता निधीचीही तरतूद केली आहे. माझ्या अध्यक्षतेखालील सदर मंडळामध्ये महाराष्ट्र शासन, भारत सरकार यांचे प्रतिनिधी, महापालिकेतील सर्वपक्षीय नगरसेवक प्रतिनिधी व आऊटकम प्रक्रियेच्या क्षेत्रातील स्वतंत्र तज्ञ यांचादेखील समावेश करण्यात येईल. या मंडळाला सर्व खात्यांमधील 'मॉनिटरिंग अँड इव्हॅल्युएशन सेल' सहाय्य करतील व त्यांच्या कामगिरीचे समन्वयन वित्त खात्यामधील **आऊटकम सेल** करेल. मी ही नवीन आऊटकम पध्दती सन २०१०-११ च्या पहिल्या तिमाहीमध्ये पूर्णपणे कार्यान्वित करण्याचे योजिले आहे.

## २.४ बृहन्मुंबईसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आऊटकम्स

शहर नियोजन, कार्यक्रमांचा विकास, अर्थसंकल्पन आणि कार्यक्रम व्यवस्थापन यांच्याबाबतीत उत्तमरित्या विकसित केलेल्या फलश्रुतीवर आधारित दृष्टीकोनामुळे बृहन्मुंबईतील जनतेला महापालिकेच्या सेवांच्या बाबतीतील अंतिम स्वरुपाच्या फलश्रुती प्राप्त व्हाव्यात अशी आपली अपेक्षा आहे, ज्याच्या परिणामस्वरुप उच्च दर्जाची उत्पादकता आणि उत्पन्न यात व आपल्या या महान शहरातील नागरिकांच्या जीवनमानाच्या दर्जात मोठया प्रमाणात सुधारणा होऊन मुंबई हे एक जागतिक दर्जाचे शहर बनेल अशी आपण अपेक्षा बाळगू शकतो. यामुळे मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी म्हणून तिला असलेली राष्ट्रीय स्तरावरची मान्यता भावी काळात टिकवून ठेवेलच परंतु त्याचबरोबर ती जागतिक आर्थिक केंद्रदेखील बनेल आणि जागतिक दर्जाचे शहर म्हणून देखील तिला सार्वत्रिक मान्यताही मिळेल अशी मला खात्री आहे.

३. अर्थसंकल्पीय अंदाज ‘अ’ (निधी संकेतांक -११,१२,६०,७०) , ‘ब’(निधी संकेतांक -२१,२२,२३) , ‘ई’(निधी संकेतांक -३०) , ‘ग’(निधी संकेतांक -४०) आणि ‘वृक्ष प्राधिकरण’ (निधी संकेतांक -५०) यांचे आकारमान आणि त्यामधील महसुली लेखे आणि भांडवली लेखे यांचा गोषवारा पुढील तक्त्यात नमूद केला आहे. तसेच या बाबतची सविस्तर माहिती पृष्ठ क्र.१३१ ते १३५ वरील परिशिष्ट १ ते ५ मध्ये देण्यात आली आहे.

**अर्थसंकल्पीय अंदाज ‘अ’ (निधी संकेतांक -११,१२,६०,७०), ‘ब’ (निधी संकेतांक -२१,२२,२३), ‘ई’(निधी संकेतांक -३०), ‘ग’ (निधी संकेतांक -४०) आणि ‘वृक्ष प्राधिकरण’ (निधी संकेतांक -५०) चे आकारमान**

(रुपये कोटीत)

| **तपशील** | **अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-११** | |
|---|---|---|
| | **उत्पन्न / प्राप्ती** | **खर्च** |
| महसुली उत्पन्न | १२७८६.६१ | |
| महसुली खर्च | | १२८२९.८० |
| भांडवली प्राप्ती | ८२५०.९२ | |
| भांडवली खर्च | | ८२३९.०२ |
| **एकूण** | २१०३७.५३ | २१०६८.८२ |
| **वजा : भांडवली लेख्याला** | ६५१.५१ | ६५१.५१ |
| **एकूण** | २०३८६.०२ | २०४१७.३१ |
| **उत्पन्नापेक्षा जास्त होणारा खर्च (आरंभीच्या शिल्लकेतून भागविला जाईल)** | ३१.२९ | ... |
| **अर्थसंकल्पीय अंदाजांचे आकारमान** | **२०४१७.३१** | **२०४१७.३१** |

**महसुली लेखा - अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग' आणि 'वृक्ष प्राधिकरण'**

(रुपये कोटीत)

| निधी संकेतांक | तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-११ |
|---|---|---|
| दिनांक १ एप्रिल रोजीची आरंभीची शिल्लक | | ५३.५८ |
| **महसुली उत्पन्न** | | |
| ११ | सर्वसाधारण अर्थसंकल्प | ९२०६.४३ |
| १२ | आरोग्य अर्थसंकल्प | १२६.६५ |
| २१ | सुधार योजना | १८३.२० |
| २२ | गलिच्छ वस्ती निर्मूलन | ४.६६ |
| २३ | गलिच्छ वस्ती सुधारणा | १४९.७९ |
| ३० | शिक्षण अर्थसंकल्प | १६२२.७९ |
| ४० | पाणी पुरवठा व | २८९८.६१ |
| ५० | वृक्ष प्राधिकरण | २१.०८ |
| ६० | भविष्य निर्वाह निधी | ५८.५५ |
| ७० | निवृत्ती वेतन निधी | २०३३.४५ |
| | एकूण उत्पन्न | **१६३०५.२१** |
| | वजा : अर्थसंकल्पांतर्गत | **३५१८.६०** |
| | नक्त उत्पन्न | **१२७८६.६१** |
| **महसुली खर्च** | | |
| ११ | सर्वसाधारण अर्थसंकल्प | ७८६१.२० |
| १२ | आरोग्य अर्थसंकल्प | १४७१.४५ |
| २१ | सुधार योजना | १८३.२० |
| २२ | गलिच्छ वस्ती निर्मूलन | ४.६६ |
| २३ | गलिच्छ वस्ती सुधारणा | १४९.७९ |
| ३० | शिक्षण अर्थसंकल्प | १६२२.७९ |
| ४० | पाणी पुरवठा व | २८९८.६१ |
| ५० | वृक्ष प्राधिकरण | ६४.७० |
| ६० | भविष्य निर्वाह निधी | ५८.५५ |
| ७० | निवृत्ती वेतन निधी | २०३३.४५ |
| | **एकूण खर्च** | **१६३४८.४०** |
| | **वजा : अर्थसंकल्पांतर्गत अंशदाने** | **३५१८.६०** |
| **नक्त खर्च** | | **१२८२९.८०** |
| **दिनांक ३१ मार्च रोजीची अखेरची शिल्लक** | | **१०.३९** |

## भांडवली लेखा - अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग' आणि 'वृक्ष प्राधिकरण'

(रुपये कोटीत)

| निधी संकेतांक | तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-११ |
|---|---|---|
| दिनांक १ एप्रिल रोजीची आरंभीची शिल्लक | | १३१.९० |
| **भांडवली प्राप्ती** | | |
| ११ | सर्वसाधारण अर्थसंकल्प | ४६१५.४१ |
| २१ | सुधार योजना | ८२.५५ |
| २३ | गलिच्छ वस्ती सुधारणा | ११.४५ |
| ३० | शिक्षण अर्थसंकल्प | १६८.९१ |
| ४० | पाणी पुरवठा व मलनि:सारण | ३३७२.६० |
| | **एकूण** | ८२५०.९२ |
| **भांडवली खर्च** | | |
| ११ | सर्वसाधारण अर्थसंकल्प | ४१९६.७४ |
| १२ | आरोग्य अर्थसंकल्प | ४१८.४६ |
| २१ | सुधार योजना | ६९.०७ |
| २३ | गलिच्छ वस्ती सुधारणा | १२.११ |
| ३० | शिक्षण अर्थसंकल्प | १६९.२२ |
| ४० | पाणी पुरवठा व मलनि:सारण | ३३७१.५२ |
| ५० | वृक्ष प्राधिकरण | १.९० |
| | **एकूण** | **८२३९.०२** |
| **दिनांक ३१ मार्च रोजीची अखेरची शिल्लक** | | **१४३.८०** |

## ४. सन २००९-१० मधील उल्लेखनीय कामगिरी

सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पाचा ऊहापोह करण्यापूर्वी मी सन २००९-१० मधील महत्त्वाच्या घटना आणि कामगिरी यांचा आढावा घेऊ इच्छितो. सन २००९-१० च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये खालील उद्दिष्टांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले होते.

१) नागरी पायाभूत सुविधांचे बळकटीकरण

२) सामाजिक पायाभूत सुविधांची आणि सुखसोयींची दर्जोन्नती

३) स्वच्छता आणि शहर पर्यावरणामध्ये सुधारणा

४) शहराचे सुशोभिकरण आणि पर्यटन स्थळांची निर्मिती

५) आपत्कालीन व्यवस्थापन आणि आपत्कालीन व्यवस्थेच्या पूर्व तयारीमध्ये सुधारणा

६) नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा आणि सोयींमध्ये सुधारणा

७) संस्थांतर्गत सुधारणा आणि पुनर्रचना

८) समाज कल्याण (महिला व बालकल्याणासह)

९) महानगरपालिका मालमत्तांची सुधारणा, व्यवस्थापन आणि परिरक्षण

१०) सामाईक सेवा आणि संकीर्ण उपक्रम

त्यानुसार पुढे संक्षिप्तपणे नमूद केलेले विविध प्रकल्प सन २००९-१० मध्ये हाती घेण्यात आले आणि ते पूर्ण करण्यात आले आहेत.

**४.१ पर्जन्य जलवाहिन्यांची सुधारणा आणि त्यामधील गाळ काढणे**

दिनांक २६ जुलै, २००५ रोजी मुंबईत निर्माण झालेल्या पूर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य शासनाने पूर परिस्थितीची कारणे शोधण्यासाठी आणि भविष्यात असे प्रसंग

टाळण्याकरिता डॉ. माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधन समितीची नियुक्ती केली होती. या सत्यशोधन समितीच्या शिफारशींची पूर्तता करण्याकरिता खालील कामे प्राधान्याने हाती घेण्यात आली होती.

१. पावसाळयात मुंबई शहर आणि उपनगरात पाणी साचून नागरिकांना त्याचा उपद्रव होऊ नये आणि जनजीवन सामान्य रहावे या करिता पावसाळा सुरु होण्यापूर्वी मुंबईतील नाल्यांच्या तळपातळयांपर्यंत नाला व्यवस्थेतील गाळाचा उपसा करण्यात आला.

**गाळ उपसण्याच्या कामाबाबत दि. १४.०६.२००९ ची स्थिती दर्शविणारा तक्ता**

| अनु क्र. | नाला व्यवस्था (मोठे नाले) | काम करण्यात आलेल्या नाल्यांची लांबी (कि. मी. मध्ये) | २००९ चा पावसाळा सुरु होण्यापूर्वी काढलेल्या गाळाचे परिमाण (क्युबिक मीटर ) | २००९ चा पावसाळा सुरु होण्यापूर्वी गाळ काढण्याच्या कामाची परिमाणानुसार टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | शहर (मोठे आणि छोटे नाले) | ८०.७५५ | ९०२७० | ९९.१७% |
| २. | शहर (मनुष्य प्रवेश नसलेल्या प.ज.वा.) | २९.२३५ | ३५४०० | ९९.२३% |
| ३. | पश्चिम उपनगरे (मोठे नाले) | ११२.४८० | २१६४४६ | ९९.८६% |
| ४. | पूर्व उपनगरे (मोठे नाले) | ७०.२९९ | १३८५६५ | ९९.५०% |

२. हाजी अली, लव्ह ग्रोव्ह, क्लीव्ह लँड बंदर व ईर्ला इत्यादी ठिकाणी समुद्राच्या पातमुखांवर यांत्रिकी, विद्युत, यंत्रचलित उपकरणे यांचा पुरवठा, उभारणी व प्रस्थापनेसह उदंचन केंद्राची संरचना व बांधकाम आणि सर्वंकष प्रचालन व परिरक्षण करण्याची कामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांपैकी हाजी अली व ईर्ला येथील पर्जन्य जल उदंचन केंद्राची कामे प्रगतीपथावर असून ही कामे ७० टक्क्यांपर्यंत पूर्ण झाली आहेत.

३. शहर विभागातील ब्रिटानिया पातमुख, पट्ठे बापूराव मार्ग आणि डॉ. ई. मोझेस रोड येथील जुन्या कमानी / पेटिका वाहिन्यांचे स्थितीदर्शक सर्वेक्षणाचे काम पूर्ण झालेले आहे आणि या वाहिन्यांच्या प्रत्यक्ष पुनर्वसनाच्या कामासाठी निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

४.२
**ब्रिमस्टोवॅड प्रकल्पासाठी केंद्र शासनाचे अर्थ सहाय्य**

या कामाकरिता भारत सरकारने रु.१२०० कोटी इतके अर्थ सहाय्य देण्याचे मान्य केले आहे. रु. १२००कोटींपैकी रु.४०० कोटींची रक्कम सन २००७-०८ मध्ये प्राप्त झालेली आहे आणि रु.१०० कोटींची रक्कम सन २००८-०९ मध्ये प्राप्त झालेली आहे. उर्वरित रक्कम हप्त्याने कामांच्या प्रगतीनुसार

प्राप्त होणे अपेक्षित आहे. सन २००९-१० या चालू आर्थिक वर्षात रु.५०० कोटी एवढा निधी अनुदान स्वरुपात मिळण्याकरिता केंद्र सरकारच्या नगरविकास खात्याकडे पत्रव्यवहार केला असून, सदर अनुदान मिळणे अपेक्षित आहे. ब्रिमस्टोवॅड अहवालामध्ये सुचविण्यात आलेली रु.१२०० कोटी इतक्या मुल्याची विविध पर्जन्य जलवाहिन्यांची सुधार कामे दोन टप्प्यांमध्ये म्हणजेच टप्पा १ आणि उर्वरित कामे टप्पा २ प्रमाणे पार पाडण्याचे प्रस्ताविले आहे.

टप्पा - १ मधील २० कामांपैकी ११ कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत आणि उर्वरित ९ कामे प्रगतीपथावर आहेत. या मध्ये ४ पर्जन्य जल उदंचन केंद्रांच्या कामांकरिता कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

या पैकी हाजी अली आणि ईर्ला येथील २ उदंचन केंद्रांचे काम प्रगतीपथावर असून ही कामे ७० टक्क्यांपर्यंत पूर्ण झाली आहेत.

टप्पा - २ मधील ३८ कामांपैकी २७ कामे प्रगतीपथावर आहेत आणि उर्वरित ११ कामांकरिता सल्लागारांमार्फत निविदा तयार करण्यात येत आहेत.

मिठी नदी प्रकल्पाच्या टप्पा - २ मध्ये संरक्षक भिंत बांधणे आणि नदीच्या दोन्ही बाजूस सेवा रस्ता बांधणे या कामांकरिता कार्यादेश देण्यात आलेले आहेत. तसेच ०.९० मी. (सरासरी) इतके खोलीकरण करण्याचे काम पार पाडण्यात आले आहे. दोन्ही बाजूकडील ७.४० कि.मी. इतक्या लांबीच्या संरक्षक भिंतीचे काम प्रगतीपथावर आहे. मिठी नदीच्या सी.एस.टी. रोड खालील अंदाजे ६ कि.मी. बाजूचा भाग मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) यांच्या अखत्यारित असून त्यांनी त्यांच्या हद्दीतील नदीच्या पात्राचे सी.डब्ल्यु.पी.आर.एस. यांच्या शिफारशींनुसार पूर्णतः खोलीकरण केले आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या हद्दीतील नदीच्या भागातील गट क्र.१, २ व ३ मध्ये देखील उर्वरित अर्ध्या मीटरचे म्हणजेच पूर्णतः खोलीकरण करणे क्रमप्राप्त आहे. सदर खोलीकरण पावसाळ्यापूर्वी झाल्यास त्याचा फायदा पुढील पावसाळ्यात होईल. अतएव, सदरचे काम पावसाळ्यापूर्वी करण्याचे प्रस्ताविले असून तसा प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. या अतिरिक्त कामासाठी रु.१२७ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

## ४.३ रस्ते विकास कार्यक्रम

**४.३.१**
**सिमेंट कॉंक्रिट रस्ते**

वाढत जाणारे वाहतुकीचे प्रमाण आणि भार लक्षात घेऊन महानगरपालिकेने महत्त्वाच्या रस्त्यांचे आणि जोडरस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्याचे धोरण चालू आर्थिक वर्षात पुढे चालू ठेवले आहे. आतापर्यंत सुमारे ४८८ कि.मी. रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यात आले. सन २००९-१० मध्ये अंदाजे ३० कि.मी. रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यात आले. त्यापैकी-

**शहर विभागातील-**

आणिक वडाळा मार्ग

खान अब्दुल गफार खान मार्ग

बाळ गोविंद दास मार्ग

महर्षि कर्वे मार्ग

**पश्चिम उपनगरातील-**

मानवेल गोन्सालवीस मार्ग, वांद्रे (प)

मार्वे मार्ग, मालाड (प)

साईबाबा नगर मार्ग, बोरीवली (प)

**पूर्व उपनगरातील** –

अनिल उभारे रोड

मानखुर्द लिंक रोड

प्रतापराव गुर्जर मार्ग

म्हाडा कॉलनी मार्ग

कामा लेन

शांती नगर मार्ग

या प्रमुख रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्यात आले.

४.३.२
**डांबरी रस्ते**

सन २००९-१० मध्ये १३५.४५० कि.मी. डांबरी रस्त्यांचे रुंदीकरण / सुधारणा करण्यात आली. त्यापैकी

**शहर विभागातील-**

परमार गुरुजी मार्ग

१६वा रस्ता वडाळा

संत तुकाराम मार्ग

रामचंदानी मार्ग

बी.बी. खरे मार्ग

वाडीलाल पटेल मार्ग

बंडू गोखले मार्ग

डी.पी. रस्ता

**पश्चिम उपनगरातील-**

२९ वा मार्ग, वांद्रे (प)

तरुण भारत रोड (पूर्व) इत्यादी

**पूर्व उपनगरातील-**

टाटा कॉलनी रोड

साठे नगर रस्ता

शास्त्री नगर रस्ता इत्यादी

हे प्रमुख रस्ते आहेत.

४.३.३

**पूल**

सन २००९-१० मध्ये कांदिवली येथील एलसी/३१ येथे रस्तापार पूल बांधण्याचे काम पूर्ण झाले आहे. तसेच पूर्व पश्चिम वाहतूक सुधारण्यासाठी जोगेश्वरी (दक्षिण) व जोगेश्वरी (उत्तर) येथे रेल्वेवरील दोन महत्त्वाच्या पुलांचे काम हाती घेतले आहे. मिठी नदीवरील चार पूल आणि खाडी यावरील सात पूल यांची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर पूल बांधल्यामूळे अपघातांच्या प्रमाणात घट होईल तसेच पूर्व पश्चिम असे जोडमार्ग तयार होतील आणि वाहतुकीतील अडथळे कमी होतील.

४.३.४

**एरिया ट्रॅफिक कंट्रोल**

मुंबई नागरी वाहतूक प्रकल्पांतर्गत राबविली जाणारी एरिया ट्रॅफिक कंट्रोल ही एक आधुनिक वाहतूक सिग्नलची पध्दत आहे. २५३ सिग्नल संगमस्थानांचे दोन टप्प्यांत आधुनिकीकरण

करावयाचे प्रस्तावित असून पहिल्या टप्प्यातील ५३ सिग्नल संगमस्थानांपैकी ४९ सिग्नल संगमस्थानांची कामे पूर्ण झाली व सदर सिग्नल्स ॲडॅप्टीव्ह पध्दतीने चालू करण्यात आले आहेत (वाहतूक पोलीस नियंत्रण कक्षसुध्दा कार्यान्वित करण्यात आला आहे). तसेच पुढील टप्प्यात २०० पैकी १५० सिग्नल्सची स्थापत्य कामे प्रगतीपथावर आहेत. त्यापैकी ८० सिग्नल्स ठराविक वेळेप्रमाणे कार्यरत करण्यात आले आहेत.

४.४
**पाणी पुरवठा**

यावर्षी मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये पाण्याचा पुरेसा साठा नसल्याने, मुंबईतील जनतेला होणाऱ्या पाणी पुरवठयावर मर्यादा येणार असल्या तरी, नागरिकांना पुढील पावसाळयापर्यंत पिण्याकरीता तसेच इतर वापरासाठी आवश्यक तेवढे पाणी उपलब्ध होण्यासाठी सद्यपरिस्थितीत तातडीची निकड म्हणून प्रशासनाने खालील उपाययोजना करण्याचे योजिले आहे:

१. मुंबई शहरात अस्तित्वात असलेल्या ५३६५ विहिरी व ६९८६ कूपनलिकांची साफसफाई करुन त्यामधील पाणी पिण्याव्यतिरिक्त अन्य उपयोगाकरीता उपलब्ध करुन दिले जाणार आहे. त्याचबरोबर आवश्यक तेथे नवीन कूपनलिका खोदण्याचे प्रस्ताविले आहे. यासाठी

सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात रु.७२ कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

२. शहरातील सध्याची पाण्याची टंचाई पाहता, समुद्राचे पाणी गोडे करण्याचा पथदर्शी प्रकल्प खाजगी गुंतवणुकीच्या माध्यमातून सुरु करण्याचे प्रस्ताविले आहे. यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात रु.१ कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

३. पावसाच्या पाण्याचे संवर्धन करण्याचा प्रकल्प प्राधान्याने राबविण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबईत महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतींमध्ये त्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात रु.६६ कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

४. मुंबई शहराच्या पाणी पुरवठयात आणखी वाढ करण्यासाठी **गारगाई प्रकल्प** हाती घेण्याचे योजिले असून यासाठी मे.मॉट मॅकडोनाल्ड यांना सुसाध्यता अहवाल बनविण्यासाठी नियुक्त केले असून अहवाल तयार करण्याचे काम सुरु आहे. या प्रकल्पामुळे मुंबईच्या पाणी पुरवठयात अतिरिक्त ४४० द.ल.लि. प्रतिदिन एवढी वाढ होणे अपेक्षित आहे. या प्रकल्पातून उपलब्ध होणाऱ्या

पाण्याचा अभ्यास (yield study) पूर्ण झाला असून पूरसांडवा अभ्यास (flood study) सुरु आहे. तसेच अवसादन अभ्यास (sedimentation study) प्रगतीपथावर आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर केंद्र सरकारच्या विविध खात्यांकडून आवश्यक त्या मंजुऱ्या प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात येतील. या सल्लासेवेसाठी सन २०१०-११ मध्ये रु.५ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

५. सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा पिण्याव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी वापर करण्याचे प्रस्ताविले आहे. यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात रु.५.२० कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

- याचबरोबर, मुंबईच्या नागरिकांमध्ये पाण्याच्या वापराबाबत जागृती व्हावी व त्यांनी या टंचाईच्या काळातच नव्हे तर भविष्यात देखील पाण्याचा वापर काटकसरीने व जपून करावा यासाठी महानगरपालिकेतर्फे जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे. या जनजागृती मोहिमेअंतर्गत महानगरपालिकेने खालील बाबी प्रस्ताविल्या आहेत :

१. महानगरपालिकेच्या वतीने नुकतेच शिवाजी पार्क येथे जलमेळयाचे आयोजन करण्यात आले होते. अशाच पध्दतीने पूर्व व पश्चिम उपनगरात देखील जलमेळे आयोजित करण्यात येतील. त्याचबरोबर प्रत्येक विभाग कार्यालयाच्या परिसरात देखील त्या-त्या विभागातील नागरिकांच्या माहितीसाठी जलमेळयाचे आयोजन करण्यात येणार आहे.

२. दि.१७.०१.२०१० रोजी आयोजित करण्यात आलेल्या मुंबई मॅरेथॉन दौडीतही 'पाणी वाचवा - मुंबई जगवा' असा संदेश देण्यात आला आहे.

३. मुंबई शहरात प्रमुख ठिकाणी संदेशवाहक फलक लावले आहेत. याचबरोबर रेल्वे स्थानके, बेस्ट बसेस, रुग्णालये, विविध इमारती, मोठी दुकाने यामधील दूरचित्र संचावर पाणी बचत करण्याबाबत माहितीदर्शक जाहिराती दाखविण्यात येतील. शिवाय, बेस्ट बसेस तसेच इलेक्ट्रॉनिक मिडीया, वर्तमानपत्रे यामध्ये पाण्याची बचत करण्याबाबतच्या जाहिराती प्रसिध्द करण्यात येणार आहेत.

४. सेलेब्रिटीजचा जनमानसावर असलेला प्रभाव लक्षात घेऊन ख्यातनाम क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचेमार्फत

नागरिकांना पाणी वाचवण्याचे आवाहन करणाऱ्या जाहिराती विविध टि.व्ही चॅनेल्स, चित्रपटगृहे, आकाशवाणीची विविध चॅनेल्स, वर्तमानपत्रे याद्वारे प्रसिध्द करण्यात येणार आहेत.

- पाणी टंचाईच्या या कठीण प्रसंगात, मुंबई महानगरपालिका करीत असलेल्या उपाययोजनांबाबत मी आपणांस विदीत केले आहेच. त्याचबरोबर, या प्रश्नाच्या अनुषंगाने आतापर्यंत मुंबईकर, लोकप्रतिनिधी, शासन यांच्याकडून जे सहकार्य मुंबई महानगरपालिकेला मिळाले आहे ते यापुढील काळात देखील मिळत राहिल अशी अपेक्षा करुन मुंबई महानगरपालिका समर्थपणे पाणी टंचाईच्या या संकटावर मात करील अशी मी आशा करतो.
- तीन-अ मुंबई पाणी पुरवठा प्रकल्पाच्या उर्वरित कामांपैकी बरीचशी कामे पूर्णत्वास आलेली आहेत. त्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.१०४.८९कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.
- मुंबई शहराच्या पाणी पुरवठयाची वाढती मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीने चार-मुंबई मध्य वैतरणा पाणी पुरवठा प्रकल्प हा एक महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला

आहे. सदर प्रकल्पाच्या रु.२००६.६६ कोटी अंदाजित खर्चापैकी रु.१३२९.५० कोटी खर्चास केंद्र शासनाने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत अनुदान म्हणून अर्थसहाय्य देण्यास मान्यता दिली असून मुंबई महानगरपालिकेस आतापर्यंत रु.३३२.३७ कोटीचे अनुदान केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त झाले आहे. या प्रकल्पांतर्गत उच्चस्तर वैतरणा धरण व निम्नस्तर वैतरणा (मोडक सागर) धरणांच्यामध्ये धरण बांधणे, त्यातील पाण्याचे वहन करून जलशुध्दीकरण करणे व नंतर उदंचन केंद्राद्वारे महासंतुलन जलाशयात साठविणे, इत्यादी कामांचा समावेश आहे. सदर प्रकल्पांतर्गत येणाऱ्या बहुतांशी घटक कामांचे कार्यादेश देण्यात आले असून, ही कामे प्रगतीपथावर आहेत. त्यासाठी सन २०१०-११ मध्ये यासाठी रु.६७२.७१ कोटींची तरतूद प्रस्ताविली असून, या तरतूदीपैकी रु.५३७.६६ कोटींची कामे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत समाविष्ट आहेत.

- तीन-अ मुंबई पाणी पुरवठा प्रकल्प व चार-मुंबई मध्य वैतरणा पाणी पुरवठा प्रकल्पांशिवाय, काही जुन्या

जलवाहिन्या बदलण्याऐवजी पुढीलप्रमाणे बोगदे बांधण्याची कामे हाती घेतली असून ती सध्या प्रगतीपथावर आहेत.

(१) **मलबार टेकडी ते क्रॉस मैदान बोगदा**

**(लांबी ३.६ कि.मी)**

या बोगदयाचे काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत २.४ कि.मी. चे काम झाले असून जानेवारी २०११ पर्यंत सदर काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.६० कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

(२) **मरोशी ते रुपारेल कॉलेज बोगदा**

**(लांबी ११.८५ कि.मी.)**

या बोगदयाचे काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ६.०६ कि.मी. चे काम झाले असून ऑगस्ट २०१२ पर्यंत ह्या बोगद्याचे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात यासाठी रु.१६० कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे. या बोगदयामुळे विमानतळ परिसरातील जलवाहिन्यांच्या गळतीचा/परिरक्षणाचा प्रलंबित प्रश्न निकालात निघणार आहे.

**(३) वेरावली ते आदर्श नगर ते पुढे यारी रोडपर्यंत बोगदा (लांबी ६.१ कि.मी.)**

या बोगदयाचे खोदकाम पूर्ण झाले असून उर्वरित कामे डिसेंबर २०१० पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात यासाठी रु.५५ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

(४) **गुंदवली पासून भांडूप संकुलापर्यंत बोगदा**

सध्या अस्तित्वात असलेल्या जुन्या जलवाहिन्यांवर झोपडपट्टीधारकांच्या अतिक्रमणामुळे जलवाहिन्यांच्या परिरक्षणात उद्भवलेल्या अडचणी लक्षात घेऊन त्या टाळण्याकरिता १५.१ कि.मी. लांबीचा, ५.५ मिटर व्यासाचा सदर बोगदा बांधण्याचे काम हाती घेतले आहे. हा बोगदा गुंदवली ते कापूरबावडी व कापूरबावडी ते भांडुप संकुल अशा दोन विभागांत विभागला आहे. यामध्ये कापूरबावडी येथे कर्मचाऱ्यांच्या वसाहतीसाठी नवीन इमारत बांधण्याचे काम अंतर्भूत आहे. या बोगदयांच्या कामाचा कंत्राट खर्च अनुक्रमे रु.१३९८.७६ कोटी व रु.१४८८.५० कोटी असून सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात अनुक्रमे रु.४० कोटी व रु.६५ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे. या बोगदयामुळे तानसा, वैतरणा तलावांच्या

पाण्याचे तसेच भविष्यकालीन गारगाई योजनेद्वारे प्राप्त होणाऱ्या पाण्याचे वहन भांडुप संकुलापर्यंत करणे शक्य होणार आहे.

- वरील बोगदयांपैकी, **मलबार हिल ते क्रॉस मैदान** व **मरोशी ते रुपारेल कॉलेज** या दोन बोगदयांसाठी केंद्र शासनाने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत अर्थसहाय्यासाठी मंजूरी दिलेली असून मार्च २००९ पर्यंत केंद्र व राज्य शासनाकडून रु.११.७५ कोटी व रु.३६.८६ कोटीचे अनुदान प्राप्त झाले आहे.

**४.५**
**मल नि:सारण**

- मुंबई मलनि:सारण प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी मुंबई मलनि:सारण प्रकल्प खाते स्थापन करण्यात आले. जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने मुंबई मलनि:सारण प्रकल्प टप्पा-१ यशस्वीपणे पूर्ण केलेला आहे. सध्या मुंबई मलनि:सारण टप्पा-२ सुरु असून तो तीन घटकांमध्ये विभागला आहे. त्यामधील मुंबई मलनि:सारण प्रकल्प टप्पा-२ (प्राधान्य कामे, घटक-१) कामाच्या रु.५०२.४१ कोटी अंदाजित खर्चापैकी केंद्र शासनाने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत रु.३६४.४७ कोटीच्या खर्चास अनुदानासाठी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेला

आतापर्यंत केंद्र व राज्य शासनाकडून रु.४५.५६ कोटी एवढे अनुदान प्राप्त झाले आहे. हा प्रकल्प २०११ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- याच प्रकल्पाच्या टप्पा-२ च्या घटक-२ व घटक-३ मधील कामांच्या सविस्तर अभियांत्रिकी संकल्पचित्रे आणि प्रकल्प व्यवस्थापनासाठी सल्लागार नियुक्त केले असून या दोन्ही घटक कामांचा एकूण रु.१५६३.४७ (रु.५६२.०० + रु.१००१.४७) कोटीचा सविस्तर प्रकल्प अहवाल जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान अंतर्गत अनुदानासाठी केंद्र शासनास सादर करण्यात आला होता. तथापि, सी.पी.एच्.इ.इ.ओ. अधिकाऱ्यांनी परिमंडळनिहाय अहवाल सादर करण्यास सांगितले. सदर काम प्रगतीपथावर असून लवकरच अहवाल सादर करण्यात येईल. घटक २ व ३ मधील प्रकल्पांची अंमलबजावणी झाल्यानंतर मलनि:सारण क्षेत्र ६० ते ८० टक्के पर्यंत वाढणार आहे .

**४. ६ आरोग्य सेवा व रुग्णालयांची दर्जोन्नती**

- मुंबईत शहरात सातत्याने वाढणाऱ्या बांधकामांमुळे हिवतापाचा प्रादुर्भाव वाढला असल्यामुळे, आठ वाहन विराजित धूम्रफवारणी यंत्रे व २२७ स्कंध विराजित

धूम्रफवारणी यंत्रे खरेदी करण्यात आली असून ती उत्तमरित्या कार्यरत आहेत. त्यामुळे महानगरपालिकेच्या सर्व प्रभागांत व हिवतापप्रवण क्षेत्रात प्रभावीपणे धूम्रफवारणी करणे शक्य झाले आहे.

- वि.नं.देसाई रुग्णालय, सांताक्रूझ, भगवती रुग्णालय, बोरीवली, राजावाडी रुग्णालय, घाटकोपर या रुग्णालयांसाठी सी.टी.स्कॅन मशीनची खरेदी करण्यात आली असून जनतेच्या सोयीसाठी ती कार्यान्वित करण्यात आली आहेत.
- सिध्दार्थ रुग्णालय, गोरेगांव येथे खाजगी लोक सहभागाने १२ खाटांचा अतिदक्षता विभाग सुरु करण्यात आला आहे. तसेच म.तु.अगरवाल, मुलुंड (पश्चिम) येथे खाजगी लोक सहभागातून १५ खाटांचा अतिदक्षता विभाग सुरु करण्यात आला आहे.
- महानगरपालिका राबवित असलेल्या भारत सरकारच्या ''जननी सुरक्षा योजना`` प्रकल्पाचा लाभ दारिद्र्यरेषेखालील आणि अनुसूचित जाती व जमातीच्या महिलांना देण्यात येत असून, या योजनेंतर्गत वैद्यकीय संस्थांमध्ये प्रसूतीसाठी येणाऱ्या मातांना रु.६००/- एवढी रक्कम देण्यात येत असल्याने गर्भवती मातांना अशा वैद्यकीय संस्थांमध्ये प्रसूतीस

येण्यास उत्तेजन मिळते व परिणामी माता आणि अर्भक मृत्युदरात घट होते.

- गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियमांतर्गत सोनोग्राफी मशीन नोंदणी आकार गोळा करुन जेथे सोनोग्राफी करण्यात येते अशा केंद्रांची तपासणी करताना या वर्षात १२ मशीन्स सील केली असून, रु.४.७५ लाख एवढा महसूलही गोळा करण्यात आला आहे. सदर अधिनियम अधिक परिणामकारकरित्या कार्यान्वित करण्याचे प्रस्ताविले आहे.
- शस्त्रक्रियेशिवाय पुरुष नसबंदीच्या कार्यक्रमांतर्गत एप्रिल २००९ ते ऑक्टोबर २००९ पर्यंत २४८९ शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून ही मोहिम यशस्वीरित्या राबविल्यामुळे भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासन त्यांचे डॉक्टर्स या केंद्रावर प्रशिक्षणासाठी पाठवितात.
- एच१ एन१ तपासणी केंद्रे - ११ उपनगरीय रुग्णालयांत एच१ एन१ विषाणूच्या आजाराच्या तपासणीसाठी तपासणी केंद्रे सुरु करण्यात आली असून सिध्दार्थ रुग्णालय, गोरेगांव येथे १० खाटांचा अतिदक्षता विभाग व म.तु.अगरवाल रुग्णालय, मुलुंड (प) येथे २० खाटांचा कक्ष एच१ एन१ रुग्णांसाठी चालू करण्यात आला आहे. या आर्थिक वर्षात या

केंद्रात ३७,५९२ इतक्या रुग्णांची आतापर्यंत तपासणी करण्यात आली.

- राजावाडी रुग्णालय येथील डायलेसीस सेंटर कार्यान्वित करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

## ४.७ स्वच्छता

**४. ७.१**
**घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे**

कॉम्पॅक्टर गाड्यांचा पुरवठा करणारे सर्वसमावेशक परिमंडळीय कंत्राट आणि एच/पूर्व, के/पूर्व आणि के/पश्चिम विभागात देण्यात आलेल्या एरिया बेस्ड कंत्राटाच्या सहाय्याने घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्याचे विद्यमान ५८ टक्के प्रमाण ८० टक्क्यांपर्यंत नेण्याचे प्रस्ताविले आहे. घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्याच्या पध्दतीत ओला व सुका कचरा वेगवेगळा गोळा करण्यात येतो. त्यासाठी स्वतंत्र कचरापेट्या, जैव विघटनशील पिशव्या आणि सुका कचरा गोळा करण्यासाठी विभागवार वेगळी वाहनांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**४.७.२**
**स्वच्छता मोहीम**

स्वच्छता मोहीमेंतर्गत शून्य कचरा स्थिती राखण्यासाठी दत्तक वस्ती योजना, स्वच्छ परिसर योजना आणि मॅनिंग आणि मॉपिंग अशा योजना विविध विभागांत राबविण्यात येत आहेत.

**४.७.३**
**क्षेपणभूमींचा विकास**

न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार गोराई क्षेपणभूमी येथे शास्त्रोक्त पध्दतीने क्षेपणभूमी बंद करण्याचे काम पूर्ण झाले आहे. नागरी घन कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम, २००० अन्वये १५ वर्षांसाठी प्रचालन आणि परिरक्षणाचे काम सुरू झालेले आहे. कचऱ्यापासून वीज निर्मिती करण्याचा समावेशही प्रचालन आणि परिरक्षणात अंतर्भूत करण्यात येणार आहे.

**४.७.४**
**जैव वैद्यकीय कचरा**

देवनार क्षेपणभूमीजवळ जैव वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे मध्यवर्ती केंद्र उभारण्यात आले आहे. जैव वैद्यकीय कचरा गोळा करणे, वाहून नेणे आणि त्यावर प्रक्रिया करण्याचे कंत्राट मे. एसएमएस इन्व्होक्लीन प्रा.लि. यांना देण्यात आले आहे. प्रती दिन १० मे.टन जैव वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता या केंद्राची आहे. सदर केंद्र कार्यान्वित झाले असून प्रक्रिया करण्याचे काम सुरू झाले आहे.

**४.७.५**
**मोठया प्रमाणावर कचऱ्याची साठवण होणारी संकलन केंद्रे बंद करणे**

मोठ्या प्रमाणावर कचरा निर्मिती होणाऱ्या केंद्रांवरील दुर्गंधी आणि भटक्या जनावरांचा त्रास टाळण्यासाठी सन २००९- २०१० या आर्थिक वर्षात १६ स्टेशनरी कॉम्पॅक्टरची उभारणी करण्यात आली आहे व आणखी ३ स्टेशनरी कॉम्पॅक्टरची उभारणी करण्यात येत आहे.

**४.८**
**दादर येथील चैत्यभूमीचे सुशोभिकरण**

तोरण गेट, अशोक स्तंभ, दिवाबत्ती, जैसेलमेर फरसंबदी, स्टील कठडे, पोलीस चौकी इत्यादी कामे समाविष्ट असलेला पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्यातील नवीन स्तुप व चैत्यभूमी ते सूर्यवंशी सभागृहापर्यंत मार्गिका सुधारित नकाशे बनविण्यात येत असून ते केंद्रीय पर्यावरण व वन खात्याकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येतील. यासाठी राज्य सरकारने नेमलेल्या सुकाणू समितीच्या शिफारशींनुसार महापालिकेतर्फे कामे पार पाडली जात असून त्यासाठी लागणारा निधी राज्य शासन देत आहे.

**४.९**
**गेटवे ऑफ इंडियाच्या परिसराचे सुशोभिकरण**

गेटवे ऑफ इंडिया, त्या समोरील सार्वजनिक चौक आणि सभोवतालच्या परिसराचे सुशोभिकरण करण्याचे काम पूर्ण झाले आहे.

**४.१०**
**राजे एडवर्ड स्मारक रुग्णालयाचे आधुनिकीकरण आणि विस्तार**

राजे एडवर्ड स्मारक रुग्णालयाच्या संकुलाच्या विकासाचा सर्वसमावेशक आराखडा तयार करण्यात आला असून हे काम प्रगतीपथावर आहे. रुग्णालयाच्या सेठ गो.सुं.वैद्यकीय महाविद्यालय या वारसावास्तु इमारतीच्या दुरुस्तीचे प्रगतीपथावर असलेले काम जवळपास पूर्ण होत आले असून राजे एडवर्ड स्मारक रुग्णालयाच्या दुरुस्ती व पुनर्रचनेचे काम प्रगतीपथावर आहे.

**४.११**
**रुग्णालयांसाठी यंत्रे व संयंत्रांची खरेदी**

- रा.ए.स्मा. रुग्णालयात फ्लोसाईटोमीटर, एलसिएमएस, कॅथ लॅब, फ्लॅट पॅनल, सिसिडी डिजीटल रेडिओग्राफी सिस्टिम या उपकरणांची समाधानकारकरित्या उभारणी करण्यात आली आहे. प्लोसायटोमीटरचा उपयोग कर्करोगाच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी तर एलसीएमएस चा उपयोग महत्त्वाच्या किडनी उपचारांमध्ये रक्तामधील औषधाचे प्रमाण शोधून काढण्यासाठी होतो. या दोन्ही मशीनद्वारे एका वर्षात सुमारे ५०० ते ८०० रुग्णांवर उपचार केले जातात. प्लॅट पॅनल सीसीडी डिजीटल रेडिओग्राफी सिस्टिम ही एक्स-रे पध्दतीद्वारे रोगाचे निदान करणारे प्रगत यंत्र असल्याने तिचा रुग्णांवर उपचार करण्यासाठी यशस्वीरित्या उपयोग केला जात आहे. तसेच रक्तपेढी विभागाकरिता डायनामेड टेक्नो ट्विन स्टेशन फुल्ली ऑटोमेटेड ॲनालायझरची खरेदी करण्यात आली आहे. तसेच एअर सिलींग मॅनेजमेंट सिस्टिम इन्ट्रावास्क्युलर अल्ट्रा साऊंड सिस्टिम खरेदी करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. हिचा उपयोग यकृत प्रत्यारोपणाव्यतिरिक्त पित्ताशय, स्वादुपिंड, आतड्याचे कर्करोग यांच्यासारख्या मोठ्या शस्त्रक्रियांकरिता होणार आहे.

- लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयाकरिता उच्च क्षमतेचे एम.आर.आय. मशीन या वर्षाअखेरीस प्राप्त होऊन कार्यान्वित होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळेच पूर्व उपनगरामधून येणाऱ्या रुग्णांना फार मोठा दिलासा मिळेल. तसेच अपघातग्रस्त रुग्णांच्या तपासण्या सत्वर होऊन त्यांना योग्य उपचार मिळतील.

- उपनगरीय रुग्णालयांसाठी आवश्यक असलेली जीवरक्षक अत्याधुनिक ४९ व्हेंटिलेटर्स, ९ रुग्णालयांसाठी कम्प्युटराइझ्ड रेडिओग्राफी सिस्टिम, ३ रुग्णालयांसाठी सी.टी स्कॅन मशीन्स, १६ आधुनिक व सर्व यंत्रणांनी सुसज्ज अशा रुग्णवाहिका, यंत्रे/सयंत्रे व उपकरणांच्या खरेदीचे आदेश देण्यात आले असून, नजीकच्या काळात त्यांचा वापर उपनगरातील रुग्णालयांमध्ये करण्यात येणार आहे. त्यामुळे उपनगरीय रुग्णांवर तात्काळ उपचार सुरु होऊ शकतील व अतिशय गंभीर स्थितीतील रुग्णांना जीवनदान मिळू शकेल.

**४.१२**
**अग्निशमन दलासाठी उपकरणाची खरेदी**

या वर्षामध्ये डिसेंबर-२००९ मध्ये तीन नवीन फोम टेंडर व तीन टर्न टेबल लॅडर अग्निशमन दलाच्या ताफ्यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. सदर गाड्यांचे ऑपरेशन, हाताळणी व परिरक्षण यांचे प्रशिक्षण भायखळा मुख्यालय येथे चालू आहे. त्यामुळे अग्निशमन दलाच्या सुसज्जतेत भर पडली आहे.

**४.१३**
**आपत्कालीन व्यवस्थापन क्षमतांचे बळकटीकरण**

मुंबई शहराला नैसर्गिक आणि मानव निर्मित संकटांपासून असलेला धोका विचारात घेऊन आपत्ती निवारणाची पूर्व तयारी म्हणून पुढे नमूद केलेल्या विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

- राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या निर्देशानुसार महापालिकेतर्फे जनजागृती मोहिमेचा एक भाग म्हणून विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात.
- आपत्ती जोखीम व्यवस्थापन बृहत आराखडा- अर्थक्वेक मेगासिटीज ईनिशिएटीव्ह या संस्थेने बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी आंतरराष्ट्रीय निकषांप्रमाणे शास्त्रशुध्दरित्या आपत्कालीन आराखडा तयार करण्याची तयारी दर्शविली असून ईएमआय व बृहन्मुंबई आपत्कालीन व्यवस्थापन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई शहरासाठी आपत्ती जोखीम व्यवस्थापन बृहत आराखडा (डीआरएमएमपी) तयार करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

- पूरपरिस्थिती उद्भवल्यास पुरात अडकलेल्या नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी विविध विभाग कार्यालयांना १० जीवरक्षक तरंगते तराफे खरेदी करून देण्यात आले. या तराफ्यांचा वापर गणपती विसर्जनाच्या वेळीही केलेला आहे. यामुळे सदर विसर्जन विनाआपत्ती आणि सुरळीतपणे पार पडले.
- महापालिका मुख्यालयात असलेल्या तात्काळ कृती केंद्राच्या धर्तीवर सर्व विभाग कार्यालयांत सुसज्ज नियंत्रण कक्ष नव्याने निर्माण करुन सध्या अस्तित्वात असलेले नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्याची कार्यवाही या आर्थिक वर्षाअखेर पूर्ण होईल. त्यामुळे मुख्यालयातील नियंत्रण कक्षात उपस्थित असणारे आयुक्त पातळीवरील अधिकारी व संबंधित दुर्घटनास्थळाचे स्थानिक विभाग कार्यालय यांच्यामध्ये जलद व थेट संपर्क व समन्वय राहून आदेश व माहिती यांची देवाणघेवाण सुकर होऊन परिस्थितीवर तात्काळ नियंत्रण प्राप्त करता येऊ शकेल. तसेच यायोगे कमीत कमी वेळेत घटनेस प्रतिसाद देता येणे शक्य होईल.
- या वर्षी पावसाळयात विभागवार पडणाऱ्या दैनंदिन पावसाची तीव्रता नागरिकांना ताबडतोब कळावी या दृष्टीकोनातून पावसाळयातील चार महिन्यांकरिता **“www.mumbaimonsoon.com”** या नावाचे संकेतस्थळ सुरु करण्यात आले होते.

## ४.१४ संस्थांतर्गत सुधारणा आणि पुनर्रचना

**४.१४.१**
**विशेष उपलब्धी**

अर्थसंकल्पीय तसेच लेखा पध्दतीत सकारात्मक सुधारणांची अंमलबजावणी करणारी देशातील पहिली महानगरपालिका म्हणून माननीय पंतप्रधानांच्या हस्ते बृहन्मुंबई महानगरपालिकेचा सुवर्णपदक देऊन गौरव करण्यात आला आहे.

**४.१४.२**
**वेतनश्रेणी सुधारणेची अंमलबजावणी**

दिनांक १.४.२००५ पासून वेतनश्रेणी सुधारणेची अंमलबजावणी करण्यात आली असून महापालिका कर्मचाऱ्यांना माहे जुलै २००८ पासून अंतिमत: मान्य केलेल्या सुत्रानुसार सुधारित वेतनाचे अधिदान करण्यात येत आहे. महापालिकेतील वैद्यकीय अधिकारी, अभियंत्यांचे प्रवर्ग इत्यादींच्या वेतनाची राज्य शासनाप्रमाणे पाचव्या/ सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे आकारणी करण्यात आली आहे. त्यानुसार अंदाजित रु.२५०० कोटी इतक्या थकबाकीपैकी दोन हप्त्यांचे सन २००८-०९ मध्ये तर दोन हप्त्यांचे सन २००९-१० मध्ये अधिदान करण्यात आले असून थकबाकीच्या अचूक परिगणनेचे काम सुरु आहे. थकबाकीच्या आधीच्या परिगणनेवर आधारित आर्थिक वर्ष २००९-१० मध्ये निधीच्या उपलब्धतेनुसार पाचव्या हप्त्याचे अधिदान करण्यात येईल. दि.१.४.२००५ पासूनच्या वेतनश्रेणी सुधारित केल्यानंतर वेतनातील त्रुटींचे / विसंगतींचे निराकरण

करुन प्रवर्गामधील समानता (Partity) ठरविण्यासाठी श्री.रंगनाथन, माजी महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समितीची नियुक्ती करण्यात आली आहे.

## ५. सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांची ठळक वैशिष्टये

सन २०१०-११ साठीचे महसुली अर्थसंकल्पीय अंदाज व भांडवली खर्चाचे अंदाज याबाबत सविस्तर विवेचन करण्यापूर्वी महापालिकेच्या विद्यमान व भविष्यातील आर्थिक स्थितीवर सविस्तर भाष्य करणे फार गरजेचे वाटते.

महापालिकेची सध्याची आर्थिक स्थिती ही फार मोठ्या प्रमाणावरील अवाजवी दायित्व स्वीकारण्याइतकी भक्कम नाही. त्यामुळे महसुली तसेच भांडवली खर्चावर काही कडक निर्बंध घालणे तसेच महसुल वाढीचे नवनवीन स्त्रोत शोधून त्याद्वारे महसुलात वृध्दी करण्याच्या व विद्यमान महसुली स्त्रोतांद्वारे अधिकाधिक महसूल कशा प्रकारे मिळविता येईल यांसारख्या उपाययोजना तातडीने करणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा महापालिकेच्या अर्थव्यवस्थेचा डोलारा सांभाळणे अतिशय कठीण होणार आहे.

महानगरपालिकेची आर्थिक स्थिती जकात या उत्पन्नाच्या साधनावर आजही अवलंबून आहे. तथापि, जागतिक मंदीच्या काळात बंद होणारे किंवा अन्य ठिकाणी स्थानांतरित होणारे उद्योगधंदे आणि कारखाने यांमुळे जकातपात्र वस्तुंची मुंबईतील आयात कमी होते असा पूर्वानुभव आहे. महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेण्या व भत्ते, निवृत्तीवेतन इत्यादींमुळे सन १९९५ ते १९९९ या कालावधीत आस्थापना खर्चामध्ये लक्षणीय वाढ झाली होती. पर्यायाने महानगरपलिकेचा एकूण खर्च

महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या कक्षेत सीमित राहू शकला नाही आणि महानगरपालिका प्रचंड तुटीत गेली. अशा प्रकारे सन १९९५-९६ पासूनची महापालिकेला येणारी तूट भरुन काढण्यासाठी जकात अनुसूचीमध्ये बदल / जकात आकारणीच्या दरात सुधारणा, मालमत्ता कराच्या दरात सुधारणा, विविध खात्यांच्या शुल्क आकारात सुधारणा यांद्वारे महसुलात वृध्दी करणे व त्याचबरोबर अनावश्यक खर्चात कपात करणे यांसारख्या उपाययोजना करण्यात आल्या होत्या. जकात हेच महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन असल्याकारणाने सन १९९५-९६ पासून महापालिकेला येणारी तूट भरुन काढण्यासाठी जकात अनुसूचीत बदल करणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने ऑगस्ट १९९८, एप्रिल २००० आणि ऑगस्ट २००२ अशी तीन वेळा जकात अनुसूचीत सुधारणा तसेच जकात आकारणीच्या दरात सुधारणा करण्यात आली. जकातीच्या खालोखाल मालमत्ता कर हे महापालिकेच्या उत्पन्नाचे दुसरे प्रमुख साधन असल्याने दि.१.४.१९९७ पासून सन २००० पर्यंत अर्थसंकल्प 'अ' आणि 'ई' अंतर्गत मालमत्ता करात १९% एवढी मोठ्या प्रमाणात वाढ करावी लागली. तथापि, महानगरपालिका अधिनियमानुसार या प्रत्येक कराच्या आकारणीचे कमाल दर ठरवून दिले आहेत. त्या अनुषंगाने सन १९९८-९९ मध्ये पथकराने तर सन २०००-०१ मध्ये शिक्षण उपकरानेदेखील आपली कमाल मर्यादा गाठली आहे. आता केवळ सर्वसाधारण करात अतिरिक्त कमाल २४% पर्यंत व अग्निशमन करात केवळ १% पर्यंतच वृध्दी करण्यास वाव आहे. मी या अनुषंगाने सविस्तर ऊहापोह माझ्या स्थायी समितीसमोर यापूर्वीच सादर केलेल्या सविस्तर अहवालात केला आहे.

प्रस्तुत निवेदनात यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या सहाव्या वित्त आयोगाच्या धर्तीवर करण्यात आलेल्या सुधारित वेतनश्रेण्यांमुळे आस्थापना खर्चात असाधारण वाढ झाली आहे. मात्र महापालिकेच्या उत्पन्नात तेवढ्या प्रमाणात वाढ झालेली नाही. त्याशिवाय मालमत्ता करात वृध्दी करुन

त्याद्वारे उत्पन्न वाढीचा सहज उपलब्ध होऊ शकेल असा भक्कम पर्यायही आपणांस उपलब्ध नाही. या परिस्थितीत थोड्याफार प्रमाणात जकात अनुसूचीत सुधारणा करणे व जकातीच्या आकारात सुधारणा करणे हा पर्याय उपलब्ध आहे. मात्र हा पर्यायही जपून वापरावा लागेल.

महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याचे व महानगरपालिकेचा एकूण खर्च उत्पन्नाच्या कक्षेत सीमित ठेवण्याच्या दृष्टीकोनातून उपलब्ध दुसरे दोन भरवश्याचे पर्याय म्हणजे महसुलात वृध्दी करणे व अनावश्यक व टाळता येण्यासारख्या खर्चात कपात करणे हेच होत. महसुलात वृध्दी करण्याच्या दृष्टीकोनातून तत्कालीन आयुक्तांनी परिपत्रक क्र.सीए/एफडीटी/२९, दि.२६.१०.२००९ द्वारे सर्व खाते प्रमुखांना त्यांच्या खात्यांमार्फत आकारण्यात येणाऱ्या विद्यमान शुल्कातील दरवाढीचे प्रस्ताव योग्य तो आढावा घेऊन त्वरित सादर करण्याविषयी व करवाढीच्या रुपाने जनतेवर भार न लादता उत्पन्नाचे नवनवीन स्त्रोत उपलब्ध करण्याच्या दृष्टीने अभ्यास करण्याचे निदेश यापूर्वीच दिले आहेत. तसेच मी अतिरिक्त आयुक्तांच्या स्तरावर अतिरिक्त महसुली साधनस्त्रोतांची उपलब्धता (Additional Resource Mobilization) पडताळण्याच्या दृष्टीकोनातून बैठका घेतल्या असून असे प्रस्ताव तातडीने सादर करण्याविषयी निदेश दिले आहेत. त्याचबरोबर शासनाकडे थकीत असलेल्या थकबाकीच्या मोठ्या रकमा तातडीने वसूल करण्याबाबत संबंधित खाते प्रमुखांनी व अतिरिक्त आयुक्तांनी आपल्या पातळीवर शासनाकडे पाठपुरवा करावा असेही निदेश देण्यात आले आहेत. अशा उपाययोजनांमुळे महसूल वृध्दीचे नवनवीन स्त्रोत उपलब्ध होतील व महापालिकेच्या उत्पन्नात भर पडेल याबाबत मी आशावादी आहे.

स्थायी समितीला बृहन्मुंबई महापालिकेच्या आर्थिक स्थितीबद्दल यापूर्वीच सादर केलेल्या अहवालात मी नमूद केले आहे की, सध्या महापालिका विविध प्रकारची स्वविवेकाधीन कर्तव्ये पार

पाडण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर खर्च करीत असते. नवीन माध्यमिक शाळा, वैद्यकीय महाविद्यालये, तंत्रशिक्षण विद्यालये चालविणे, विज्ञान शाखेची कनिष्ठ महाविद्यालये सुरु करणे, थीम गार्डन्ससारखी नवनवीन उद्याने विकसित करणे; तरण तलाव, क्रिडासंकूल, खुली नाट्यगृहे, नाट्यगृहे यांच्या बांधकामांवर तसेच परिरक्षणावर गेली काही वर्षे मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे. वस्तुत: उपवने, उद्याने आणि मनोरंजनासाठी जागा उभारणे व त्या सुस्थितीत ठेवणे तसेच तरण तलाव, नाट्यगृहे इत्यादींच्या सोयी उपलब्ध करणे हे महापालिकेचे बंधनकारक कर्तव्य नाही. ही सर्व स्वविवेकाधीन कर्तव्ये महापालिकेकडे बंधनकारक असलेल्या मूलभूत सेवा-सुविधा पुरविण्यासाठी पुरेसा निधी असेल तर उर्वरित अतिरिक्त निधीतून आवश्यकतेनुसार पार पाडणे अपेक्षित आहे. महापालिकेच्या सध्याच्या आर्थिक स्थितीच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या स्वविवेकाधीन कर्तव्यांवर व प्रयोजनांवर करण्यात येणाऱ्या खर्चावर काही प्रमाणात मर्यादा घालणे अत्यावश्यक झाले आहे. अशा प्रयोजनांवर असाच खर्च चालू ठेवला तर भविष्यात महापालिकेच्या बंधनकारक असलेल्या कर्तव्यांची पूर्तता करण्यासाठी पुरेसा निधी शिल्लक असणार नाही.

या दृष्टीकोनातून नवनवीन थीम गार्डन्ससारखे प्रकल्प सद्य:स्थितीत स्थगित ठेवणे योग्य ठरेल. फक्त हाती घेण्यात आलेले अशा प्रकारचे प्रकल्प आता तातडीने पूर्ण करणे हेच उद्दिष्ट समोर ठेवावे लागेल. त्याचबरोबर विद्यमान मंडयांचा / इमारतींचा पुनर्विकास करणे, नवीन रुग्णालयांच्या इमारती बांधणे तसेच महापालिका बाजार बांधणे यांसारखे नवनवीन संकल्पनांवर आधारित असे प्रकल्प हाती घ्यावयाचे झाल्यास ही क्षेत्रे खाजगी क्षेत्रांसाठी खुली करुन ते यापुढे खाजगी क्षेत्राच्या सहभागातून (Public Private Partnership) हाती घेणे जास्त संयुक्तिक होईल, जेणेकरुन या प्रकल्पांचा संपूर्ण आर्थिक भार महापालिकेवर येणार नाही व जनतेला सोयीसुविधाही उपलब्ध होऊ शकतील. तसेच यापुढे

असे कोणतेही प्रकल्प हाती घेताना ते स्वयंपूर्ण (Self supporting) असतील हे पाहणे अधिक योग्य होईल. याच दृष्टीकोनातून नागरी प्रशिक्षण केंद्र, सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल्स् इत्यादी प्रकल्प तात्पुरते स्थगित ठेवण्याचे प्रस्ताविण्यात आले आहे. तसेच 'आश्रय योजना' सारख्या प्रकल्पात त्यातील काही भाग व्यापारी हेतूने (Commercial purpose) राखीव ठेवण्याची शक्यता पडताळण्यात येत आहे, जेणेकरुन खाजगी विकासक या प्रकल्पांकडे आकर्षित होतील व या प्रकल्पांचा आर्थिक भार काही प्रमाणात कमी होऊ शकेल. या अनुषंगाने एक सर्वंकष धोरण ठरविण्याचा माझा विचार आहे.

महापालिकेच्या अशा तेवढ्याशा सुदृढ नसलेल्या आर्थिक स्थितीच्या पार्श्वभूमीवर आगामी वर्षात कोणतेही मोठ्या स्वरुपाचे नवीन प्रकल्प / कामे हाती घेण्यात आलेली नाहीत. मात्र जे मोठमोठे प्रकल्प यापूर्वी हाती घेण्यात आले आहेत ते नियोजनपूर्वक आगामी वर्षातच कसे पूर्ण होतील यावर प्रामुख्याने भर देण्यात आला आहे. जे प्रकल्प आगामी वर्षात पूर्ण करावयाचे आहेत व त्याकरिता आवश्यक तरतुदी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत त्या तरतुदींचा पूर्ण विनियोग करुन ही कामे पूर्ण करावीत अन्यथा अशा कामांसाठी त्यापुढील वर्षामध्ये कोणतीही अतिरिक्त तरतूद उपलब्ध करुन देण्यात येणार नाही असे स्पष्ट निदेश मी सर्व खाते प्रमुखांना दिले आहेत. याच पार्श्वभूमीवर रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाची कोणतीही मोठ्या स्वरुपाची नवीन कामे आगामी वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजांत समाविष्ट करण्यात आलेली नाहीत व हाती घेण्यात आलेली कामेच पूर्ण करण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतुदी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. डांबरी रस्ते व रस्ते दुरुस्ती / परिरक्षणाची नित्यक्रमाची कामे वगळता सिमेंट कॉंक्रिटीकरणाची नवीन कामे आगामी काही वर्षात स्थगित ठेवण्याचे धोरण ठरविण्यात आले आहे.

**सन २००९-१० चे सुधारित अंदाज**

सन २००९-१० साठीचा रु.५९७५.१८ कोटी एवढा भांडवली खर्च भागविण्याकरिता दीर्घकालीन धोरणाचा भाग म्हणून निर्माण केलेल्या विशेष निधींमधून रु.२४७०.५० कोटी एवढी रक्कम काढण्याचे व उर्वरित अपेक्षित भांडवली प्राप्तीव्यतिरिक्त रु.२५९७.५० कोटी एवढी रक्कम अंतर्गत निधीमधून कर्ज उभारणीद्वारा उभी करण्याचे प्रस्ताविण्यात आले होते. त्यानुसार, मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम १०६ अन्वये राज्य शासनाची मंजुरी मिळण्याकरिता सादर केलेल्या प्रस्तावात या अंतर्गत कर्जाची परतफेड सन २०१०-११ पासून २०१९-२०२० या १० वर्षांच्या आर्थिक कालावधीसाठी ८ टक्के व्याज दराने करण्याचे प्रस्ताविण्यात आले होते. याबाबतचा महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाचा शासन निर्णय क्र.सर्वसा.(बीएमसी)-२५०९/२०२१/प्र.क्र.११२/ नवि-२१ दि.८ जानेवारी, २०१० प्राप्त झालेला असून या निर्णयाद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिकेस भविष्य निर्वाह निधी / निवृत्तीवेतन निधी वगळता इतर ठेवींच्या रकमेतून सन २००९-१० या आर्थिक वर्षातील भांडवली कामांच्या खर्चासाठी गरजेप्रमाणे फक्त रु.१ हजार कोटी पर्यंत तात्पुरते अंतर्गत कर्ज घेण्यास मान्यता देण्यात आली असून सदर कर्जाची प्रतिपूर्ती वार्षिक ८ टक्के व्याज दराने **एका वर्षात** करावयाची आहे.

अशा प्रकारे महापालिकेने प्रस्ताविलेल्या रु.२५९७.५० कोटी इतक्या रकमेच्या कर्ज उभारणी ऐवजी केवळ रु.१ हजार कोटी एवढीच रक्कम अंतर्गत कर्ज म्हणून घेण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. त्याचबरोबर अशा प्रकारे उभारावयाची अंतर्गत निधीमधूनची कर्ज रक्कम जी ८ टक्के व्याजदराने सन २०१०-११ पासून सन २०१९-२० या दहा वर्षाच्या आर्थिक कालावधीसाठी मागण्यात आली होती, त्याऐवजी रु.१ हजार कोटी एवढया तात्पुरत्या कर्जाच्या रकमेची प्रतिपूर्ती वार्षिक ८ टक्के

व्याजदराने एका वर्षातच करण्याची अट शासनाने घातली आहे. म्हणजेच ही रु.१ हजार कोटी रुपयांची रक्कम सन २००९-१०च्या सुधारित अंदाजात कर्जरुपाने जमा म्हणून दाखवावयाची व त्याच सोबत तयार करण्यात येत असलेल्या सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात त्याच्या परतफेडीसाठी तेवढीच रक्कम महसुली रकमेतून खर्च म्हणून दाखवावयाची असा कागदोपत्री प्रयास करावा लागणार आहे. प्रत्यक्षात या कर्जाच्या रकमेचा विनिमयार्थ कोणताही उपयोग होऊ शकणार नाही. या शासन निर्णयाचा फेरविचार करुन या कर्जाच्या परतफेडीचा कालावधी या आधीच्या शासन निर्णयांच्या धर्तीवर १० वर्षे इतका वाढवून देण्याची व त्यानुसार सुधारित शासन निर्णय तातडीने निर्गमित करण्याची विनंती सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना करण्यात आली आहे.तथापि, सुधारित शासन निर्णय अद्याप प्रतीक्षाधीन आहे.

त्यामुळे सन २००९-१० चे सुधारित अंदाज तयार करताना शासनाकडून मंजूर करण्यात आलेल्या रु.१ हजार कोटी एवढया कर्जाचा विचार करण्यात आलेला नाही. या आर्थिक वर्षात काटकसरीचे उपाय योजण्यात आले आहेत. याबाबतचे परिपत्रक यापूर्वीच निर्गमित करण्यात आले आहे. आर्थिक काटकसरीच्या उपायांतर्गत महापालिका कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीतील सुधारणांमुळे द्यावयाच्या थकबाकीचे अधिदान पुढे ढकलणे, मोठमोठया प्रकल्पांच्या कामांच्या बाबतीत जे कंत्राट रकमा सुधारण्याचे प्रस्ताव मंजूर झाले आहेत त्याबाबतीत पुढील वर्षात deferred payment चा पर्याय स्वीकारणे, तसेच महसुली खर्चात १० टक्के बचत इत्यादी पर्यायांचा समावेश आहे. वरील उपाययोजनांमुळे सन २००९-१० या अर्थसंकल्पीय वर्षातील भांडवली खर्च अंदाजित व प्रत्यक्ष उत्पन्नाच्या मर्यादेत सीमित ठेवण्याच्या दृष्टीकोनातून चालू आर्थिक वर्षातील सुधारित अंदाज हे रु.५९७५ कोटी एवढया अंदाजित खर्चाच्या तुलनेत रु.४२२२ कोटी एवढया रकमेपर्यंत सीमित करण्याचे प्रस्ताविले आहे.

या पार्श्वभूमीवर मी आता सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये प्रस्ताविलेल्या काही महत्त्वाच्या उपक्रमांची ठळक वैशिष्टये नमूद करीत आहे.

## ६. नागरी पायाभूत सुविधांचे बळकटीकरण

**६.१**
**पर्जन्य जलनि:सारण**

सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात पर्जन्य जलवाहिन्यांच्या नित्यक्रमी परिरक्षणाकरिता रु.२६८.९६ कोटी इतकी तरतूद महसुली अर्थसंकल्प आणि ब्रिमस्टोवॅड प्रकल्प अहवालातील शिफारशींनुसार प्राधान्याने करावयाच्या विशिष्ट कामांसह भांडवली कामांकरिता रु. १०१३.५३ कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

शहर आणि उपनगरातील पाणी साचण्याचे प्रमाण कमीत कमी व्हावे आणि पर्जन्य जलाचा त्वरित निचरा व्हावा याकरिता पर्जन्य जलवाहिन्या व्यवस्थेची दर्जोन्नती करण्यावर प्रामुख्याने लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. त्यादृष्टीने

१) ब्रिटानिया पातमुख, रे रोड

२) गजधरबंद, सांताक्रुज

३) मोगरा नाला, अंधेरी आणि

४) माहुल खाडी,चेंबूर येथे प्रस्तावित जल उदंचन केंद्रांकरिता भूसंपादनाची प्रक्रिया सुरु आहे.

पर्जन्य जलवाहिन्या व्यवस्थेत सुधारणा करण्याकरिता सन २०१०-२०११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये प्रस्ताविलेल्या तरतुदी खालीलप्रमाणे आहेत :-

( रु. कोटीत )

| | |
|---|---|
| पर्जन्य जलवाहिन्यांचे बांधकाम / पुनर्बांधकाम / सुधारणा /पुनर्रचना/ ट्रेनिंग / रुंदीकरण करणे<br>१) ब्रिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत हाती घ्यावयाची कामे<br>अ) पर्जन्य जल उदंचन केंद्र उभारणे<br>ब) इतर कामे | <br><br><br>९९.५२<br>४३९.६५ |
| एकूण | **५३९.१७** |
| २) ब्रिमस्टोवॅड प्रकल्पात अंतर्भूत नसलेली कामे<br>अ) नाला / पर्जन्य जलवाहिन्यांलगतच्या बांधकामाचे पुनर्वसन करणे<br>ब) इतर कामे | <br><br>३४.१८<br>४४०.१८ |
| **एकूण** | ४७४.३६ |
| **एकूण प्रकल्प कामे** | **१०१३.५३** |

अशाच प्रकारे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील मिठी नदी आणि इतर नद्या / नाले व्यवस्था यांचे रुंदीकरण आणि ट्रेनिंग करण्यासाठी सन २०१०- ११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु. ५१ कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**६.२ रस्ते, पूल आणि वाहतूक प्रचालन**

**६.२.१ रस्त्यांची सुधारणा**

रस्त्यांच्या कामांसाठी सन २०१०-११च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये पुढीलप्रमाणे तरतुदी प्रस्ताविल्या आहेत:

- विद्यमान कंत्राटे व त्यात केलेल्या फेरफाराद्वारे हाती घेतलेल्या सिमेंट काँक्रिटचे रस्ते बांधून पूर्ण करण्यासाठी रु.४७८.४२ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

- स्थायी तांत्रिक सल्लागार समितीच्या अहवालानुसार उच्च दर्जाचे नवीन डांबरी रस्ते बांधणे, विद्यमान रस्त्यांच्या दुरुस्त्या करणे, विविध रस्त्यांचे रुंदीकरण आणि सुधारणा करणे, शहरातील रस्त्यांमध्ये सेट-बॅक लँड समाविष्ट करुन रस्त्यांचे रुंदीकरण करणे अशी विद्यमान कंत्राटे व त्यात केलेल्या फेरफाराद्वारे हाती घेतलेल्या कामांसाठी रु.४६१.०५ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

- बृहन्मुंबईतील पदपथांचे बांधकाम / पुनर्बांधकाम आणि सुधारणा करण्यासाठी रु.१०कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

- विविध रस्त्यांच्या चौकांमध्ये वाहतूक नियंत्रक बसविणे व ते सुस्थितीत ठेवणे, वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी रस्ता दुभाजक बसविणे, रस्त्यांवरील विद्युत प्रकाश व्यवस्थेचे परिरक्षण करणे व मार्गदर्शक फलक लावणे या कामांसाठी रु.२.५०कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

- रस्ता ओलांडण्यासाठी पूल आणि भुयारी मार्ग बांधण्याकरिता तसेच दुरुस्त्या आणि सुधारणांसाठी रु.२०२.०५ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.
- एम.यु.टी.पी. अंतर्गत परिसर वाहतूक नियंत्रण इत्यादींबाबतची कामे करण्यासाठी रु.२०कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.
- खार रेल्वे स्थानकाजवळ वाहतूक बेट बांधण्यासाठी रु.५ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

**६.२.२**
**पूल**

सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये जोगेश्वरी (दक्षिण) रेल्वेवरील पुलासाठी रु.५०कोटींची व जोगेश्वरी (उत्तर) रेल्वेवरील पुलासाठी रु.५०कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे. या पुलांमुळे जोगेश्वरी व गोरेगांव दरम्यानचा पूर्व व पश्चिम भाग रस्त्यावरील वाहतुकीच्या दृष्टीने जोडला जाईल. तसेच रेल्वेमार्गावरील फाटक क्र.२४, २५, २६, व २७ बंद झाल्याने रेल्वे वाहतूक देखील विनाथांबा सुरळीत होण्यास मदत होईल.

**६.३**
**पाणी पुरवठा प्रकल्प - पाण्याच्या स्त्रोतात वाढ**

राज्य शासनाने मा. डॉ. एम. अे. चितळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने केलेल्या शिफारशीनुसार, मुंबई शहराच्या पाणी पुरवठयात वाढ करण्याच्या दृष्टीने सुचविलेला ‘चार-मुंबई मध्य

वैतरणा पाणी पुरवठा प्रकल्प’ महानगरपालिकेने हाती घेतला आहे. त्यामुळे पाणी पुरवठयात प्रतिदिनी ४५५ द.ल.लि. एवढी अतिरिक्त वाढ होईल.

## गारगाई प्रकल्प

सध्याच्या पाणी पुरवठयात वाढ होण्याच्या दृष्टीने, गारगाई नदीतून जलस्त्रोताच्या उपलब्धीचा अभ्यास पूर्ण झाला आहे. सल्लासेवेसाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात रु.५ कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

तसेच समुद्राचे खारे पाणी गोडे करण्याचे प्रस्ताविले असून सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात त्यासाठी तरतूद प्रस्ताविली आहे.

## तीन-अ मुंबई पाणी पुरवठा प्रकल्प

तीन-अ मुंबई पाणी पुरवठा प्रकल्प पूर्णत्वास आला असल्यामुळे मुंबई शहराला ३५५ द.ल.लिटर्स एवढा अतिरिक्त पाणी पुरवठा उपलब्ध झाला आहे.

तीन-अ मुंबई पाणी पुरवठा प्रकल्पातील उर्वरित घटक कामांची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

१. पांजरापूर येथील प्रतिदिनी ४५५ द.ल. लिटर्स क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्राचे बांधकाम काम पूर्ण होऊन जलशुध्दिकरण केंद्र कार्यान्वित झाले आहे. परंतु परिरक्षण व अंतिम अधिदानासाठी सन २०१०-११ मध्ये रु.३ कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

२. मुलूंड-गोरेगांव जोडरस्ता/पूर्व द्रुतगती मार्ग जंक्शन पासून टागोर नगर, विक्रोळी (पूर्व) टप्पा-१ येथे ३००० मि.मी. अंतर्गत व्यासाची ६ कि.मी. लांबीची पोलादी जलवाहिनी टाकण्याचे काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ३.८ कि.मी. लांबीची जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. या कामासाठी सन २०१०-११ मध्ये रु.३५ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

३. टागोर नगर, विक्रोळी ते अमर महल येथे ३००० मि.मी. व्यासाची ७.६ कि.मी. लांबीची जलवाहिनी पुरविणे व टाकणे - टप्पा-२ चे काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ५.८७ कि.मी. लांबीची जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. या कामासाठी सन २०१०-११ मध्ये रु.६ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

४. पांजरापूर येथे नवीन क्लोरिनेशन प्लॅन्ट (Chlorination Plant) उभारण्याच्या प्रकल्पांतर्गत रु.७.५७ कोटीची स्थापत्य कामे सुरु असून यांत्रिकी व विद्युतीय कामांच्या मसुदा निविदा बनविण्याचे काम सुरु आहे. या कामासाठी सन २०१०-११ मध्ये रु.४.२५ कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**चार- मुंबई मध्य वैतरणा पाणी पुरवठा प्रकल्प**

चार-मुंबई मध्य वैतरणा पाणी पुरवठा प्रकल्पामध्ये खालील कामे समाविष्ट असून बहुतांशी कामांचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

१. मध्य वैतरणा धरणाचे बांधकाम आणि पोहोच रस्ते, यांची रु.६६२.५७ कोटीची कामे प्रगतीपथावर असून माहे एप्रिल २०१२ पर्यंत ही कामे पूर्ण होणे अपेक्षित आहे.यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात रु.२३० कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

२. धरणाकडे जाणाऱ्या मार्गातील रस्ते व पुलांचे बांधकाम करणे हे काम महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या मार्फत केले जात आहे. सदर काम प्रगतीपथावर असून मार्च २०११ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात रु.३.१५ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

३. मध्य वैतरणा प्रकल्पांतून प्राप्त होणाऱ्या पाण्याच्या वहनाकरिता अघईपासून गुंदवलीपर्यंत जलवाहिनी टाकणे या कामासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.८० कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे. या जलवाहिनीतून वहन करून आणलेले पाणी नवीन बोगदयामार्फत भांडुप संकुल येथे आणले जाणार आहे.

४. मध्य वैतरणा प्रकल्पातून प्राप्त होणाऱ्या पाण्याचे वहन करण्याकरीता मोडक सागर येथील जलाशयाजवळ अंतर्गामी मनोरा बांधणे व या मनोऱ्यापासून बेल नाला येथील विअर चेंबर पर्यंत ७.५ कि.मी. लांबीचा बोगदा बांधण्याच्या कामासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.६० कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

५. मध्य वैतरणा धरणातून प्राप्त होणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी भांडूप संकुल येथे ९०० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेचे नवीन जलप्रक्रिया केंद्र, क्लोरीन संपर्क टाकीसह बांधण्याच्या कामासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.१२० कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

६. भांडूप संकुल जलप्रक्रिया केंद्रामध्ये प्रक्रिया झालेले पाणी महासंतुलित जलाशयात आणण्यासाठी ९०० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेचे नवीन उदंचन केंद्र, उर्ध्वगामी जलवाहिनीसह बांधण्याच्या कामासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.२२ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

७. प्रक्रिया केलेले पाणी उदंचन केंद्राद्वारे उदंचित करुन साठविण्यासाठी भांडूप संकुल येथे १४० द.ल.लि. क्षमतेचा नवीन महासंतुलित जलाशय बांधण्याच्या कामासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.२२ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

८. मध्य वैतरणा धरणामुळे होणाऱ्या प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.६.९० कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे. यासाठी जमीन ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.

९. मध्य वैतरणा धरण बांधकामाकरिता नाशिक येथील सी.डी.ओ. संस्थेस सल्लागार म्हणून नेमण्यात आले आहे. या कामाची कंत्राट किंमत रु.८.२१ कोटी असून सल्लासेवेचे काम एप्रिल २०१२ पर्यंत पूर्ण होणे

अपेक्षित आहे. सल्लासेवेसाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात रु.१.५० कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

१०. याशिवाय, मध्य वैतरणा धरण प्रकल्पातील विविध कामांच्या प्रकल्प व्यवस्थापनासाठी सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे. सल्लागारांचे काम सुरु झाले आहे. या कामासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात या कामासाठी रु.४.५० कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**जलवितरण प्रणाली**

**६.३.१ वितरण व्यवस्था प्रणालीचा विस्तार व बळकटीकरण**

सन २००९-१० या वर्षात शहर विभागात १६ कि.मी., पश्चिम उपनगरात ३० कि.मी. आणि पूर्व उपनगरात ४९ कि.मी. अशा एकूण ९५ कि.मी. लांबीच्या मुख्य जलवाहिन्या टाकण्यात आल्या.

सन २०१०-११ मध्ये शहर विभागात ७ कि.मी., पश्चिम उपनगरात ३० कि.मी. आणि पूर्व उपनगरात ४७ कि.मी. अशा एकूण ८४ कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या टाकण्याचे प्रस्तावित

आहे. या कामासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.१३० कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

<u>जुन्या जलाशयांची पुनर्बांधणी</u>

**वरळी टेकडी जलाशय**

वरळी टेकडी जलाशय पूर्णपणे पाडून त्याची पुनर्उभारणी करण्याच्या कामासंदर्भात सल्लागारांच्या सल्लासेवेसाठी व जलाशयाच्या पुनर्बांधणीकरीता अंदाजित खर्च रु.१० कोटी असून सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात एकूण रु.५ कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे. सदर काम मार्च २०१२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**भांडूप टेकडी जलाशय**

भांडूप टेकडी जलाशय पूर्णपणे पाडून त्याची पुनर्उभारणी करण्याच्या कामास सुरूवात झाली असून त्याची कंत्राट किंमत रु.२४.९७ कोटी असून या कामासाठी १८ महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे. सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात एकूण रु.१८ कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**वेरावली टेकडी जलाशय**

या जलाशयाचे बांधकाम करण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात एकूण रु.२ कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**नवीन मालाड टेकडी जलाशय नं.३चे बांधकाम (क्षमता ५० द.ल.लि.)**

भांडूप-मालाड-चारकोप या पूर्ण झालेल्या बोगद्यामार्फत मालाड,बोरीवली,दहिसर परिसरात भांडूप महासंतुलित जलाशयातून पाणी पुरवठा करण्यात येतो.या भागामध्ये पाण्याची मागणी वाढल्यामुळे भांडूप महासंतुलित जलाशय लवकर रिकामा होतो व़ त्याचा शहरी विभागास होणाऱ्या पाणी पुरवठयावर परिणाम होतो.या कारणास्तव मालाड येथे अस्तित्वात असलेल्या दोन जलाशयांव्यतिरिक्त तिसरा जलाशय बांधणे प्रस्ताविले आहे.त्याचा अंदाजित खर्च रू.५० कोटी असून सन २०१०-११ या वर्षासाठी रु.७ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

**पाण्याची वाढती मागणी पूर्ण करण्याकरिता प्रस्तावित नवीन कामे**

१) पवई ते वेरावली व पवई ते घाटकोपर दरम्यानच्या तानसा मुख्य जलवाहिन्या खूप जुन्या झाल्यामुळे वारंवार फुटतात तसेच आसपास सुरु असलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास

प्राधिकरणाच्या विकासात्मक कामांमुळे परिरक्षणात अडचणी येतात म्हणून या दरम्यान दोन भूमिगत बोगदे बांधण्याचे प्रस्ताविले आहे. या कामाकरीता मे.टी.सी.ई. यांना सल्लागार म्हणून नेमले आहे. सन २०१०-११ मध्ये या कामाकरिता रु.३५ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

२) पांजरापूर येथे जलप्रक्रिया केंद्रातून वापर झाल्यावर उत्सर्जित केल्या जाणाऱ्या पाण्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या शिफारशीनुसार पुनर्प्रक्रिया करुन त्याचे उत्सर्जन करणे आवश्यक असल्याने जुन्या प्रक्रिया केंद्राच्या बाजूला नवीन प्रक्रिया केंद्र उभारण्याचे प्रस्ताविले आहे. या कामासाठी सल्लागारांची नियुक्ती केली असून या कामाचा अंदाजित खर्च रु.३० कोटी आहे. यासाठी सन २०१०-११ मध्ये रु.६ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

**तानसा मुख्य जलवाहिनी बदलणे**

तानसा ते तराळी या दरम्यान २७५० मि.मी. व्यासाची ४१.३५ कि.मी. लांबीची मृदू पोलादी जलवाहिनी टाकण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. हे काम (१) तानसा ते जांबोळी, (२) जांबोळी ते चिंचवली व (३) चिंचवली ते तराळी अशा तीन विभागांत विभागले आहे. या

प्रकल्पाचा कंत्राट खर्च रु.१४३१.८८ कोटी इतका आहे. सदर काम सुरु झाले असून, या कामासाठी सन २०१०-११ या वर्षासाठी रु.३८० कोटींची भरीव तरतूद प्रस्ताविली आहे.

**जुन्या जलवाहिन्यांची पुनर्स्थापना व पुनर्वसन**

(१) जुन्या जलवाहिन्यांची पुनर्स्थापना

सन २००८-०९ मध्ये ३५ कि.मी. लांबीच्या व सन २००९-१० मध्ये ६४ कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या बदलण्यात आल्या आहेत. सन २०१०-११ मध्ये ४४ कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या बदलण्याचे प्रस्ताविले असून या कामासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.६७.१०कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

(२) जुन्या जलवाहिन्यांचे पुनर्वसन

सन २००९-१० मध्ये ४७ कि.मी. लांबीच्या जलवाहिन्यांचे पुनर्वसन करण्यात येत असून सन २०१०-११ मध्ये ३३ कि.मी. लांबीच्या जलवाहिन्यांचे पुनर्वसन करणे प्रस्ताविले आहे. या कामासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.४०.५२ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

**६.३.२**
**महसूल न मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी करणे**

**'सुजल मुंबई अभियान'** या बॅनरखाली महसूल न मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी करण्याच्या व २४ X ७ पाणी पुरवठयाच्या उद्देशाने तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली **जल वितरण सुधारणा प्रकल्पांतर्गत** विविधांगी कार्यक्रम हाती घेण्यात आला असून सदर प्रकल्प ५ वर्षांत राबवावयाचा आहे.

या कार्यक्रमांतर्गत, अर्थसंकल्पीय वर्षात विभागीय कंत्राटदाराबरोबरच प्रभाग समिती-निहाय १६ कंत्राटदारांमार्फत तृतीय स्तरातील पाण्याची गळती कमी करण्याची कामे सुरु आहेत. सदर कामासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.१३२.२१ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

**६.३.३**
**गळती शोध व नियंत्रण विभागाचे सक्षमीकरण**

पाण्याची मागणी व पुरवठा यामध्ये वाढत जाणारी तफावत, असमान वाटप आणि पाण्याचा नवीन स्त्रोत उपलब्ध होण्यास लागणारा विलंब या पार्श्वभूमीवर जास्तीत जास्त पाण्याची बचत करण्याच्या दृष्टीने व्यापक प्रमाणावर गळती शोध व नियंत्रण कार्यक्रम हाती घेतला आहे. टप्पा-२ चे सुनियोजन करण्याच्या दृष्टीने पी, आर व डी विभागात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पथदर्शी प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने कामाचे आदेश देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. त्यानंतर इतर विभागात वरीलप्रमाणे

आधुनिक तंत्रज्ञान वापरुन कामे हाती घेण्यात येतील. गळती शोध व नियंत्रणासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.१०.५० कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

## जलमापके व फ्लो मीटर्स बसविणे

**६.३.४ परिणामकारक मागणी व्यवस्थापन उपाययोजना**

बृहन्मुंबई महानगरपालिकेने ०१.०३.२००८ पासून अधिकृत इमारतीमधील घरगुती ग्राहकांकरिता पाण्याच्या नियमित दरडोई वापरासाठी आणि पाण्याच्या वाजवी वापराला उत्तेजन देण्याकरिता, **दुरेक्ष दर पद्धती** लागू केली आहे. याकरिता, सर्व जलजोडण्यांवर नवीन जलमापके बसविण्यासह, त्यांचा वापर, देखभाल आणि जलमापकांचे वाचन (रिडींग) या कामांची जबाबदारी नामांकित संस्थांकडे सोपविण्यात आली आहे. सदर प्रकल्प दोन टप्प्यांत राबविण्याचे प्रस्ताविले आहे. पहिल्या टप्प्यामध्ये पथदर्शी प्रकल्प म्हणून शहर विभाग, पश्चिम उपनगरे व पूर्व उपनगरात विविध व्यासाची सुमारे ६००० जलमापके बसविण्यात आली आहेत आणि प्रत्येक संस्थेने पथदर्शी प्रकल्पात पुरवठा केलेल्या जलमापकांचे तांत्रिक तज्ञ समितीने मुल्यमापन केले. तांत्रिक मुल्यमापन समितीच्या शिफारशींनुसार, टप्पा-दोन हाती घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, ज्या विभागांना मुख्य

जलवाहिन्यांमधून थेट पाणी पुरवठा केला जातो अशा विभागांतील मुख्य जलवाहिन्यांवर फ्लो मिटर्स बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर कामासाठी सन २००९-१०च्या सुधारित अंदाजात फ्लो मीटर्ससाठी रु.८६ कोटीची तरतूद प्रस्ताविली असून, सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये जलमापके बसविण्यासाठी रु.४३० कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

**६.३.५ पावसाच्या पाण्याचे संवर्धन**

मुंबई महानगरपालिकेने सुध्दा पावसाच्या पाण्याचे संवर्धन करण्याचा प्रकल्प प्राधान्याने राबविण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबईत महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतींमध्ये पाणी संवर्धन प्रकल्पाची कार्यवाही सुरु केली आहे. सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात यासाठी रु.६६ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

**६.३.६ मुंबईतील अस्तित्वात असलेल्या विहिरींची साफसफाई करणे व कूपनलिका खोदणे**

मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या तलाव क्षेत्रात यंदा कमी पाऊस झाल्यामुळे मुंबई शहरात सध्या पाणी टंचाई निर्माण झाली आहे. अशा प्रकारच्या नैसर्गिक कारणामुळे निर्माण झालेल्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी सार्वजनिक तसेच खाजगी मालकीच्या विहिरींची साफसफाई करण्याचे त्याचप्रमाणे कुपनलिका खोदण्याचे काम हाती घेतले आहे. शहरात अस्तित्वात असलेल्या ५३६५ विहिरी व ६९८६ कूपनलिका स्वच्छ करणे यासाठी रु.५१ कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे. तसेच नवीन

कूपनलिका खोदण्याची कामेही प्राधान्याने हाती घेतली जाणार असून सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात या कामासाठी रु.२१ कोटी अशी दोन्ही मिळून एकूण रू.७२ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

**६.३.७**
**सुक्ष्म बोगदा पद्धती तंत्र अवलंबिणे**

जल अभियंता खात्याने सुक्ष्मबोगदा पद्धती तंत्राचा अवलंब करून जलवाहिन्या टाकण्याचे काम करण्याचे ठरविले आहे. सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात या कामासाठी रु.२९ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

**६.३.८**
**जल विद्युत निर्मिती**

मध्य वैतरणा प्रकल्पातून जलविद्युत निर्मिती करण्याचे उद्दीष्ट ठेवून त्यानुसार या कामाकरिता सल्लागारांची नेमणूक करण्यात आली असून त्यांचे काम प्रगतीपथावर आहे. यासाठी कंत्राट खर्च रु.३.७४ कोटी असून यासाठी सन २०१०-११ मध्ये रु.१.७५ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

**६.३.९**
**मुंबई शहराच्या सौंदर्यीकरणामध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने सहभागाचे आवाहन**

- मुंबई ३-अ प्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेल्या पिसे उदंचन केंद्र व पांजरापूर जलप्रक्रिया केंद्राचा परिसर सुशोभित करण्याच्या कामासाठी सन २०१०-११ मध्ये रु.१ कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.
- बगीचे सुशोभित व प्रेक्षणीय करण्यासाठी नियुक्त केलेल्या निष्णात सल्लागार मंडळाच्या मार्गदर्शनाखाली **भंडारवाडा जलाशय टेकडी**

येथील जॉन बाप्टीस्टा उद्यानाची वैशिष्ट्यपूर्ण संकल्पनेवर आधारीत निर्मिती करण्याच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून, दुसऱ्या टप्प्याचे काम प्रस्तावित आहे. या कामासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.५० लाखाची तरतूद प्रस्ताविली आहे.

- त्याचप्रमाणे **विहार तलावाचे सुशोभिकरण आणि सौंदर्यीकरण** करण्याचे काम पूर्ण झाले असून सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये रु.५० लाखाची तरतूद प्रस्ताविली आहे.
- **पवई तलावाच्या सुशोभिकरणाचे** काम प्रगतीपथावर असून यात अंतर्भूत असलेली तलावाची हद्द व आदि शंकराचार्य मार्ग यामध्ये विहार पथ, सुशोभित रस्ता, फर्निचर व संगीत कारंजे ही कामे सुमारे ९०% टक्के पूर्ण झाली असून उर्वरित कामे लवकरच पूर्ण होतील. यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.३ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

**६.३.१० सुरक्षिततेसंबंधी उपाययोजना**

दि. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा केंद्रांची सुरक्षितता वाढविण्यासाठी भांडुप संकुल, पिसे-पांजरापूर संकुल, महानगरपालिकेची धरणे व मुख्य जलवाहिन्यांच्या मार्गावर मोक्याच्या ठिकाणी रिमोट सी.सी.टी.व्ही. बसविण्याच्या

कामासाठी उपरोक्त उल्लेखित सर्व ठिकाणी सर्वेक्षण करण्यात आले असून त्यानुसार महानगरपालिका सुरक्षा अधिकारी व पोलिस अधिकारी यांचेशी विचारविनिमय करुन निविदा मागविण्यात येत आहेत.लवकरच या कामास सुरुवात होईल. यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.१५ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

६.३.११
**आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना पाणी पुरवठा करण्यासाठी टँकरची खरेदी**

लहान गल्ल्यांतून मोठे टँकर्स जाऊ शकत नसल्याने आपत्कालीन परिस्थितीत तेथील नागरिकांना पाणी पुरवठा करता यावा याकरीता ८ मिनी टँकर्सची खरेदी प्रस्ताविली असून, सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात रु.१ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे तसेच जुनी वाहने बदलण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात रु.१.९० कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे.

६.३.१२
**जल अभियंता खात्याच्या आस्थापनेवर नवीन पदे निर्माण करणे**

जल अभियंता खात्याच्या आस्थापनेवर कनिष्ठ अभियंत्यांची २२० पदे, दुय्यम अभियंत्यांची ७० पदे व श्रमिकांची २०१४ पदे निर्माण करण्यात आली. त्यापैकी या अर्थसंकल्पीय वर्षात कनिष्ठ अभियंत्यांची १०५ पदे व दुय्यम अभियंत्यांची २२ पदे भरण्यात आली. उर्वरित पदे भरण्यासंबंधीची कार्यवाही सुरु आहे. तसेच श्रमिकांची २०१४ पदे भरण्यासाठी प्रमुख कामगार अधिकारी यांना निर्देश देण्यात आले आहेत.

**६.४**
**मलनि:सारण जाळयांचा विस्तार**

केंद्र शासनाने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत (JNNURM) मान्यता दिल्याप्रमाणे मुंबई मलनि:सारण प्रकल्प (टप्पा-२, प्राधान्य कामे) घटक-१ नुसार खालील कामे हाती घेण्यात आली आहेत :

१) चरविरहीत तंत्रज्ञानाने मलनि:सारण वाहिन्या टाकण्याच्या कामासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.१६ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

२) पूर्व व पश्चिम उपनगरातील ३८ ठिकाणी पारंपारिक पध्दतीने मलनि:सारण वाहिन्या टाकणे व आवर्धन करण्याच्या कामांसाठी सन २०१०-११ या वर्षाकरिता रु.१६ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

३) मुंबई मलनि:सारण प्रकल्प (टप्पा-२)अंतर्गत चरविरहित पद्धतीने पश्चिम उपनगरात एका ठिकाणी व पूर्व उपनगरात विविध ठिकाणी मलनि:सारणवाहिन्या टाकण्याची कामे हाती घेण्यात आली असून सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात रु.५०कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

४) मुंबई शहरातील सुमारे १७ कि.मी. लांबीच्या जुन्या मलनि:सारण वाहिन्यांचे पाईप बर्स्टिंग पद्धतीने आवर्धन करण्याचे

काम प्रगतीपथावर असून, यासाठी सन २०१०-११ करीता रु.६ कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**मुंबई मलनि:सारण प्रकल्प (टप्पा-२ - प्राधान्य कामे) कामाकरिता सल्लागार सेवा**

- मुंबई मलनि:सारण प्रकल्पांतर्गत सल्लासेवेसाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात रु.६५ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

- मुंबई मलनि:सारण प्रकल्प (टप्पा-२) अंतर्गत सल्लागारांनी शिफारस केलेल्या कामांच्या अंमलबजावणीसाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.३० कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

- सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा पिण्याव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी वापर करण्याचे प्रस्ताविले असून सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात या कामासाठी रु.५.२० कोटींची तरतूद प्रस्ताविली असली तरी, हे प्रकल्प संकल्पचित्रे बनवा, बांधा, मालकीसह त्याचे प्रचालन करा व हस्तांतरित करा (DBOOT) या तत्वावर राबविण्याचे प्रस्ताविले आहे.

**६.४.१**
**जुन्या मलनि:सारण वाहिन्या व उदंचन केंद्रे यांचे पुनर्वसन व पुनर्स्थापना**

सध्या अस्तित्वात असलेल्या विशेषत: बऱ्याच जुन्या झालेल्या मलनि:सारण वाहिन्यांचे पुनर्वसन व पुनर्स्थापना करण्याचे काम हाती घेणे आवश्यक आहे.

**मलनि:सारण वाहिन्यांचे पुनर्वसन**

चरविरहीत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मनुष्य प्रवेश शक्य असलेल्या मलनि:सारण वाहिन्यांच्या पुनर्उभारणीसाठी सन २०१०-११ मध्ये रू.२५ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे व मनुष्य प्रवेश शक्य नसलेल्या मलनि:सारण वाहिन्यांच्या पुनर्उभारणीसाठी सन २०१०-११ मध्ये रू.१४ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

महापालिकेच्या अ ते ई विभागातील जुन्या मलनि:सारण वाहिन्यांच्या स्थितीचे सर्वेक्षण करण्याच्या सल्लासेवेसाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.६ कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे. तसेच महापालिकेच्या एफ् ते जी विभागातील जुन्या मलनि:सारण वाहिन्यांच्या स्थितीचे सर्वेक्षण करण्याच्या सल्लासेवेसाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.६ कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**मलनि:सारण उदंचन केंद्रातील यांत्रिकी आणि विद्युत कामे**

**६.४.२**
**मलनि:सारण उदंचन केंद्रांची गुणात्मक व संख्यात्मक सुधारणा करुन दर्जोन्नती**

मुंबई मलनि:सारण प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत वांद्रे आयपीएस उदंचन केंद्राकडे येणाऱ्या खोल संकलक बोगदयामध्ये मलजल घेण्यापूर्वी ५ ठिकाणांपैकी ४ ठिकाणी ट्रॅश रॅक्सचा (कचरा अडकण्याकरिता मोठया जाळया) पुरवठा करण्याचे काम पूर्ण झाले असून नवीन घाटकोपर उदंचन केंद्र येथील काम प्रगतीपथावर आहे. त्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात रू.५१ लाखाची तरतूद प्रस्ताविली आहे.

शिंपोली उदंचन केंद्राच्या वाढीवकरणाचे (ऑगमेन्टेशनचे) काम पूर्ण झाले असून ग्लोब मिल पॅसेज येथील यांत्रिकी व विद्युतीय कामांसाठी नवीन निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरू आहे. या कामांसाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.४५ लाखाची तरतूद प्रस्ताविली आहे.

**६.४.३**
**ग्लोबल वार्मिंगच्या धोक्याची दखल आणि प्रचालन खर्च कमी करण्यासाठी ऊर्जेचा काटेकोर वापर, ऊर्जेचे लेखा परीक्षण**

**ऊर्जेचे लेखा परीक्षण**

पाणी पुरवठा केंद्र त्याचप्रमाणे सांडपाणी उदंचन केंद्रामध्ये विजेच्या वापरापोटी होत असलेल्या प्रचालन खर्चात बचत करण्याच्या दृष्टीकोनातून ऊर्जा लेखापरिक्षणाचे कामासाठी नेमण्यात आलेल्या सल्लागारांचा अहवाल प्राप्त झाला असून त्यांच्या शिफारशींनुसार कामे प्रगतीपथावर आहेत. याकरिता सन २०१०-११ च्या

अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.३.४९ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

संत गाडगे महाराज उदंचन केद्रामध्ये सौरउर्जेवर आधारीत प्रकाशव्यवस्था उभारण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.२० लाखाची तरतूद प्रस्ताविली आहे.

**झोपडपट्टी स्वच्छता कार्यक्रम**

**६.४.४ झोपडपट्टी विभागांत स्वच्छता प्रणाली आणि सार्वजनिक शौचालयांची बांधणी/दुरुस्ती आणि पुनर्वसन.**

झोपडपट्टी स्वच्छता कार्यक्रम टप्पा-२ अंतर्गत, सन २०११ पर्यंत झोपडपट्टीतील रहिवाशांसाठी ३५००० अतिरिक्त शौचकूपे उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट आहे. यापैकी सध्या रु.३७.५० कोटी खर्चाच्या कामांची अंमलबजावणी सुरु आहे. प्रत्येक गटामध्ये ४७ शौचालये (९४० शौचकूपे) अशा सर्व परिमंडळातील पाच गटांसाठी २३५ शौचालये (४७०० शौचकूपे) बांधण्यासाठी निविदा मागविण्यात येऊन १८३ ठिकाणी शौचालये बांधण्यासाठी कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यापैकी ५७ ठिकाणची कामे (१११८ शौचकूपे) पूर्ण झाली असून ९५ ठिकाणची कामे प्रगतीपथावर आहेत व ३१ ठिकाणी कामे सुरु होणे अपेक्षित आहे. या कामांसाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.२० कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**विद्यमान शौचालयांची दुरुस्ती व पुनर्बांधणी**

अस्तित्वात असलेल्या शौचालयांची पुनर्बांधणी व दुरुस्तीची कामे हाती घेऊन त्यांच्या दैनंदिन प्रचालन व परिरक्षणाकरिता स्थानिक वस्ती पातळीवरील संस्थांना हस्तांतरित करण्यासाठी या संस्थांकडून स्वारस्य अभिव्यक्ती प्रस्ताव मागविण्याचे प्रायोजिले आहे. या कामासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.५ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

**६.४.५**
**मुंबई शहराच्या सौंदर्यीकरणामध्ये वाढ होण्याच्या दृष्टीने सहभागाचे आवाहन**

दादर उदंचन केंद्राच्या परिसरातील उद्यानाचे सुशोभिकरण, सौंदर्यीकरण व विकास करण्याचे काम सध्या प्रगतीपथावर असून सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात रू.१९ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.तसेच दादर उदंचन केंद्र येथे प्रशासकीय इमारतीच्या उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

- नागरिकांना आणि पर्यटकांना महाराष्ट्राच्या कला आणि संस्कृतीची ओळख व्हावी यासाठी लव्हग्रोव्ह उदंचन केंद्र येथे कला व वस्तुसंग्रहालय उभारण्याचे काम सन २००८-०९ मध्ये हाती घेतले आहे. सध्या हे काम प्रगतीपथावर असून या कामासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.१० कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**६.४.६**
**मलनि:सारण प्रचालनाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी कामगार कल्याण उपाययोजना**

मलनि:सारण जाळयाची सफाई करताना कर्मचाऱ्यांना, आरोग्यास अपायकारक अशा परिस्थितीला सामोरे जावे लागते. अशा प्रकारे कोणताही कर्मचारी सेवेत असताना दुर्दैवाने मृत्यू पावल्यास त्याच्या कुटुंबाला आर्थिक सहाय्य करण्याकरिता सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रू.५० लाखांची तरतूद सदर कल्याण निधीकरीता प्रस्ताविण्यात आली आहे.

## ७. सामाजिक पायाभूत सुविधांची आणि सुखसोयींची दर्जोन्नती

### ७.१ शैक्षणिक मूलभूत सुविधा

**७.१.१**
**प्राथमिक शिक्षण**

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६१ (क्यू) अन्वये ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण देणे हे महानगरपालिकेचे बंधनकारक कर्तव्य असून मुंबई महानगरपालिकेच्या एकूण आठ माध्यमांच्या १,१८९ प्राथमिक शाळांतून सुमारे ३,८८,९७६ विद्यार्थ्यांना १२,९२५ शिक्षकांतर्फे इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी पर्यंत शिक्षण दिले जात आहे.

**७.१.२**
**माध्यमिक शिक्षण**

महानगरपालिकेच्या ४९ शाळांमधून सुमारे ४२,३८० विद्यार्थ्यांना १,२६३ शिक्षकांतर्फे माध्यमिक शिक्षण दिले जाते. याशिवाय महानगरपालिका शाळांतील इ. ७वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण घेणे शक्य व्हावे यासाठी सन २००७-०८ पासून इयत्ता ८ वी चे नवीन वर्ग सुरु करण्यात आले आहेत. सन २००९-१० पर्यंत इयत्ता ८ वी, इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी पर्यंतचे एकूण ८९ नवीन माध्यमिक शाळांचे वर्ग सुरु असून या नवीन माध्यमिक शाळांच्या वर्गांमधून ११,४८४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यासाठी ४२३ शिक्षण सेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**७.१.३**
**विशेष मुलांकरिता शाळा**

विशेष मुले स्वतंत्र व स्वावलंबी बनून स्वत:च्या पायावर उभी राहू शकतील या दृष्टीकोनातून बृहन्मुंबई महानगरपालिका अशा विशेष मुलांसाठी ९ शाळा व ९ भाग शाळा अशा एकूण १८ विशेष शाळा चालविते. या शाळांमधून सुमारे ८८९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राज्य शासनाने विहित केलेल्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अशा विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक प्रशिक्षणसुध्दा दिले जाते.

**७.१.४**
**विशेष गुणवत्ताधारक मुलांकरिता कनिष्ठ विज्ञान महाविद्यालये**

'आयआयटीएन्स पेस' आणि 'युक्ती अकादमी' यांच्या संयुक्त सहभागाने शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून १) भवानी शंकर मार्ग शाळा, दादर २ ) रतनबाई महापालिका शाळा, मुलुंड (पश्चिम) आणि ३) दिक्षित रोड, विलेपार्ले (पूर्व) अशी ३ कनिष्ठ विज्ञान महाविद्यालये महानगरपालिकेने सुरु केलेली आहेत. या महाविद्यालयामधून महानगरपालिकेचे १३२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांच्या विशेष तयारीसाठीचा ५० टक्के आर्थिक भार महानगरपालिकेने स्विकारला आहे.

**७.१.५**
**शारीरिक शिक्षण**

अभ्यासाबरोबर विद्यार्थ्यांमध्ये विविध खेळांची आवड निर्माण व्हावी व त्यांची प्रकृती सुदृढ रहावी या उद्देशाने शिक्षण खात्याच्या शारीरिक शिक्षण विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी विविध खेळांचे व स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. यात प्रामुख्याने कबड्डी स्पर्धा, कुस्ती स्पर्धा, सांघीक कवायत स्पर्धा, योगासने, जिम्नॅस्टिक्स, बास्केटबॉल व लेझीम इत्यादींचा समावेश असतो. अहवालसाली मोतीलाल नगर माध्यमिक शाळेतील **कुमार अविनाश जाधव** हा विद्यार्थी बास्केटबॉल स्पर्धेत राष्ट्रस्तरावर सहभागी झाला. कुस्ती स्पर्धेत महानगरपालिका शाळांतील ११ विद्यार्थी राज्यस्तरावर सहभागी झाले.

सन २००९-१० मध्ये महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी युनिसेफच्या सौजन्याने ७ विभागांमधून S For D (Sports For Development Project) म्हणजेच खेळातून विकास प्रकल्प हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच स्वयंसेवी संस्था व महानगरपालिका शिक्षकांच्या प्रयत्नातून शालेय विद्यार्थ्यांना खेळातून दर्जेदार शिक्षण देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनीसुध्दा क्रिकेट या खेळात प्राविण्य मिळवावे म्हणून सन २००९-१० या वर्षापासून मुंबई क्रिकेट असोसिएशनचे पदाधिकारी व माजी कसोटीपटू श्री. प्रविण आमरे आणि श्री. मंगेश भालेकर हे खेळाची मैदाने उपलब्ध असलेल्या महानगरपालिका शाळांमधून मोफत क्रिकेटचे प्रशिक्षण देत आहेत.

## ७.२ शैक्षणिक दर्जामध्ये सुधारणा,गुणवत्ता विकास कार्यक्रम,विद्यार्थ्यांसाठी कल्याणकारी योजना

**७.२.१**
**मोफत पाठयपुस्तके**

मुंबई महानगरपालिकेच्या इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी तील सर्व विद्यार्थ्यांना “ सर्व शिक्षा अभियान” या प्रकल्पाच्या माध्यमातून पाठ्यपुस्तके मोफत पुरविण्यात येत असून महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांतील इयत्ता ९ वी व इयत्ता १० वीच्या सर्व विद्यार्थ्यांना महानगरपालिकेतर्फे पाठ्यपुस्तके व संदर्भिय पुस्तके

मोफत पुरविण्यात येतात. त्यासाठी सन २०१०-११ च्या माध्यमिक शाळांच्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.६९.१९ लाख तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**७.२.२**
**शैक्षणिक साहित्य व वस्तु यांचा मोफत पुरवठा**

महानगरपालिकेच्या पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय गणवेष, बुट, मोजे, दप्तर यांसह इतर शालोपयोगी शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात येते. तसेच स्काऊट-गाईड / आर.एस.पी. कॅडेटस् या विद्यार्थ्यांना महानगरपालिकेतर्फे गणवेष पुरविण्यात येतो. तसेच महानगरपालिकेच्या विद्यार्थ्यांना स्वच्छतेची सवय व्हावी यासाठी प्रत्येक शाळांमधील पाणी पिण्याच्या ठिकाणी साबण व टॉवेल्सही उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. या सर्व प्रयोजनांसाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात प्राथमिक शाळांकरिता रु.७४.५१ कोटी तर माध्यमिक शाळांसाठी रु.१०.३७ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**७.२.३**
**सुगंधी दुधाचा पुरवठा**

महानगरपालिका शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सुगंधी दुधाचा पुरवठा करण्याच्या महानगरपालिकेच्या निर्णयानुसार सन २००७ पासून महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांतील इयत्ता १ ली ते इयत्ता ३ रीचे विद्यार्थी वगळता सर्व विद्यार्थ्यांना

प्रत्येकी दर दिवशी २०० मि.ली. सुगंधी दुधाचे वाटप करण्यात येत आहे. तसेच इयत्ता १ ली ते इयत्ता ३ री तील सर्व विद्यार्थ्यांना नोव्हेंबर, २००९ पासून १२५ मि.ली. सुगंधी दूधाचे वाटप सुरु करण्यात आले आहे. त्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांत प्राथमिक शाळांकरिता रु.१०५.५३ कोटी तसेच माध्यमिक शाळांकरिता रु.१२.९१ कोटी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**७.२.४ विद्यार्थीनींसाठी उपस्थिती भत्ता**

मुंबई महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थिनींना शाळेत प्रत्येक दिवशी उपस्थित राहण्यास प्रोत्साहन मिळावे यासाठी त्यांना प्रतिदिन प्रति विद्यार्थीनी रु.१/- प्रमाणे उपस्थिती भत्ता देते. या योजनेमुळे विद्यार्थिनींच्या उपस्थितीत वाढ झाली आहे. यास्तव सदर योजना पुढील वर्षीही सुरु ठेवण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात प्राथमिक शाळांतील विद्यार्थिनींकरिता रु.४.०३ कोटी तसेच माध्यमिक शाळांतील विद्यार्थिनींकरिता रु.४६.९७ लाख एवढी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

सदर उपस्थिती भत्त्याचे वितरण इंडीयन बँकेमार्फत करण्यात येत असून इयत्ता २ री ते इयत्ता १० वी मधील मुलींच्या

नावे खाते उघडण्यास आवश्यक असणारी अनामत रक्कम न घेता खाते उघडण्यात आले असून त्या खात्यावर मुलींच्या उपस्थितीनुसार निधी वर्ग करण्यात येत आहे. गरजेनुसार विद्यार्थीनी या खात्यामधून पैसे काढू शकतील.

सन २००९-१० या वर्षापासून इयत्ता १ ली मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींच्या नावे विशेष निधीमध्ये एक रकमी रु.१,०००/- जमा करून ७ वर्षांनंतर त्याचे रु.२,०००/- एवढी रक्कम त्या विद्यार्थिनींना देण्याबाबतची प्रक्रिया सुरू आहे.

७.२.५
**संगणक प्रशिक्षण**

शासनाने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणे महानगरपालिका शाळांतील इयत्ता ५ वी ते इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षित शिक्षकांकडून संगणकाचे प्रशिक्षण देण्यात येते. संगणकाच्या अद्ययावत प्रशिक्षणासाठी महानगरपालिकेच्या निवडक १०० शाळांमधून परिपूर्ण अशा संगणक प्रयोगशाळा सुरु करण्यात येत आहेत. प्रत्येक शाळेकरिता २० संगणक संच असे एकूण २,००० संगणक संच खरेदी करण्यात आले असून संगणक प्रयोगशाळा तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. महानगरपालिका विद्यार्थ्यांची आकलन क्षमता वाढविणे, शब्दांचे स्पष्ट व अचूक उच्चार करणे, संभाषण कौशल्यात वाढ करणे,

इत्यादींसाठी गिल्डर टँक येथील भाषा विकास प्रकल्पांतर्गत भाषा प्रयोगशाळा कार्यरत आहे.

**७ .३ महानगरपालिका शाळांचे दर्जेदार हाऊसकिपींग**

महानगरपालिका शालेय इमारतींची स्वच्छता, परिरक्षण, सुरक्षा, शालेय विद्यार्थ्यांचे आरोग्य व प्रसन्न वातावरण निर्मिती तसेच बाह्य उपद्रवी व्यक्तींकडून होणारा उपद्रव टाळण्यासाठी खाजगी कंत्राटदारांद्वारे हाऊसकिपींग व सुरक्षा माहे फेब्रुवारी, २००९ पासून करून घेण्यात येत आहे. या योजनेमुळे शाळांमधून होणारी चोरी, वस्तुंची मोडतोड थांबली असून उपद्रवी व्यक्तिंपासूनचा त्रास बंद झाला आहे. सदर योजना पुढे राबविण्यासाठी सन २०१०-११च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.४८.३२ कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**७.४ शालेय पायाभूत सुविधांचे बळकटीकरण आणि दर्जोन्नती**

**७.४.१ महानगरपालिका शालेय इमारतींची दुरूस्ती**

महानगरपालिकेच्या शालेय इमारतींची दुरूस्ती, परिरक्षण, दर्जोन्नती व बळकटीकरण यांसाठी माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार गठीत करण्यात आलेल्या धनुका समितीच्या शिफारशींनुसार शहर, पश्चिम उपनगरे आणि पूर्व उपनगरे मिळून आतापर्यंत एकूण १३१ शालेय इमारतींच्या

संरचनात्मक आणि मोठया दुरूस्त्यांची कामे दर्शनी भागाच्या सुशोभिकरणासह पार पाडण्यात आली.

शालेय इमारतींच्या १७९ शाळांच्या प्राधान्यक्रम यादीमधून ३९ महानगरपालिका शालेय इमारतींच्या मोठया दुरूस्त्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत. उर्वरित १४० शालेय इमारतीपैकी ४८ शालेय इमारतींची कामे अग्रक्रमाने हाती घेण्यात येणार आहेत. तसेच उप नगर अभियंता (शाळा पायाभूत सुविधा कक्ष) यांच्या अधिपत्याखालील, नियुक्त परिमंडळीय कंत्राटदारांकडून शहर, पश्चिम व पूर्व उपनगरांतील शालेय इमारतींच्या तातडीच्या स्वरूपातील दुरूस्त्यांची कामे करण्यात येणार आहेत.

**७.४.२ चक्रीवादळ संरक्षक निवारे**

बृहन्मुंबईतील नागरिकांना चक्रीवादळासारख्या नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण मिळावे या उद्देशाने शासनाच्या आदेशानुसार महानगरपालिका शालेय इमारतींच्या आरक्षित भूखंडावर १) वर्सोवा, के/पश्चिम विभाग २) मालाड गाव, पी/उत्तर विभाग ३) कुर्ला (पश्चिम), एल विभाग आणि ४) मुलूंड (पश्चिम), टी विभाग या चार ठिकाणी शाळा / चक्रीवादळ संरक्षक निवारे बांधण्याचे प्रस्ताविले असून सदर खर्चाची प्रतिपूर्ती जागतिक बँकेकडून होणार आहे. उपरोक्त सर्व कामांसाठी सन

२०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.१५५.६९कोटी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**७.४.२ आय.एस.ओ. प्रमाणपत्र**

महानगरपालिका शाळा आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळण्यास पात्र ठरण्याच्यादृष्टीने शाळांचे परिरक्षण, स्वच्छता, पर्यवेक्षण इत्यादी कामांसाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळण्याकरिता ठरवून दिलेल्या निकषांची पूर्तता करून प्रत्यक्ष आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळविण्यासाठी व त्याचे नूतनीकरण करण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात प्राथमिक शाळांसाठी रु.२५ लाख तर माध्यमिक शाळांसाठी रु.४६.२० लाख इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

## ७.५ आरोग्य आणि वैद्यकीय सेवा

**७.५.१ प्राथमिक स्तरावरील आरोग्य सेवा व सुविधा**

प्राथमिक आरोग्य सेवा आणि वैद्यकीय सेवा बळकट करण्यासाठी सन २०१०-११ च्या महसुली अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.१४७१.४५ कोटींची तर भांडवली अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.४१८.४६ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे. यामधील महत्त्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत :-

- मुंबई शहरातील महानगरपालिकेच्या आणि खाजगी स्मशानभूमींमध्ये मुस्लीम व हिंदू समाजासाठी लाकडाचा मोफत पुरवठा करण्याची सुविधा देण्याकरिता रु.६.५५ कोटींची एकत्रित तरतूद प्रस्ताविली आहे.
- प्रत्येक नगरसेवकाच्या प्रभागात स्वतंत्र धूम्रफवारणी यंत्र निश्चितपणे देता यावे व ज्या विभागात मलेरिया प्रादुर्भावाच्या तक्रारी जास्त आहेत त्या विभागात वाहन विराजित धूम्रफवारणी यंत्राचा कायमस्वरुपी वापर व्हावा याकरिता रसायनाच्या उपलब्धतेसाठी रु.१८.३४ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.
- कस्तुरबा रुग्णालयाच्या परिसरात व सार्वजनिक आरोग्य खात्याचे मुख्यालय म्हणून आरोग्य भवन बांधण्याकरिता खाजगी वास्तुशास्त्रज्ञ सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून आर्थिक अंदाजांसहितचे आराखडे लवकरच तयार होतील. या प्रकल्पाकरिता रु.१.४९ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.
- केंद्र शासनाच्या अधिसूचनेद्वारे महानगरपालिका आयुक्तांची मुंबई जिल्ह्यासाठी मुख्य जनगणना अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जनगणनेच्या कामासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.२.५५ कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**उपनगरीय रुग्णालयांचा विकास**

**७.५.२**
**माध्यमिक स्तरावरील आरोग्य सेवा**

पूर्व व पश्चिम उपनगरात रुग्णालयांचे पुनर्बांधकाम करण्यासाठी व नवीन रुग्णालये सुरु करण्यासाठी पुढे दर्शविल्यानुसार तरतुदी प्रस्ताविण्यात आल्या आहेत :-

(रुपये कोटीत)

| | |
|---|---|
| अ) कांदिवली येथील शताब्दी रुग्णालयाचा पुनर्विकास | १०.०० |
| ब) कूपर रुग्णालयाचे पुनर्बांधकाम | ५०.०० |
| क) बोरीवली (प) येथील भगवती रुग्णालय संकुलाचा पुनर्विकास | ५.०० |
| ड) जोगेश्वरी (पूर्व) येथील आजगांवकर प्लॉटचा २६६ रुग्णशय्या क्षमतेचे ट्रॉमा रुग्णालय बांधण्याकरिता विकास | ४०.०० |

कांदिवली येथील शताब्दी रुग्णालयाच्या पुनर्विकासाचे काम आगामी वर्षात तसेच कूपर रुग्णालयाचे पुनर्बांधकाम व आजगांवकर प्लॉटचा विकास हे प्रकल्प पुढील दोन वर्षांत पूर्णत्वास नेण्याचे प्रस्ताविले आहे.

**महानगरपालिका रुग्णालयांसाठी यंत्रे व संयंत्रांची खरेदी**

**७.५.३**
**उच्चतम दर्जाच्या आरोग्य सेवा**

महानगरपालिका प्रमुख रुग्णालयांसाठी अत्याधुनिक यंत्रे व संयंत्रे खरेदी करण्यासाठी सन २०१०-११च्या अर्थसंकल्पीय अंदाजांत पुढीलप्रमाणे तरतुदी प्रस्ताविण्यात आल्या आहेत:-

(रुपये कोटीत)

| | |
|---|---|
| रा.ए.स्मा. रुग्णालयासाठी यंत्रे व संयंत्रे खरेदीसाठी | २५.०० |
| रा.ए.स्मा. रुग्णालयासाठी मल्टीस्लिड सी.टी. खरेदी करण्यासाठी | ५.०० |
| लो.टि.म.स. रुग्णालयासाठी सी.टी. स्कॅन खरेदी करण्यासाठी | ५.०० |
| लो.टि.म.स. रुग्णालयासाठी यंत्रे व संयंत्रे खरेदीसाठी | १०.०० |
| नायर रुग्णालयासाठी सी.टी. स्कॅन खरेदी करण्यासाठी | ५.०० |
| लो.टि.म.स. रुग्णालयातील कार्डीओलॉजी डिपार्टमेंटसाठी सेंट्रल मॉनिटरींग स्टेशनसह आय.सी.सी.यु. बेड साईड मल्टीपॅरा मॉनिटर आणि पोर्टेबल इको कलर डॉप्लर खरेदी करण्यासाठी | १.०० |
| नायर रुग्णालयासाठी यंत्रे व संयंत्रे खरेदीसाठी | ९.०० |
| नायर रुग्णालयासाठी डिजीटल रेडिओग्राफी इक्वीपमेंट खरेदी करण्यासाठी | २.५० |
| नायर रुग्णालयासाठी एच.डी.आर. ट्रिटमेंट प्लॅनिंग सिस्टीम खरेदी करण्यासाठी | २.५० |

महानगरपालिका रुग्णालयांसाठी अत्याधुनिक यंत्रे व संयंत्रे खरेदी करण्यासाठी केलेल्या उपरोक्त तरतुदींव्यतिरिक्त नव्याने पुढे नमूद केलेल्या बाबींसाठी देखील यथोचित तरतुदी प्रस्ताविण्यात आल्या आहेत :-

(रुपये कोटीत)

| | |
|---|---|
| १) रा.ए.स्मा. रुग्णालयाच्या इमारतीचे नूतनीकरण (वारसावास्तू) | ४०.०० |
| २) गो.सु.वैद्यकीय महाविद्यालय इमारतीच्या व्यापक दुरुस्त्या / पुनर्स्थापनेची कामे (वारसावास्तू) | १०.०० |
| ३) गो.सु.वैद्यकीय महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे वसतीगृह कार्डियाक व न्युरोसायन्स केंद्र आणि इतर उपक्रमांसाठी नवीन इमारतीचे बांधकाम | १०.०० |
| ४) नायर रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण कक्षाच्या दर्शनी भागांचे नूतनीकरण आणि तातडीच्या वैद्यकीय सेवा केंद्राची सुधारणा आणि दर्जोन्नती | १५.०० |
| ५) लो.टि.म.स. रुग्णालयातील नवीन ओपीडी, एमओटी, शवागार इमारत (तळमजला अधिक दोन मजले फक्त) सुरु करण्यासाठी वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक करणे आणि फर्निचर, फिक्चर्स व संलग्न उपकरणाचा पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वयन | २.०० |

## ७.६ सार्वजनिक वाहनतळ

**७.६.१**
**भूमिगत वाहनतळ**

महापालिकेने शहरातील मुख्यत: दक्षिण मुंबईतील वाहनांच्या पार्किंगचा प्रश्न काही अंशी तरी कमी व्हावा व रस्त्यांवरील पार्किंग कमी होऊन वाहतूक सुरळीत व्हावी म्हणून भुयारी वाहनतळ निर्मितीची योजना आखली आहे. त्यानुसार महात्मा फुले मंडई येथे (दोन ठिकाणी) व हुतात्मा चौक ते रिगल सिनेमा जंक्शन येथे (पाच ठिकाणी) भूमिगत वाहनतळ बांधण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यासाठीच्या निविदा अर्जांची छाननी होऊन मेसर्स व्हेन्यू इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीची वरील दोन्ही ठिकाणच्या कामांसाठी निवड करण्यात आली आहे. त्यानुसार मेसर्स व्हेन्यू इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड सदर वाहनतळांचे बांधकाम करुन त्यांचे प्रचालन व परिरक्षण पुढील ३० वर्षांच्या कालावधीकरिता करणार आहेत. त्याकरिता मेसर्स व्हेन्यू इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांना अर्थसहाय्य (subsidy) म्हणून रिगल सिनेमाकरिता रु.२९०.७० कोटी व महात्मा फुले मंडईकरिता रु.१५४.४२कोटी इतके महापालिकेकडून देण्यात येणार आहेत. या दोन्हीकरिता करावयाच्या सुविधा कराराचे (Concession Agreement) काम सध्या चालू आहे. सदर वाहनतळांसाठी आगामी वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजांत रु.१७३ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे. महापालिकेकडील

निधीची उपलब्धता व आर्थिक स्थिती लक्षात घेऊन सध्या रिगल सिनेमा ते हुतात्मा चौक येथील काम सुरु करण्याचे ठरविण्यात आले आहे व महात्मा फुले मंडई येथील काम महापालिकेच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेऊन पुढे विचारात घेण्यात येईल.

७.७ **प्रेक्षागृहे/ नाटयगृहे**

सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये पुढील क्रीडा केंद्रे / प्रेक्षागृहे/नाटयगृहे यांच्या संरचनात्मक दुरुस्त्या/सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

(रुपये कोटीत)

| | |
|---|---|
| • अण्णाभाऊ साठे खुले नाटयगृह बंदिस्त करणे | १.०० |
| • दीनानाथ मंगेशकर नाटयगृह आणि बाजार इमारतीच्या आवश्यक संरचनात्मक दुरुस्त्या | २.५० |
| • कुंदनलाल सैगल खुले नाटयगृह आणि कर्मचारी निवासस्थान इमारतीच्या मुख्य दुरुस्त्या | २.०० |

७.८ **बाजार**

७.८.१ **महानगरपालिका मंडयांच्या व्यापक दुरुस्त्या**

मुंबई शहरामध्ये एकूण १४३महापालिका मंडया आणि १६ खाजगी अनुज्ञापित मंडयांची सुविधा नागरिकांना उपलब्ध आहे. महानगरपालिका मंडयांना आधुनिक खाजगी मंडयांच्या दर्जाचे स्वरुप देण्याकरिता मान्यताप्राप्त मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचा पुनर्विकास आणि आधुनिकीकरण करण्यासाठी तसेच

पुनर्बांधणी व नवीन बांधकामे इत्यादींकरिता रु.४०.२० कोटींची तर जुन्या मंडयांच्या व्यापक दुरुस्त्यांसाठी रु.५० कोटींची तरतूद सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये प्रस्ताविली आहे. त्यापैकी महत्त्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत :-

(रुपये कोटीत)

| | |
|---|---|
| • के/पूर्व येथील पूनम नगर मंडईची पुनर्बांधणी करणे | २५.०० |
| • पी/दक्षिण विभागातील टोपीवाला मंडईच्या शेडच्या ठिकाणी मंडईसाठी इमारत | ८.०० |

**७.८.२**
**महात्मा फुले मंडई इमारतीचे संवर्धन**

वारसा वास्तु श्रेणी-१चा दर्जा असलेल्या महात्मा फुले मंडईच्या इमारतीच्या सर्वसमावेशक दुरुस्त्या /पुनर्स्थापना आणि संवर्धन ही कामे तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली हाती घेण्याचे नियोजिले आहे. त्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.५ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

**७.९**
**देवनार पशुवधगृहाचे आधुनिकीकरण**

देवनार पशुवधगृहाच्या आधुनिकीकरणाचा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांत रु.१० कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे. सदर

आधुनिकीकरणाच्या विविध कामांसाठी निविदा मागविण्याची कार्यवाही सुरु आहे.

## ८ स्वच्छता आणि शहर पर्यावरणामध्ये सुधारणा

**८.१**
**स्वच्छता**

स्वच्छता ही आरोग्यदायी शहराचा पाया असून ती मूलभूत स्वरुपाची गरजही आहे. या दृष्टीकोनातून या बाबतच्या उपक्रमाला बळकटी आणण्यासाठी सन २०१०-११ मध्ये पुढील योजना राबविण्यात येतील.

**८.१.१**
**घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे**

मुंबई शहराची शून्य कचरा स्थिती ठेवण्यासाठी महसुली अर्थसंकल्पीय अंदाजांत रू.१५६ कोटी एवढी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे. घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्याच्या पध्दतीत ओला व सुका कचरा वेगवेगळा गोळा करण्यात येतो. त्यासाठी स्वतंत्र कचरापेट्या, जैव विघटनशील पिशव्या आणि सुका कचरा गोळा करण्यासाठी विभागवार वेगळी वाहनांची व्यवस्था प्रस्ताविण्यात आली आहे.

**८.१.२**
**मोठया प्रमाणावर कचऱ्याची साठवण होणारी संकलन केंद्रे बंद करणे**

सन २०१०-११ या वर्षात १० ठिकाणी स्टेशनरी कॉम्पॅक्टर्सची उभारणी करण्याचे प्रस्ताविले आहे त्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांत रु.३.०५ कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे. जास्त प्रमाणात कचरा गोळा होणाऱ्या

केंद्रांवर अशा प्रकारची स्टेशनरी कॉम्पॅक्टर्सची उभारणी केली असता कचऱ्याचा घाणेरडेपणा दृष्टीस पडत नाही. तसेच दुर्गंधीदेखील येत नाही आणि भटक्या प्राण्यांचा उपद्रवही होत नाही.

८.१.३
**नवीन आधुनिक स्थानांतरण केंद्रे**

महालक्ष्मी स्थानांतरण केंद्राच्या धर्तीवर गोराई, वर्सोवा आणि कुर्ला स्थानांतरण केंद्रे येथे नवीन आधुनिक बंदिस्त अशी स्थानांतरण केंद्रे उभारण्यात येत आहेत. या पध्दतीमध्ये दाबून गच्च भरलेला मोठ्या प्रमाणातील कचरा बंदिस्त कंटेनरमधून क्षेपणभूमीवर वाहून नेला जाईल. या पध्दतीमध्ये ज्या संकलन केंद्रावर कचरा गोळा केला जाईल त्या संकलन केंद्रासभोवतालची जागा बंदिस्त असेल व यामुळे गलिच्छ दृश्य नजरेस पडणार नाही. या कामाचे स्वरूप हे पध्दतशीर आणि आरोग्यदायी असेल. यासाठी सन २०१०-११ च्या भांडवली अर्थसंकल्पीय अंदाजांत रू.९ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

८.१.४
**स्वच्छता मोहीम**

स्वच्छता मोहीमेअंतर्गत शून्य कचरा स्थिती राखण्यासाठी दत्तक वस्ती योजना, स्वच्छ परिसर योजना आणि मॅनिंग मॉपींग अशा योजना विविध विभागांमध्ये राबविण्यात येत आहेत. या कामांसाठी सन २०१०-११ च्या महसुली अर्थसंकल्पीय अंदाजांत

अनुक्रमे रू.६१.०४ कोटी, रू.२५ कोटी आणि रू.२१.४६ कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

८.१.५
**क्षेपणभूमींचा विकास**

न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार गोराई क्षेपणभूमी येथे शास्त्रोक्त पध्दतीने क्षेपणभूमी बंद करण्याचे काम पूर्ण झाले आहे. नागरी घन कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम, २००० अन्वये १५ वर्षांसाठी प्रचालन आणि परिरक्षणाचे काम सुरू झाले आहे. कचऱ्यापासून वीज निर्मिती करण्याचा समावेशही प्रचालन आणि परिरक्षणात अंतर्भूत करण्यात येणार आहे. देवनार, मुलुंड, कांजुर मार्ग या क्षेपणभूमींवर शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्यावरील प्रक्रिया /उपाय व क्षेपणभूमीचा विकास हे प्रकल्प खाजगी कंत्राटदारास सार्वजनिक/खाजगी भागीदारी तत्त्वावर देण्यात आले आहेत. यासाठी जवाहरलाल नेहरू अर्बन रीन्युअल मिशन (JNNURM) यांच्या निधीतून अंशत: निधी प्राप्त होत आहे. देवनार क्षेपणभूमीचा काही भाग शास्त्रोक्त पध्दतीने बंद करण्याच्या कामास सुरूवात करण्यात आलेली आहे. क्षेपणभूमी बंद करणे/विकास करणे या प्रकल्पासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांत रू.१७० कोटींची तरतूद प्रस्ताविलेली आहे.

**८.१.६**
**जैव वैद्यकीय कचरा**

देवनार क्षेपणभूमीजवळ जैव वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे मध्यवर्ती केंद्र उभारण्यात आले आहे. जैव वैद्यकीय कचरा गोळा करणे, वाहून नेणे आणि त्यावर प्रक्रिया करण्याचे कंत्राट मे. एसएमएस इन्व्होक्लीन प्रा.लि. यांना देण्यात आले आहे. या केंद्राची क्षमता प्रती दिन १० मे.टन जैव वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची आहे. केंद्र कार्यान्वित झालेले असून प्रक्रिया करण्याचे काम सुरू झाले आहे. यासाठी सन २०१०-११ च्या महसुली अर्थसंकल्पीय अंदाजांत रु.३.५० कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

**८.१.७**
**समुद्रकिनाऱ्यांची साफसफाई**

मुंबई शहर हे समुद्र किनाऱ्यांनी वेढलेले आहे. त्यापैकी बरेचसे समुद्र किनारे पर्यटन स्थळे आहेत. त्यामुळे या पर्यटन स्थळांना स्वच्छतेची सेवा पुरविली जात आहे. गिरगांव, दादर, माहीम, वर्सोवा, गोराई, जुहू या महत्त्वाच्या समुद्र किनारी स्वच्छतेची सेवा यापूर्वीच पुरविण्यात आली आहे. शहर विभागातील समुद्र किनारी दुर्गम भागात समुद्रातील भरती / ओहोटीमुळे वाहून येणारा कचरा अडकून दुर्गंधी पसरते अशा ठिकाणचा कचरा काढण्यासाठीसुध्दा स्वच्छतेची सेवा पुरवावी लागणार आहे. यासाठी सन २०१०-११ च्या महसुली अर्थसंकल्पीय अंदाजांत रू.६.५६ कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**८.१.८**
**पूर्व व पश्चिम द्रूतगती मार्गावर शौचालये बांधणे**

पूर्व व पश्चिम द्रुतगती मार्गावरील झोपडपट्टीत राहणारे रहिवाशी या द्रुतगती महामार्गांच्याकडेला शौचास बसतात. हे आरोग्याच्यादृष्टीने घातक तर आहेच पण यामुळे मुंबई शहराची प्रतिमादेखील खराब होते. द्रुतगती महामार्गाच्याकडेला प्रत्येक एक किलोमीटरच्या अंतरावर शौचालय बांधण्याकरिता जागा निश्चित करण्याचा प्रयत्न चालू असून महामार्ग अधिकाऱ्यांशी याबाबत पत्रव्यवहार चालू आहे. यासाठी सन २०१०-११ च्या भांडवली अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**८.२**
**इको - हाऊसिंग**

महानगरपालिकेने सुरु केलेल्या सृष्टीसानिध्य समर्पक गृहनिर्माणामुळे (इको-हौसिंग गृहनिर्माणामुळे) मूलभूत पर्यावरणास अनुकूल प्रणाली, ऊर्जाक्षम उत्पादने (एनर्जी एफिशियन्ट प्रॉडक्टस्) आणि तंत्रज्ञान यांचा समावेश बांधकाम उद्योगामध्ये होण्यास चालना मिळाली आहे. सदर उपक्रम गृहनिर्माण क्षेत्राकरिता लागू असून ही विकासक व बांधकाम व्यावसायिक यांच्यासाठी ऐच्छिक योजना आहे. ही योजना नवीन तसेच जुन्या इमारतींकरिताही राबविता येते.

सदर इको हौसिंगची संकल्पना जनमानसात प्रभावीपणे पोहचण्यासाठी या संदर्भात अधिकाधिक कार्यक्रम प्रायोजित केले

जातील, जेणेकरुन सर्वसामान्य जनतेला या संकल्पनेच्या अंमलबजावणीत सहभागी होण्याकरिता उद्युक्त केले जाईल.

मुंबई महानगरपालिका अशा सृष्टीसानिध्य समर्पक गृहनिर्माण योजनांमधील (इको हौसिंग गृहनिर्माण) भोगवटाधारक ग्राहकांना तसेच विकासकांना प्रोत्साहन देईल. ग्राहकांना प्रकल्पाच्या दर्जानुसार (रेटिंग) मालमत्ता करात १०% ते ५०% वजावटीचा लाभ मिळू शकेल तर विकासकांना विकास शुल्कात १०% ते ५०% सवलत मिळू शकेल, अशी तरतूद विद्यमान अधिनियमांमध्ये करण्यासाठी एक प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. तथापि ही बाब शासनाच्या मंजुरीसापेक्ष असेल. दुरुपयोग टाळण्याकरिता प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरच या सवलतींचा विचार होऊ शकेल असे प्रस्ताविले आहे.

इको-हाऊसिंग कार्यकमांतर्गत ज्या इमारतींचे मूल्यांकन झाले आहे त्यांच्या बाबतीत मालमत्ता कराची रक्कम अंशतः परत करण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.५कोटींची तर इको-हाऊसिंग कार्यक्रमांतर्गत ज्या निवासी प्रकल्पांचे मूल्यांकन झाले आहे त्यांच्या बाबतीत विकास आकारांच्या रकमेच्या अंशतः परताव्यासाठी तरतूद प्रस्ताविली आहे.

**८.३**
**वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प**

मुंबईच्या हरित स्वरुपात वाढ करण्यासाठी सन २०१०-११ च्या वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्पांतर्गत पुढील उपक्रम हाती घेण्यात येतील.

- रस्त्यांच्या कडेला व इतर मोकळया जागांवर वृक्षरोपण करण्यात येईल. तसेच महानगरपालिकेच्या इतर खात्यांकडे उपलब्ध असणाऱ्या मोकळया जागांवरदेखील वृक्ष लागवड करण्यात येईल.
- सन २०१०-११ या वर्षामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिका व वृक्ष प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने १५ वे झाडे, फुले, फळे, भाज्या इत्यादींचे प्रदर्शन भरविण्यात येईल. जेणेकरुन झाडांच्या मानवी हितासाठी होणाऱ्या उपयोगाबद्दल समाजामध्ये जागरुकता निर्माण होण्यास मदत होईल.
- मुंबईतील नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयी जागरुकता निर्माण व्हावी या उद्देशाने उद्यान विद्या विषयावरील कार्यशाळेचेही आयोजन करण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक प्रभागात प्रदर्शन भरविण्याचे उद्दिष्ट आहे.
- शहर आणि उपनगरांमधील विद्यमान वृक्षांचे जतन करण्यासाठी आणि नवीन वृक्षांची लागवड व परिरक्षण करण्याकरिता सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांत रु.५०.५२ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

## ९. शहराचे सुशोभिकरण आणि पर्यटन स्थळांची निर्मिती

मुंबई जागतिक दर्जा प्राप्त करण्याच्या दिशेने प्रगती करीत असल्यामुळे या शहराच्या सुशोभिकरणामध्ये वाढ करण्याचे मागील २ ते ३ वर्षांपासून प्रयत्न सुरु आहेत. त्या अनुषंगाने शहराच्या सुशोभिकरणाची हाती घेतलेली पुढील कामे पुढील वर्षात पूर्ण करण्यात येतील.

### ९.१ उद्याने, क्रीडांगणे, मनोरंजन मैदाने

**९.१.१ विद्यमान उद्यानांची दर्जोन्नती आणि नियोजनबध्द सुंदर उद्यानांचा व हरित पट्टयांचा विकास**

- के/पूर्व विभागातील शहीद विजय साळसकर मैदानासाठी रु.५ लाख तरतूद प्रस्ताविली आहे.
- उद्याने / मनोरंजन मैदाने आणि इतर मोकळया जागा सुशोभित करण्याच्या विशेष प्रकल्पांतर्गत मुंबईमध्ये विशिष्ट संकल्पनेनुसार थीम गार्डन विकसित करण्याची योजना यापूर्वीच कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेतील काही महत्त्वाचे प्रकल्प खालीलप्रमाणे आहेत :-

  १. एफ/दक्षिण विभागातील एस.एस.राव मार्ग येथील आर.जी. प्लॉटवर थीम गार्डन विकसित करणे

  २. एफ/उत्तर विभागातील फाईव्ह गार्डन मंचरजी जोशी उद्यान

३. जी/दक्षिण विभागातील मातोश्री रमाबाई ठाकरे उद्यान आणि आदि शंकराचार्य उद्यान

४. जी/उत्तर विभागातील स्वामी विवेकानंद उद्यान

५. के/पश्चिम विभागातील कला प्रदर्शनी उद्यान

६. पी/दक्षिण विभागातील वागेश्वरी मंदीर, ए.के. वैद्य मार्ग येथील मनोरंजन मैदान तसेच मोतीलाल नगर नं.३ येथील उद्यान

७. आर/दक्षिण विभागातील खजुरिया टँक

८. आर/उत्तर विभागातील एस.व्ही.रोड, दहिसर येथील आर.जी. प्लॉट

थीम गार्डन्स् योजनेसाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.२७.२०कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

- शिवाजी पार्कचा विकास आणि सुशोभिकरण करण्याचा प्रकल्प सुरु असून त्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.४ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.
- दादर येथील वीर कोतवाल उद्यानाच्या सुशोभिकरणासाठी रु.२.२५ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

- विद्यमान उद्याने आणि मनोरंजन मैदानांची दर्जोन्नती करण्याकरिता सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.६ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.
- विकास हक्क हस्तांतरण योजनेअंतर्गत महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या भूखंडांवर उद्याने आणि मनोरंजन मैदाने विकसित करण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.१९.२५ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

**९.१.२**
**क्रीडांगणांची दर्जोन्नती**

महानगरपालिकेतर्फे परिरक्षित करण्यात येणाऱ्या क्रीडांगणांची दर्जोन्नती करण्याचे नियोजिले आहे. सदर क्रीडांगणांचे खुल्या जागा व्यवस्थापन योजने अंतर्गत नूतनीकरण करण्यात येईल. त्याकरिता सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये रु.४.५० कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

**९.१.३**
**बालोद्यानांचा विकास**

सन २०१०-११ मध्ये प्रत्येक परिमंडळामध्ये खेळाची आधुनिक साधने आणि मनोरंजनाच्या सुविधा यांसारख्या सर्व सुविधा असलेले प्रत्येकी एक बालोद्यान विकसित करण्याचे नियोजिले आहे. त्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.३ कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**९.१.४**
**आधुनिक तंत्रज्ञानासह रोपवाटीकांचा विकास**

पूर्व उपनगरामध्ये आधुनिक तंत्रज्ञानासह रोपवाटीका विकसित करण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.१.५० कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे. या रोपवाटीकेमध्ये रोपांच्या पैदासीसाठी टिश्युकल्चर प्रयोगशाळा, रोपांच्या जतनासाठी हरितगृह सुविधा उपलब्ध असतील.

**९.२**
**वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान आणि प्राणीसंग्रहालयाचे आधुनिकीकरण आणि दर्जोन्नती**

मुंबई शहराच्या मध्यवर्ती असलेले वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान हे खूप जुने उद्यान असून ते विविध प्रकारच्या दुर्मिळ जाती-प्रजातींच्या वृक्षांनी नटले आहे. येथील प्राणिसंग्रहालयाचे आधुनिकीकरण करुन ते आंतरराष्ट्रीय पातळीवरील एक अग्रगण्य प्राणिसंग्रहालय बनविण्याचा प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने हाती घेतला असून त्या बाबतीमधील अग्रगण्य संस्था थायलंडस्थित एच्.के.एस्. डिझायनर व अमेरिकास्थित पोर्टिको ग्रुप या संस्थांकडून सदर प्राणिसंग्रहालयाच्या नूतनीकरणाचा सुधारित बृहत आराखडा तयार करुन घेण्यात आला. तसेच त्याला नुकतीच केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्याकडून मान्यतादेखील प्राप्त झाली आहे. सदर आरखडयानुसार संपूर्ण नूतनीकरणाचे काम चार टप्प्यांत पूर्ण करण्याचे प्रस्ताविले आहे. त्यातील पहिल्या टप्प्यात प्रशासकीय इमारत, प्राणिरुग्णालय व दूरस्थापन विभागाचे

(quarantine area) काम सुरु झाले आहे. संपूर्ण प्रकल्पासाठी अंदाजे रु.४८० कोटी एवढा खर्च अपेक्षित असून सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.१८८.९५ कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**९.३**
**माहिम किल्ल्याचे जतन आणि दादर व माहिम समुद्रकिनाऱ्यांचे सुशोभिकरण**

माहिम किल्ल्याचे जतन आणि दादर व माहिम समुद्रकिनाऱ्यांचे सुशोभिकरण करण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांत रु.१ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

**९.४**
**हाजी अली येथील समुद्राच्या बाजूच्या प्रोमोनेडचे सुशोभिकरण व विकास**

हाजी अली येथील समुद्राचा दर्शनी भाग मुंबई शहरात येणाऱ्या पर्यटकांचे एक प्रमुख आकर्षण आहे. विद्यमान समुद्राचा दर्शनी भाग अतिशय अरुंद असून तिथे चांगल्या पायाभूत सेवांचा अभाव असल्याने समुद्राचा हा दर्शनी भाग जागतिक दर्जाच्या स्तरावर विकसित करण्याचे नियोजिले आहे. हाजी अली समुद्र किनारा प्रोमोनेडचे प्रस्तावित सुशोभिकरण करण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांत रु.१० कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

**९.५**
**वॅक्स म्युझियम**

लंडनमधील मादाम तुसा वॅक्स म्युझियम हे पर्यटकांसाठी मोठे आकर्षण स्थळ आहे. त्याच धर्तीवर मुंबईमध्ये वॅक्स म्युझियम उभारण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.५ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे. सदर प्रकल्प BOOT तत्त्वावर कार्यान्वित करण्यासंदर्भात पडताळणी करण्यात येईल.

**९.६**
**टेक्सटाईल म्युझियम**

नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशनच्या मालकीचा इंडिया युनायटेड मिल २ व ३ सह 'ई' विभागातील माझगांव डिव्हीजनमधील सी.एस. नं.८३१ हा भूखंड टेक्सटाईल म्युझियम व उद्यान म्हणून विकसित करण्याचे नियोजिले आहे. या प्रकल्पासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.५ कोटीची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे. या प्रस्तावित टेक्सटाईल म्युझियम प्रकल्पाचा एकात्मिक व सुसंवादी विकास व्हावा या दृष्टीकोनातून २ सल्लागारांचे कर्न्सोटियम असावे असे ठरविण्यात आले आहे. तसेच या प्रकल्पात एका वस्तुसंग्रहालय तज्ञाचाही सहभाग असावा असे ठरविण्यात आले आहे.

**९.७**
**चिंबई समुद्रकिनाऱ्याचे सुशोभिकरण**

एच/पश्चिम विभागातील चिंबई समुद्रकिनाऱ्याचे सुशोभिकरण करण्याचा प्रकल्प हाती घेण्याचे नियोजिले असून त्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.२कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

**९.८**
**समुद्र किनाऱ्यांचे संवर्धन**

प्रभादेवी समुद्र किनाऱ्याची मोठया प्रमाणात होणारी झीज विचारात घेऊन या समुद्र किनाऱ्याचे संवर्धन करण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.५ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

**९.९**
**ईर्ला नाल्याच्या बाजूने सायकल मार्ग**

ईर्ला नाल्याच्या बाजूने किमान २ मीटर रुंदीची एक पायवाट (Pathway) तयार करुन त्यावर रंगीत पेव्हर ब्लॉक्स बसवून ''सायकल मार्ग'' विकसित करण्याचे नियोजिले आहे. या कामासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.२ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

**९.१०**
**संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे स्मारक**

जी/उत्तर विभागातील शिवाजी पार्क येथे संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे स्मारक उभारण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.२० लाख इतकी तरतूद प्रस्ताविली आहे.

**९.११**
**आय.एन.एस. विक्रांतचे सागरी संग्रहालयामध्ये रुपांतर**

विक्रांत नौकेचे सागरी संग्रहालयात रुपांतर करण्याचा निर्णय राज्य शासनाने केंद्र शासनाच्या सहमतीने घेतला आहे. त्या अनुषंगाने सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये या प्रकल्पासाठीच्या निधीमधील Viability Gap भरुन काढण्यासंदर्भातील महानगरपालिकेच्या हिश्श्याचे अधिदान करण्यासाठी रु.२५ कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

## १०. आपत्कालीन व्यवस्थापन आणि आपत्कालीन व्यवस्थेच्या पूर्व तयारीमध्ये सुधारणा

**१०.१**
**अग्निशमन दल**

सध्या मुंबई शहराची झपाट्याने वाढ होत आहे. त्याचप्रमाणे उत्तुंग इमारती, संस्था, शाळा व महाविद्यालये, शॉपिंग मॉल, मल्टीप्लेक्स चित्रपटगृहे निर्मिती मोठ्या प्रमाणात होत आहे व या सर्व गोष्टींमुळे शहरात आगीच्या धोक्याची व इतर धोक्यांची शक्यता वाढली असून अग्निशमन दलावर ताण पडला आहे. त्याचप्रमाणे मुंबई शहरावर झालेला अतिरेकी हल्ला व भविष्यात अशा दुर्घटनेपासून नागरिकांच्या जीविताचे व वित्ताचे रक्षण करण्याकरिता अग्निशमन दलाला अधिक प्रभावी बनविणे गरजेचे आहे.

या आर्थिक वर्षात अग्निशमन व विमोचनाकरिता विविध प्रकारची उपकरणे व वाहने म्हणजेच आगीचे बंब, पाण्याचे टँकर, विविध उंचीच्या एरियल लॅडर प्लॅटफॉर्म व टर्न टेबल लॅडर, कार्डिॲक रुग्णवाहिका, विमोचन उपकरणे, रेस्क्यू व्हॅन, मोबाईल कॉम्पॅक्ट क्रेन घेण्यात येणार आहेत. तसेच दळणवळण यंत्रणा अधिक सक्षम व प्रभावी बनविण्याकरिता रेडीओ ट्रॅकींग प्रणाली व अग्निशामकाची सुरक्षा वाढविण्याकरिता पर्सनल प्रोटेक्टीव उपकरणांचा वापर करण्यात येणार आहे. आगीपासून वा इतर दुर्घटनेपासून होणारी जीवित व वित्तहानी ही अग्निशमन दलाला दुर्घटनेची वर्दी किती लवकर मिळाली आहे यावर अवलंबून असते. बऱ्याच वेळेला अशी वर्दी मिळण्यास विलंब होतो व त्यामुळे जीवित व वित्तहानीचे प्रमाण वाढते. हा विलंब

टाळण्याकरिता सेंट्रलाईज्ड वायरलेस मॉनिटरींग प्रणाली प्रायोगिक तत्त्वावर ‘अे’ विभाग कार्यालय, महापालिका मुख्यालय व अग्निशमन अधिकारी यांच्या कार्यालयात बसविण्याचे प्रस्ताविले आहे. सदर प्रकल्पाचा फायदा अनुभवास घेता, सदर प्रणाली महानगरपालिकेच्या सर्व विभागांमध्ये टप्प्याटप्प्याने बसविण्याबाबत विचार करता येईल. सर्व अग्निशमन केंद्रे व अग्निशमन दलाचे नियंत्रण कक्ष या ठिकाणी सदर प्रणालींचा पुरवठा, उभारणी व ती कार्यान्वित करण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.१० कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

आगीच्या संभाव्य धोक्यांना तोंड देण्याकरिता व त्वरित प्रतिसाद देण्याकरिता वेगवेगळ्या प्रकारची अत्याधुनिक यंत्रे व संयंत्रे यांची खरेदी करण्याकरिता तरतुदी प्रस्ताविण्यात आलेल्या आहेत. याबाबतचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत :-

(रुपये कोटीत)

| | |
|---|---|
| ॲरियल लॅडर खरेदी करणे | ५.०० |
| अग्निशमन व विमोचन वाहने खरेदी करणे | ७.३० |
| अग्निशमन व विमोचन उपकरणे खरेदी करणे | १३.३९ |
| टर्न टेबल लॅडर खरेदी करणे | ६.०० |
| स्नॉर्केल खरेदी करणे | ७.५० |
| रेस्क्यु व्हॅन खरेदी करणे | २१.०० |

**१०.२**
**सुसज्ज इमरजन्सी ऑपरेशन सेंटर**

महानगरपालिका मुख्यालयात असलेल्या तात्काळ कृती केंद्राच्या धर्तीवर सर्व विभाग कार्यालयांत सुसज्ज नियंत्रण कक्ष नव्याने निर्माण करणे किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या नियंत्रण कक्षांचा विकास करण्याचे काम सुरु झाले आहे. या कामासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांत रु.१.२५ कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे. सदर काम लवकरच पूर्ण होणे अपेक्षित असून तेथे प्रत्यक्ष नियंत्रण कार्यास सुरुवात करण्यात येईल. महापालिकेतर्फे राबविण्यात येणारा जीआयएस प्रकल्प लवकरच पूर्ण होऊन जीआयएस वरील विविध माहिती एकाच वेळी अनेक लेअरमधून या नियंत्रण कक्षात पाहता यावी म्हणून अनेक पार्टीशन्स असणारी व्हिडिओ वॉल तेथे बसविण्याचे देखील नियोजिले आहे. या प्रयोजनासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांत रु.७ कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आलेली आहे.

**१०.३**
**डिजीटल वायरलेस रेडीओ पंचिंग कम्युनिकेशन सिस्टीम**

चांगले, स्पष्ट व अखंडित संदेशवहन होण्याकरिता ट्रेटा (टेरिस्ट्रीयल ट्रंक रेडियो ॲक्सेस) ही अत्याधुनिक बिनतारी संदेशवहन प्रणाली मुंबई शहराकरिता बसविण्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.१५ कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**१०.४**
**कल्पतरु प्रशिक्षण केंद्र**

बृहन्मुंबई महानगरपालिका आपत्कालीन व्यवस्थापन कक्ष व मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने एक वर्षाचा आपत्ती व्यवस्थापन पदविका कार्यक्रम महापालिकेच्या कल्पतरु प्रशिक्षण केंद्र, परळ येथे सुरु करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम सुरु करण्याकरिता महापालिका प्रशासनाने तत्त्वत: मान्यता दिली असून मुंबई विद्यापीठासोबत विविध बैठका आयोजित करुन याचा अभ्यासक्रम तयार करण्यात येत आहे व पुढील वर्षात हा अभ्यासक्रम सुरु करण्याचे तसेच, महापालिकेच्या क्षेत्रातील नागरिक, शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी, पोलीस व इतर कर्मचारी, भूकंप व त्सुनामीसारख्या नैसर्गिक आपत्तींविषयी जागरुक व्हावेत या उद्देशाने कृत्रिम भूकंपाचा अनुभव आणि त्सुनामी व्युत्पत्ती दाखविणारी चलत प्रतिकृती हे दोन उपक्रम परळ येथील प्रशिक्षण केंद्रामध्ये सुरु करण्याचे चालू आर्थिक वर्षात नियोजिले आहे.

**१०.५**
**आपत्ती जोखीम व्यवस्थापन बृहत आराखडा**

अर्थक्वेक मेगासिटीज इनिशिएटिव्ह (ईएमआय) या संस्थेने बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी आंतरराष्ट्रीय निकषांप्रमाणे शास्त्रशुध्दरित्या आपत्कालीन व्यवस्थापन आराखडा तयार करण्याची तयारी दर्शविली असून ईएमआय व बृहन्मुंबई

महानगरपालिका आपत्कालीन व्यवस्थापन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई शहराकरिता आपत्ती जोखीम व्यवस्थापन बृहत आराखडा  तयार करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. शास्त्रशुध्द पध्दतीने तयार करण्यात येत असलेल्या या आराखडयाच्या सहाय्याने सध्या अस्तित्वात असलेल्या आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणेचे मजबुतीकरण होण्यास तसेच त्याच्याशी निगडीत सर्व यंत्रणांची क्षमतावृध्दी होण्यासाठी निश्चितच फायदा होणार आहे. उपरोक्त आराखडा तयार करण्याकरिता महत्त्वाच्या १०१ संस्थांशी समन्वय साधला गेला असून या संस्थांनी ६० समन्वय अधिकारी हा आराखडा तयार करण्याकरिता नेमले आहेत.

## ११. नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा आणि सोयींमध्ये सुधारणा

**११.१**
**माहिती तंत्रज्ञान**

महापालिकेमध्ये माहिती तंत्रज्ञान प्रणालीचा वाढता वापर ही माहिती तंत्रज्ञान कक्षाची प्राथमिक जबाबदारी आहे.  महानगरपालिका प्रशासन गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख होण्यासाठी प्रशासनास माहिती व तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक आहे.  यासाठी महापालिकेने संगणकीकरणाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला

आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध खात्यांकरिता तयार करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालींकरिता हार्डवेअर आणि नेटवर्कींगचा पुरवठा, उभारणी आणि कार्यान्वयन करण्याच्या प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. माहिती तंत्रज्ञान सामग्रीकरिता (संगणकीकरण) सन २०१०-११च्या अर्थसंकल्पीय अंदाजांत रु.४२.९३ कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे. या व्यतिरिक्त, माहिती तंत्रज्ञानाकरिता स्थापत्य, विद्युत कामे, उपस्कर, वातानुकूलन यंत्रणा या कामांसाठी रु.८ कोटी इतकी तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे आणि संगणक, प्रिंटर्स व पेरीफेरल्स यांच्या खरेदीसाठी रु.२१.४३ कोटी इतकी तरतूद प्रस्ताविली आहे.

## १२. संस्थांतर्गत सुधारणा आणि पुनर्रचना

**१२.१ महानगरपालिकेच्या उच्च स्तरीय अधिकाऱ्यांसाठी निवासस्थाने**

किनारा इमारत पाडून नारायण पुजारी नगर, खान अब्दुल गफारखान मार्ग, वरळी येथील सी.एस.क्र.९८३ या भूखंडावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांसाठी कर्मचारी निवासस्थाने बांधण्याचे प्रस्ताविले असून सीआरझेड मान्यतेकरिता प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांत रु.२ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

**१२.२**
**फलश्रुतीवर आधारित अर्थसंकल्पाकरिता मॉनिटरींग अँड इव्हॅल्युएशन सेल स्थापन करणे**

फलश्रुतीवर आधारित अर्थसंकल्पाकरिता मॉनिटरींग अँड इव्हॅल्युएशन सेल स्थापन करण्यासाठी शिक्षण, आरोग्य, घनकचरा तसेच प्रमुख लेखापाल (वित्त) या खात्यांतर्गत प्रत्येकी रु.१ कोटी अशी एकूण रु.४ कोटींची तरतूद सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये प्रस्ताविली आहे.

## १३. जकात नाक्यांवरील कामकाजामध्ये सुधारणा

करदात्यांना कर अधिदानास प्रोत्साहित करण्यासाठी आणि कर चुकवेगिरीला आळा घालण्याकरिता महानगरपालिका करांच्या निर्धारण आणि संकलन प्रक्रियेमध्ये सुसंगतता आणि पारदर्शकता आणून अपेक्षित लक्ष्य साध्य करण्याकरिता पुढील उपाययोजना हाती घेण्याचे प्रस्ताविले आहे :-

**१३.१**
**जकात नाक्यांचे आधुनिकीकरण**

सर्व मुख्य जकात नाक्यांवर पाहणी व पडताळणीच्या कामांमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि कामकाजाला लागणाऱ्या वेळेमध्ये घट करण्याकरिता तिथे पुढील प्रकारची आधुनिक साधनसामग्री बसविण्याचे प्रस्ताविले आहे.

- इन मोशन वे- ब्रिज
- स्कॅनर्स
- कॅमेरे आणि सी.सी. टि.व्ही.

या साधनसामग्रीच्या खरेदीसाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.९९.५०कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मुख्य जकात नाक्यांच्या स्थापत्य कामाच्या दर्जोन्नती आणि आधुनिकीकरणासाठी रु.६०.५० कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

१३.२
**ऑक्ट्रॉय सिल्व्हर कार्ड योजना**

जकातदारांच्या सुविधेसाठी व वाहनांचा निपटारा जलद गतीने होण्यासाठी दहिसर जकात नाका येथे रेती, विटा, खडी, माती यांवरील जकात भरण्यासाठी सिल्व्हर कार्ड योजनेचा अवलंब करण्यात सुरुवात केली आहे. सिल्व्हर कार्डद्वारे जकात भरणा करणे व त्यापुढे जाऊन ई-पेमेंटची सुविधा लोकप्रिय करण्याच्या दृष्टीने आयातदारांना सिल्व्हर कार्ड सुविधेअंतर्गत सूट देण्यात येते. ऑक्ट्रॉय सिल्व्हर कार्डच्या टॉप अप रकमेवरील सवलतीसाठी सन २०१०-११च्या अर्थसंकल्पीय अंदाजांत रु.३० लाखांची तरतूद प्रस्ताविण्यात आलेली आहे.

## १३.३ भांडवली मूल्यावर आधारित नवीन करप्रणाली

१३.३.१
**भांडवली मूल्यावर आधारित नवीन करप्रणाली**

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत महापालिकेने महाराष्ट्र शासनासमवेत केलेल्या सामंजस्य करारानुसार प्रचलित भाडे तत्वावर आधारित करप्रणालीत अनेक

उणीवा असून त्यावर मात करण्याकरिता पारदर्शक व लोकाभिमुख अशा भांडवली मूल्यावर आधारित नवीन करप्रणालीला महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिलेली असून महापालिकेकडून क्र.सीआर १२७४, दिनांक २१.१.२०१० अन्वये यास मान्यता प्राप्त झाली आहे. नवीन करप्रणाली साधारणत: १.१.२०१० पासून अंमलात येऊ शकेल अशी अपेक्षा आहे. तोपर्यंतच्या साधारणत: ६ महिन्यांच्या कालावधीकरिता विद्यमान करप्रणाली लागू राहणार आहे. तसेच GIS च्या माध्यमातून मुंबई हद्दीतील सर्वच मालमत्ता या कराच्या कक्षेत आणण्यासाठी देखील प्रक्रिया सुरु आहे.

**१३.३.२ अतिरिक्त लघुवाद न्यायालयाची स्थापना**

ज्या प्रकरणांमध्ये मोठया रकमा अंतर्भूत आहेत अशा मालमत्ता कराची न्यायालयात प्रलंबित असणारी वादग्रस्त प्रकरणे बऱ्याच प्रमाणात वाढली आहेत. अशा प्रकारचे दावे न्यायालयात प्रलंबित आहेत. सद्य:स्थितीत ही प्रकरणे अतिरिक्त मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय यांच्याकडे सुनावणीसाठी आहेत. परंतु सदर प्रकरणांची संख्या व त्यात गुंतलेली रक्कम लक्षात घेता, अशी प्रकरणे निकालात काढण्यासाठी प्रशासनाने कांदिवली (पूर्व) येथे न्यायालय स्थापन करण्यासाठी पूर्वतयारी चालू केली आहे. याकरिता सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.१.५० कोटी एवढी तरतूद प्रस्ताविली आहे.

## १३.४ कल्याणकारी योजना

**१३.४.१**
**मालमत्ता करदात्यांच्या पाल्य/ मुलांना बक्षिस योजना**

करदात्यांस प्रोत्साहन देण्यासाठी प्रशासनाने ''करदात्यांच्या मुलांसाठी बक्षिस योजना'' या नावाची एक नवीन योजना प्रस्तावित केलेली आहे. ज्या करदात्यांच्या मुलांनी २००७-०८ व २००८-०९ या वित्तीय वर्षांत माध्यमिक/उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत ९०% पेक्षा अधिक गुण मिळविले आहेत त्यांना प्रत्येकी रु.१०,०००/- इतकी रक्कम बक्षिस म्हणून देण्यात येईल. यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.१०कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

**१३.४.२**
**आश्रय प्रकल्प**

बृहन्मुंबई महानगरपालिका ''आश्रय प्रकल्प'' अंतर्गत शहर व उपनगरे येथील सफाई कर्मचाऱ्यांच्या इमारतींचा विकास करण्याच्या प्रकल्पाच्या प्रथम टप्प्यातील कामांसाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.५० कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

आश्रय प्रकल्पांतर्गत २२ हजार सफाई कामगार सेवा निवासस्थाने पुरविण्याच्या उद्देशाने शहर आणि उपनगरांमध्ये प्रत्येकी १९ भूखंडांच्याबाबतीत कॉंप्रेहेंसीव्ह रिहॅबिलिटेशन प्लॅन हाती घेण्यात आला आहे.

या प्रकल्पातील टप्पा-१ मध्ये ९ ठिकाणी मृद परीक्षण करण्याचे काम पूर्ण झाले असून टप्पा-२ साठी १० ठिकाणी मृद परीक्षण करण्याचे काम सुरु झालेले आहे. आतापर्यंत आश्रय प्रकल्पातील ५ ठिकाणांच्या पुनर्बांधणीसाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. उर्वरित ठिकाणांबाबत नकाशे मंजुरीसाठी आवश्यक त्या बाबींची पडताळणी करण्यात येत आहे.

या प्रकल्पातील काही भाग व्यापारी हेतूने (Commercial purpose) राखीव ठेवण्याची शक्यता पडताळण्यात येत आहे, जेणेकरुन खाजगी विकासक या प्रकल्पाकडे आकर्षित होतील व या प्रकल्पाचा आर्थिक भार महापालिकेवर न पडल्याने प्रकल्प स्वयंपूर्ण होईल.

**१३.४.३**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना**

राज्य शासनाच्या निदेशांनुसार महानगरपालिकेच्या साफसफाई खात्यातील कामगार कर्मचाऱ्यांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीकोनातून ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना'' अंमलात आणण्याचे नियोजिले असून त्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.७ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

## १४ समाज कल्याण

**१४.१**
**मागासवर्गीय जनतेचे कल्याण**

मागासवर्गीय जनतेच्या उन्नतीसाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.६.६०कोटी इतकी तरतूद प्रस्ताविली आहे. शारीरिकदृष्टया अपंग मागासवर्गीय लोकांना कृत्रिम अवयव पुरविण्याचे नियोजिले आहे. त्यानुसार सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये प्रत्येक मोठया रुग्णालयासाठी रु.१ कोटीची तरतूद प्रस्ताविली आहे. तसेच माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्याचेदेखील प्रस्ताविले आहे. त्यासाठी शिक्षण अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.१.२० कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे. त्याचप्रमाणे उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यावसायिक आणि तांत्रिक पाठयक्रमांसाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्याचे प्रस्ताविले आहे. त्यासाठी शिक्षण अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.२.४० कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

**जेंडर बजेट**

**१४.२**
**महिला आणि बालकल्याण**

सन २००९-१० च्या अर्थसंकल्पीय अंदाजांत महिला व मुले यांना केंद्रस्थानी ठेवून केलेल्या तरतुदी जेंडर बजेटखाली स्वतंत्रपणे दर्शविण्यात आल्या होत्या. त्या धर्तीवर खाली दर्शविलेल्या विविध योजनांसाठी जेंडर बजेट अंतर्गत सन २०१०-११ या अर्थसंकल्पीय अंदाजांत रु.११.९५ कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

१. पात्र महिलांसाठी स्वयंरोजगार
२. स्वसंरक्षण / कौशल्य दर्जोन्नतीसाठी प्रशिक्षण
३. क्षमता वाढीसाठी कार्यशाळा / प्रशिक्षण
४. अपंग व्यक्तिंना स्वयंरोजगार आणि वैद्यकीय सहाय्याकरिता मदत
५. आधार प्रकल्पांतर्गत विविध उपक्रम
६. राजकीय प्रतिनिधी आणि युपीईसीचे अधिकारी यांच्यासाठी अभ्यासदौरा
७. स्वसहाय्य गटासाठी (एसएचजी) रिवॉलव्हींग फंड

महिला आणि मुले यांच्या विकासाकरिता सन २०१०-११ च्या महसुली अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.३४५.४० कोटी इतकी तर भांडवली अर्थसंकल्पीय अंदाजांत रु.२६.५३ कोटी अशी एकूण रु.३७१.९३ कोटींची भरीव तरतूद प्रस्ताविली आहे. त्यापैकी काही महत्त्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत :-

- महानगरपालिका प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, पाट्या, गणवेष, चष्मे, वह्या, शैक्षणिक साहित्य, बॅगा इत्यादी मोफत पुरविण्याचे प्रस्ताविले असून त्यासाठी रु.७४.५१ कोटींची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.
- महापालिका प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना सुगंधीत दूध पुरविण्याचे ठरविले असून त्यासाठी रु.१०५.५३ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.
- महापालिका प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थिनी उपस्थित रहाण्यासाठी त्यांना प्रोत्साहनपर रक्कम देण्याचे ठरविले असून त्यासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये अनुक्रमे रु.४.०३ कोटींची आणि रु.४६.९७ लाखांची तरतूद प्रस्ताविण्यात आली आहे.

- महापालिका शाळांमध्ये शिकलेल्या विद्यार्थिनींना उच्च शिक्षणासाठी विशेष सहाय्य देण्याकरिता रु.१.०० कोटी इतकी तरतूद प्रस्ताविली आहे.
- पाच वर्षांखालील मुलांचे गालगुंड, गोवर आणि रुबेला या रोगांपासून संरक्षण करण्याकरिता एम.एम.आर. लस उपलब्ध करण्यात आली असून बृहन्मुंबई महानगरपालिका ही अशा प्रकारची लस पुरविणारी कदाचित पहिली महानगरपालिका आहे.
- शारीरिकदृष्टया अपंग महिला आणि १४ वर्षांखालील मुले यांना कृत्रिम अवयव पुरविण्यासाठी रु.१.२५ कोटी इतकी तरतूद प्रस्ताविली आहे.
- प्रसुतिगृहांच्या दैनंदिन खर्चासाठी रु.४०.१४ कोटी इतकी तरतूद आणि प्रसूतिगृहांच्या दर्जोन्नतीकरिता रु.५ कोटी इतकी तरतूद प्रस्ताविली आहे.
- सार्वजनिक आरोग्य खात्याच्या अखत्यारितील वैद्यकीय संस्थांच्या दर्जोन्नतीकरिता रु.५० लाखांची तरतूद प्रस्ताविली आहे.

**१४.३**
**शहरी गरीब जनतेला पुरवावयाच्या सेवांमध्ये वाढ**

शहरातील गरीब जनतेला विविध प्रकारच्या नागरी सेवा पुरविण्याच्या आणि या सेवांचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीकोनातून सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये एकूण रु.४३५१.५९ कोटींची तरतूद पुढील शीर्षांखाली प्रस्ताविली आहे.

(रुपये कोटीत)

| | |
|---|---|
| गावठाणे, कोळीवाडे आणि आदिवासी पाडे | २६.५० |
| आधार केंद्रे | ५.१५ |
| गलिच्छ वस्त्यांची दर्जोन्नती | ३७६.८१ |
| गरीब वर्गासाठीच्या चाळींची सुधारणा, व्यवस्थापन आणि परिरक्षण | २५६.९३ |
| प्राथमिक शिक्षण (अर्थसंकल्प 'ई') | १७९२.०० |
| माध्यमिक शिक्षण | १६२.३० |
| आरोग्य | १६६५.६५ |
| इतर | ६६.२५ |
| **एकूण** | **४३५१.५९** |

**१४.४**
**गलिच्छ वस्त्यांच्या परिरक्षणासाठी लोकसंख्येवर आधारित तरतुदी**

बृहन्मुंबई शहरातील गलिच्छ वस्त्यांच्या परिरक्षणांतर्गत रस्ते आणि पदपथांच्या दुरुस्त्या, सार्वजनिक शौचालये, शौचकुपे यांच्या दुरुस्त्या, सेप्टीक टाक्या गाळविरहीत करणे यांसाठी सन २०१०-११ मध्ये नॅशनल रिसोर्स सेंटर फॉर अर्बन पॉव्हर्टी

(एनआरसीयुपी), ऑल इंडिया लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई यांनी प्रसिध्द केलेल्या मुंबई मानवी विकास अहवाल, २००९ मध्ये नमूद केलेल्या भारतीय जनगणना २००१ च्या लोकसंख्येवर आधारित मुंबईतील विभागनिहाय गलिच्छ वस्तीमधील लोकसंख्येच्या सरासरी तत्त्वावर तरतुदी निश्चित करण्यात आल्या आहेत. याचप्रमाणे शहरातील गरीब जनतेला विविध प्रकारच्या नागरी सेवा पुरविण्याच्या आणि या सेवांचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीकोनातून आदिवासी पाड्यांच्या एकात्मिक विकासासाठी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाने केलेल्या बृहन्मुंबई महानगरातील व मुंबई उपनगर जिल्ह्यातील पाड्यांच्या सर्वेक्षण अहवालात नमूद केलेल्या आदिवासी पाड्यांमधील कुटुंबसंख्या व लोकसंख्या यांच्या सरासरी तत्त्वावर विभागनिहाय तरतुदी प्रस्ताविण्यात आलेल्या आहेत.

**१४.५ विकलांग व्यक्तींसाठी स्वतंत्र व्यवस्था**

अपंग व्यक्तींना शासकीय इमारती आणि सार्वजनिक ठिकाणी अडथळेमुक्त वावर करता यावा म्हणून सुविधा उपलब्ध करुन देणे ही शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची जबाबदारी आहे. या अनुषंगाने अपंग व्यक्तींना अडथळेमुक्त वावर करता यावा यासाठी महानगरपालिका कार्यालये, रुग्णालये, मनोरंजन केंद्रे,

बाजार, शाळा अशा सर्व ठिकाणी हँडरेलसह रँप आणि लो-लेव्हल शौचालये इत्यादी सुविधा पुरविण्याकरिता सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.१०कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे.

## १५. महानगरपालिका मालमत्तांची सुधारणा, व्यवस्थापन आणि परिरक्षण

अर्धपक्क्या छपऱ्या आणि संपादित मालमत्ता यांसारख्या महानगरपालिकेच्या काही मालमत्ता अत्यंत वाईट स्थितीत असून त्यांच्या दुरुस्त्या तातडीने करण्याची आवश्यकता आहे. म्हणून अर्धपक्क्या छपऱ्या, कर्मचारी निवासस्थान यांच्या व्यापक प्रमाणातील आणि संरचनात्मक दुरुस्त्या करण्यासाठी सन २०१०-११ च्या भांडवली अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.४४.०५कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे. यापैकी काही महत्त्वाची कामे पुढीलप्रमाणे आहेत :-

(रुपये कोटीत)

| | | |
|---|---|---|
| १. | महानगरपालिकेच्या मोडकळीस आलेल्या मालमत्तांच्या व्यापक प्रमाणातील दुरुस्त्या | ५.०० |
| २. | कर्मचारी निवासस्थानांच्या दुरुस्त्या, पुनर्बांधकाम आणि पुनर्विकास | २.५७ |
| ३. | अर्धपक्क्या छपऱ्या आणि अर्थसंकल्प 'ब' अंतर्गत संपादित केलेल्या मालमत्ता यांसारख्या मालमत्तांच्या संरचनात्मक दुरुस्त्या (निधी संकेतांक २१) | २५.०० |
| ४. | एफ/उत्तर विभाग, के.डी. गायकवाड नगराच्या प्रमुख दुरुस्त्या | ४.०० |

## १६. सामाईक सेवा आणि संकीर्ण उपक्रम :

या व्यतिरिक्त, यांत्रिकी आणि विद्युत, परिवहन, धुलाई केंद्र/ ओतशाळा, यांसारख्या सामायिक सेवांच्या प्रचालनाकरिता आणि परिरक्षणासाठी तसेच सुरक्षा, सामान्य प्रशासन आणि भूमी संपादन यांसारख्या इतर संकीर्ण उपक्रमांकरिता सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये रु.४९२७.२७ कोटींची तरतूद प्रस्ताविली आहे. या प्रस्तावित तरतुदीमधून अर्थसंकल्प 'अ' शी संबंधित निवृत्तीवेतनाच्या अधिदानासाठी होणारा खर्चही भागविण्यात येणार आहे. संकीर्ण सेवा आणि उपक्रम यांचे प्रचालन आणि परिरक्षण अधिक प्रभावीपणे करण्यावर भर देण्यात आला आहे.

**दीर्घकालीन आर्थिक धोरण**

महापालिकेच्या दीर्घकालीन धोरणाचा एक भाग म्हणून व भविष्यात निधीअभावी विकास कामे प्रलंबित राहू नयेत या दृष्टीकोनातून विविध निधींच्या अंशदानाच्या रकमेत सन २००३-०४ पासून वाढ करण्याचे व नवीन निधी उभारण्याचे ठरविण्यात आले होते व त्याद्वारे आर्थिक स्थैर्य स्थापन करणे गरजेचे होते. तथापि, गेल्या २ वर्षापासून महसुली उत्पन्नातून भांडवली खर्चासाठी पुरेशा प्रमाणात अंशदान देता आलेले नाही व महापालिकेचा खर्च आणि महापालिकेचे उत्पन्न यातील तफावत भरुन काढण्यासाठी दीर्घकालीन धोरणाचा एक भाग म्हणून २००३-०४ या वर्षापासून विशेष निधींखाली जमा झालेल्या रकमेपैकी मोठ्या प्रमाणावर विशेष निधीतून रक्कम काढून सन २००९-१० चा भांडवली खर्च भागवावा

लागला आहे. आगामी वर्षातही अशा विशेष निधींमधील जवळजवळ उर्वरित सर्वच रक्कम काढून आगामी वर्षाचा भांडवली खर्च भागविणे भाग पडत आहे. त्यामुळे २०११-१२ पासून त्यापुढील वर्षांसाठी प्रकल्प कामांचा खर्च भागविण्यासाठी विशेष निधीतून रक्कम काढण्यासाठी त्या ठिकाणी पुरेशी शिल्लक उपलब्ध असणार नाही हे येथे खेदपूर्वक नमूद करावेसे वाटते. ही बाब बृहन्मुंबई महानगरपालिकेसारख्या प्रगत महानगरपालिकेच्या दृष्टीने निश्चितच चिंताजनक बाब आहे आणि एकूण आर्थिक नियोजनाच्या दृष्टीकोनातूनही स्पृहणीय बाब नाही. मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम १२६(२)(ड) अन्वये स्थायी समितीने अर्थसंकल्प 'अ' मंजूर करताना किमान रु.१ लाख एवढी अखेरची शिल्लक ठेवणे गरजेचे आहे. म्हणजेच उत्पन्नाच्या कक्षेतच खर्च सीमित ठेवणे अधिनियमातील तरतुदीनुसार अनिवार्य आहे. तसेच सद्य:स्थितीत महसुली उत्पन्नातून महसुली खर्च भागवून भांडवली खर्चासाठी कोणत्याही प्रकारची रक्कम उपलब्ध होत नाही. त्यामुळे भांडवली खर्च भागविण्यासाठी कर्ज उभारणीशिवाय अन्य कोणताही पर्याय उपलब्ध नाही. तथापि, मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम १०९ अन्वये अशा प्रकारे कर्ज उभारणीच्या रकमेवरील मर्यादा विहित करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे भांडवली खर्च प्रत्येकवेळी कर्ज उभारणीद्वारा भागविणे शक्य नाही. अतएव, महानगरपालिकेने भांडवली कामांचा खर्च कमीत कमी रकमेचे कर्ज उभारणी करुन आणि मुख्यत्वे महसुली उत्पन्नातून कशाप्रकारे भागविता येईल याचा विचार करणे गरजेचे झाले आहे. महसुली उत्पन्नाच्या निदान ३०% रक्कम तरी भांडवली खर्चासाठी उपलब्ध झाल्यास भविष्यात कर्ज उभारणे टाळता येईल व महापालिकेची आर्थिक स्थिती संतुलित राहील.

देशातील अग्रगण्य शहरांपैकी मुंबई हे एक शहर असून या शहरातील नागरिकांना उच्च दर्जाच्या मूलभूत सेवासुविधा पुरविण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेचा लौकिक आहे. हा लौकिक टिकविण्यासाठी पुरेसा निधी सातत्याने उपलब्ध असण्यासाठी दीर्घकालीन आर्थिक धोरण राबविणे अत्यंत गरजेचे आहे. त्या अनुषंगाने अंदाजित उत्पन्नाच्या कक्षेत खर्च सीमित ठेवणे अत्यावश्यक झाले आहे. त्यासाठी आस्थापनासारख्या उत्तरोत्तर वाढत जाणाऱ्या खर्चावर विशेषत्वाने नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे झाले आहे. त्यासाठी आस्थापनेवर साधारणत: ६० ते ६५ टक्क्यांपर्यंत होत असलेला खर्च कमी करुन तो भविष्यात ५० टक्क्यांपर्यंत सीमित ठेवण्याचे माझे प्रयत्न आहेत. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान (JNNURM) अंतर्गत आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी असा आस्थापना खर्च हा टप्प्याटप्याने ४० टक्क्यांपर्यंत कमी करणे आवश्यक आहे. याच दृष्टीकोनातून महापालिका कर्मचाऱ्यांच्या वेतनसुधारणांचा कालावधी हा सध्याच्या ५ वर्षांवरुन राज्य शासनाच्या / केंद्र शासनाच्या व सहाव्या वेतन आयोगाच्या धर्तीवर १० वर्षे इतका असावा असे माझे मत आहे, जेणेकरुन वेतनश्रेण्या सुधारित केल्यानंतर लगेचच होणारी आस्थापना खर्चातील वाढ भरुन निघण्यास पुरेसा अवधी मिळेल. त्याचबरोबर महापालिकेच्या विविध खात्यांचा दैनंदिन खर्च उत्पन्नाच्या २० टक्क्यांपर्यंत सीमित ठेवणे व ऋण आकारासह भांडवली खर्चासाठी महसुली उत्पन्नातून किमान ३० टक्के निधी वर्ग करण्याचे विचाराधीन आहे. त्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेची आर्थिक स्थिती नाममात्र वर्ताळ्यात असल्याने अवाजवी खर्च वाढवून चालणार नाही. प्रथम आर्थिक स्थैर्य स्थापन करणे गरजेचे आहे म्हणजे भविष्यात

विकास कामे निधी अभावी प्रलंबित राहणार नाहीत. त्यादृष्टीने आगामी काही वर्षात विविध अंशदानांच्या रकमेत वाढ करणे तसेच नवीन निधी उभारण्याचे दीर्घकालीन आर्थिक धोरण ठरविणे ही काळाची गरज बनली आहे. अशा तऱ्हेने निधींमध्ये पुरेसा संचय झाल्यावर येत्या काही वर्षांमध्ये विकासात्मक कामे टप्प्याटप्याने जलद गतीने पूर्ण करता येतील.

मी माझ्या मनोगतात यापूर्वीच नमूद केल्याप्रमाणे, जागतिक मंदीच्या पार्श्वभूमीवर आगामी वर्षात आधीच कमी अपेक्षिलेले उत्पन्न प्रत्यक्षात त्याहूनही कमी होण्याची शक्यता आहे. त्याचवेळी कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणींतील सुधारणांमुळे आगामी वर्षात आस्थापना खर्चात मोठया प्रमाणात वाढ होणार आहे व महानगरपालिकेने हाती घेतलेले प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी भांडवली खर्चाकरितादेखील मोठया प्रमाणावर निधी लागणार आहे. या बाबी विचारात घेऊन विविध विशेष निधींमधील संचयित रकमेचा मोठया प्रमाणात विनियोग करण्याचे व उर्वरित कमी पडणारा निधी अंतर्गत निधीतून कर्ज उभारणीद्वारा उभा करण्याचे प्रस्ताविले आहे. या परिस्थितीतही महानगरपालिका नियमितपणे पार पाडीत असलेल्या विविध प्रकारच्या नागरी जबाबदाऱ्या, नागरिकांवर/करदात्यांवर करांचा कोणताही अतिरिक्त बोजा न लादता आगामी वर्षातही तेवढयाच प्रमाणात पार पाडेल, जेणेकरुन नागरी सेवा व सुविधांच्या दर्जात सुधारणा होईल व मुंबईला जागतिक दर्जाचे शहर बनविण्याचे आपले मूळ उद्दिष्टही साध्य होऊ शकेल.

अर्थसंकल्पीय अंदाजांवरील माझे निवेदन पूर्ण करताना मी पुनश्च असे नमूद करु इच्छितो की, मुंबई महानगरपालिकेच्या सध्याच्या चिंताजनक आर्थिक संकटाच्या काळात सन २०१०-११चे रु.२०३५३.९५ कोटींचे अर्थसंकल्पीय अंदाज सादर करण्यात आले असले तरी चालू असलेल्या भांडवली कामांवर विपरीत परिणाम होऊ नये याच दृष्टीकोनातून एवढ्या मोठ्या रकमेचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यात आले आहेत. **तसेच या अर्थसंकल्पीय अंदाजांमध्ये कोणत्याही प्रकारचे नवीन कर अथवा विद्यमान करांच्या दरात वाढ प्रस्ताविलेली नाही**. मुंबईतील नागरिकांवर अतिरिक्त कराचा भार पडू नये त्याचप्रमाणे भविष्यात तुटीला सामोरे जावे लागू नये या दृष्टीने अंदाजित उत्पन्नाच्या कक्षेतच खर्च सीमित ठेवण्याचा माझा संकल्प आहे. परंतु हे करत असताना रु.३१०५.४३ कोटी एवढी रक्कम दीर्घकालीन धोरणाचा भाग म्हणून उभारलेल्या विविध विशेष निधींमधून / संचित वर्ताळयातून काढावी लागत आहे. यामुळे आता या विशेष निधींमध्ये नाममात्र रक्कम शिल्लक राहणार आहे. त्याशिवाय रु.३००० कोटींचे कर्जही उभारावे लागणार आहे ही बाब दुर्लक्षून चालणार नाही. महापालिकेच्या आर्थिक नियोजनाच्या दृष्टीकोनातूनदेखील ही बाब चिंताजनक आहे. तसेच प्रत्येक आर्थिक वर्षात अशी उपाययोजना करणे शक्य होईलच असेही नाही. म्हणून आतापासूनच खर्चावर कठोर नियंत्रण ठेवण्याचा व उत्पन्न वाढविण्याचा कार्यक्रम हाती घेणे गरजेचे आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या व महानगरपालिकेचा खर्च उत्पन्नाच्या कक्षेत सीमित ठेवण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनासंदर्भात मी या निवेदनात यापूर्वीच सविस्तर ऊहापोह केला आहे.

आगामी आर्थिक वर्षात महसुलवृध्दीच्या दृष्टीने खालील काही उपाययोजनांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येईल :-

- भांडवली मूल्यावर आधारित करप्रणाली लागू केली जाईल, त्यामुळे मालमत्ता कराद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ अपेक्षित आहे. नवीन करप्रणाली लागू केल्यानंतर सुरुवातीच्या काळात जरी मोठया प्रमाणात उत्पन्नात वाढ झाली नाही तरी नजिकच्या काळात या करप्रणालीमुळे उत्पन्नात भरघोस वाढ होईल अशी अपेक्षा आहे.
- महापालिकेच्या प्रमुख जकात नाक्यांचे आधुनिकीकरण लवकरात लवकर पूर्ण केले जाईल तसेच जकात नाक्यांवर स्कॅनर्ससारख्या आधुनिक यंत्रणा तातडीने बसविण्यात येतील. त्यायोगे वसुली प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येऊन जकात चुकवेगिरीला आळा बसेल पर्यायाने जकातीपासून मिळणाऱ्या उत्पन्नातही लक्षणीय वाढ होईल.
- अतिरिक्त ०.३३ एफएसआयपोटी प्राप्त होणाऱ्या अधिमूल्य आकाराबाबत राज्य शासनाकडून अपेक्षित असलेल्या काही निर्णयांचा पाठपुरावा करण्यात येत आहे. हे निर्णय झाल्यावर या बाबींपासूनही महानगरपालिकेला वाढीव महसूल प्राप्त होईल.

या पार्श्वभूमीवर सादर केलेल्या या अर्थसंकल्पीय अंदाजांद्वारे प्रस्ताविण्यात आलेल्या कामांना / प्रकल्पांना मूर्त स्वरुप प्राप्त झाल्यावर बृहन्मुंबईचा सर्वांगीण विकास करण्याची प्रक्रिया अधिक गतिमान होईल असा मला विश्वास आहे. त्या दृष्टीने आपला सहभाग व अंत:करणपूर्वक सहकार्य लाभेल अशी आशा बाळगून आगामी वर्षाचे महसुली व भांडवली उत्पन्न व खर्चाचे शिलकी अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', समतोल अर्थसंकल्पीय अंदाज 'ब' आणि शिलकी अर्थसंकल्पीय अंदाज 'ग' स्थायी समितीच्या विचारविनिमयार्थ व मंजुरीसाठी सादर करीत आहे.

सस्नेह धन्यवाद !

**मुंबई,**
**दिनांक : ३ फेब्रुवारी, २०१०**

**स्वा.शि. क्षत्रिय**
**महानगरपालिका आयुक्त**

# परिशिष्टे

# परिशिष्ट - एक

## महसुली उत्पन्न- अर्थसंकल्पीय अंदाज 'अ' 'ब', 'ई' , 'ग' आणि वृक्ष प्राधिकरण

(रुपये कोटीत)

| अनु.क्र. | महसुली उत्पन्नाचे स्त्रोत | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-११ |
|---|---|---|
| १. | जकात (नक्त) | ४६५०.२१ |
| २. | मालमत्ता कर | २६४७.४९ |
| ३. | जल आणि मलनि:सारण आकार | ७६३.९१ |
| ४. | विकास नियोजन खात्यापासून प्राप्ती | १२७८.०० |
| ५. | शासनाकडून अनुदाने | ४४६.५७ |
| ६. | पर्यवेक्षण आकार | ६३७.१५ |
| ७. | घनकचरा व्यवस्थापन | ११७.०० |
| ८. | रस्ते व पूल यापासून प्राप्ती | २१९.२३ |
| ९. | अनुज्ञापन खात्यापासून प्राप्ती | १००.०० |
| १० | रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालये यापासून प्राप्ती. | ७६.७६ |
| ११. | बाजार आणि देवनार पशुवधगृह खात्यांपासून प्राप्ती | ८३.२६ |
| १२. | इतर प्राप्ती | १७६७.०३ |
| | **एकूण** | **१२७८६.६१** |

## परिशिष्ट -दोन

**महसुली खर्च - अर्थसंकल्पीय अंदाज 'अ' 'ब', 'ई' , 'ग' आणि वृक्ष प्राधिकरण**

(रुपये कोटीत)

| अनु. क्र. | महसुली खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-११ |
|---|---|---|
| १. | आस्थापना खर्च | ७४७६.४५ |
| २. | प्रशासकीय खर्च | ५७६.३२ |
| ३. | प्रचालन आणि परिरक्षण | २३८४.२४ |
| ४. | व्याज आणि वित्त आकार | १६३.६४ |
| ५. | कार्यक्रम खर्च | १२५.१६ |
| ६. | महसुली अनुदाने, अंशदाने आणि वित्तीय सुट | ७४९.०९ |
| ७. | तरतुदी आणि निर्लेखन | २८०.९४ |
| ८. | राखीव निधीला स्थानांतरण | |
| | एक ) भांडवली लेख्याला स्थानांतरण | ६५१.५१ |
| | दोन ) इतर | २३६.०७ |
| ९ | करांचा परतावा | १८६.३८ |
| | **एकूण** | **१२८२९.८०** |

# परिशिष्ट –तीन

## विविध अंदाजपत्रकीय उद्दिष्टांसाठी प्रस्तावित तरतुदी

## (निधी संकेतांक - ११,१२, २१, २२, २३, ३०, ४०, ५०, ६० आणि ७०)

(रुपये कोटीत)

| अनु. क्र. | सेक्टर | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-११ | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | महसुली खर्च | भांडवली खर्च | |
| १. | नागरी पायाभूत सुविधांचे बळकटीकरण | २५६३.८९ | ५५२६.०९ | ८०८९.९८ |
| २. | सामाजिक पायाभूत सुविधांची आणि सुखसोयींची दर्जोन्नती | २९९३.६३ | ८७९.०३ | ३८७२.६६ |
| ३. | स्वच्छता आणि शहर पर्यावरणामध्ये सुधारणा | १३२४.९४ | ३१६.५८ | १६४१.५२ |
| ४. | शहराचे सुशोभिकरण आणि पर्यटन स्थळांची निर्मिती | ७८.१४ | ३२६.८७ | ४०५.०१ |
| ५. | आपत्कालीन व्यवस्थापन आणि आपत्कालीन व्यवस्थेच्या पूर्व तयारीमध्ये सुधारणा | १५६.३० | १९५.७५ | ३५२.०५ |
| ६. | नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा आणि सोयींमध्ये सुधारणा | ७९.२३ | १०६.५९ | १८५.८२ |
| ७. | संस्थांतर्गत सुधारणा आणि पुनर्रचना | १३.३७ | २७४.१७ | २८७.५४ |
| ८. | समाज कल्याण | ३६२.०० | ३६.५३ | ३९८.५३ |
| ९. | महानगरपालिका मालमत्तांची सुधारणा, व्यवस्थापन आणि परिरक्षण | १८७.८६ | ६९.०७ | २५६.९३ |
| १० | सामाईक सेवा आणि संकीर्ण उपक्रम | ४४१८.९३ | ५०८.३४ | ४९२७.२७ |
| | **एकूण** | **१२१७८.२९** | **८२३९.०२** | **२०४१७.३१** |
| | अधिक : भांडवली लेख्यास अंशदान | ६५१.५१ | | |
| | **एकूण** | **१२८२९.८०** | | |

## परिशिष्ट - चार
## अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग' आणि 'वृक्ष प्राधिकरण'
## खातेनिहाय सारांश

(रुपये कोटीत)

| खाते संकेतांक | खाते | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-११ | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | महसुली खर्च | भांडवली खर्च | |
| १८ | माहिती तंत्रज्ञान खाते | ७९.२३ | १०१.५९ | १८०.८२ |
| २१ | आपत्कालीन व्यवस्थापन कक्ष | १५.५२ | ४१.०१ | ५६.५३ |
| २४ | कर निर्धारक व संकलक खाते | ४६०.४० | १७६.३१ | ६३६.७१ |
| ३० | शिक्षण खाते | १२७२.७१ | १५९.५४ | १४३२.२५ |
| ३१ | घनकचरा व्यवस्थापन खाते | १२४८.७६ | ३०८.०५ | १५५६.८१ |
| ३२ | परिवहन खाते | ३२७.७१ | २१.०८ | ३४८.७९ |
| ३३ | पर्जन्य जलवाहिन्या खाते | २६८.९५ | १०१३.५३ | १२८२.४८ |
| ३४ | यांत्रिकी व विद्युत खाते | ६३.५९ | ८३.८८ | १४७.४७ |
| ३५ | नगर अभियंता खाते | ३३०.७७ | ३७१.६४ | ७०२.४१ |
| ३७ | विकास नियोजन खाते | ३४.८६ | ३१४.५६ | ३४९.४२ |
| ३८ | अग्निशमन दल | १४०.७९ | १५४.७४ | २९५.५३ |
| ४१ | उद्यान खाते | १४२.३४ | २८८.८० | ४३१.१४ |
| ४२ | बाजार खाते | ५२.५८ | ९०.२० | १४२.७८ |
| ४३ | देवनार पशुवधगृह | २८.४३ | १०.०५ | ३८.४८ |
| ४४ | रस्ते आणि वाहतूक प्रचालन खाते | ५७३.२७ | ९७६.९७ | १५५०.२४ |
| ४५ | पूल खाते | ८.४४ | २०२.०५ | २१०.४९ |
| ४६ | महानगरपालिका मुद्रणालय | ३९.४३ | ४.१० | ४३.५३ |
| ४७ | आरोग्य खाते | ४४४.७५ | ७९.३२ | ५२४.०७ |
| | वैद्यकीय महाविद्यालये | १७०.६८ | २८.९५ | १९९.६३ |
| | प्रमुख रुग्णालये | ४७५.५१ | १३७.९३ | ६१३.४४ |
| | विशेष रुग्णालय | ८७.४८ | १२.९७ | १००.४५ |
| | उपनगरीय रुग्णालये | २८३.९४ | ९१.८२ | ३७५.७६ |
| ४९ | जल प्रचालन खाते | १०२७.८३ | १२८०.१० | २३०७.९३ |
| ५० | पाणी पुरवठा प्रकल्प खाते | २०.४० | १४४१.३८ | १४६१.७८ |
| ५१ | मलनि:सारण प्रचालन खाते | ४८३.९९ | १८१.९५ | ६६५.९४ |
| ५२ | मलनि:सारण प्रकल्प खाते | १८.३८ | २०६.८४ | २२५.२२ |
| ५३ | मुंबई मलनि:सारण प्रकल्प | ११.५३ | २५२.४७ | २६४.०० |
| | इतर खाती | ४०६६.०२ | २०७.१९ | ४२७३.२१ |
| | **एकूण** | **११९७८.२९** | **८२३९.०२** | **२०४१७.३१** |
| | भांडवली लेख्यास अंशदान | ६५१.५१ | | |
| | **एकूण** | **१२८२९.८०** | | |

## परिशिष्ट - पाच


### भांडवली लेखा - अर्थसंकल्पीय अंदाज 'अ' 'ब', 'ई' , 'ग' आणि वृक्ष प्राधिकरण

(रुपये कोटीत)

| अनु.क्र. | तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-११ |
|---|---|---|
| | दिनांक १ एप्रिल रोजीची आरंभीची शिल्लक | १३१.९० |
| | **भांडवली प्राप्ती** | |
| १ | **कर्ज :** | |
| | एक) कर्ज | ३४९८.६२ |
| | **एकूण कर्ज** | ३४९८.६२ |
| २. | अनुदाने | ११४९.७१ |
| ३ | विकास निधी कडून अंशदान | १३८.८७ |
| ४ | जमीन आणि इमारतींची विक्री / अधिमूल्य | ८२.५५ |
| ५ | महसुली लेख्यातून अंशदान | ६५१.५१ |
| ६ | एकूण संचित वर्ताळा | १३३६.०० |
| ७ | खर्चासाठी खालील निधीतून काढावयाची रक्कम | |
| | मालमत्ता पुनर्स्थापना निधी | ३५०.०० |
| | भूमी संपादन आणि विकास निधी | ३००.०० |
| | प्राथमिक शालेय इमारत परिरक्षण निधी | १४१.६० |
| | प्राथमिक शालेय इमारत बांधकाम निधी | ०.२० |
| | मालमत्ता पुनर्स्थापना आणि पुनर्वसन निधी | ४७९.०१ |
| ८ | इतर प्राप्ती | १२२.८५ |
| | एकूण - भांडवली प्राप्ती | ८२५०.९२ |
| | एकूण - उपलब्ध निधी | ८३८२.८२ |
| ९ | भांडवली खर्च | ८२३९.०२ |
| | दिनांक ३१ मार्च रोजीची अखेरची शिल्लक | १४३.८० |


# आलेखीय माहिती

## अर्थसंकल्पीय अंदाजाचे आकारमान ‘अ’, ‘ब’, ‘ई’, ‘ग ’ आणि वृक्षप्राधिकरण





| अनुक्रमांक | | उत्पन्न / प्राप्तीचे स्त्रोत | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-२०११ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|---|
| | | | (रुपये कोटीत) | |
| १ | | महसुली उत्पन्न | १२७८६.६१ | ६३ |
| २ | | कर्जे | ३४९८.६२ | १७ |
| ३ | | अनुदाने | ११४९.७१ | ६ |
| ४ | | विशेष निधीतून काढलेले पैसे | १२७०.८१ | ६ |
| ५ | | विकास निधीतून अंशदान | १३८.८७ | १ |
| ६ | | संचित वर्ताळयातून अंशदान | १३३६.०० | ६ |
| ७ | | इतर प्राप्ती | २०५.४० | १ |
| ८ | | उत्पन्नापेक्षा जादा खर्च (आरंभीच्या शिल्लकीतून भागविला जाईल) | ३१.२९ | ... |
| | | एकूण | २०४१७.३१ | १०० |

## अर्थसंकल्पीय अंदाजाचे आकारमान ‘अ’, ‘ब’, ‘ई’, ‘ग ’ आणि वृक्षप्राधिकरण





| अनुक्रमांक | | खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-२०११ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|---|
| | | | (रुपये कोटीत) | |
| १ | | नागरी पायाभूत सुविधांचे बळकटीकरण | ८०८९.९८ | ४० |
| २ | | सामाजिक पायाभूत सुविधांची आणि सुखसोयींची दर्जोन्नती | ३८७२.६६ | १९ |
| ३ | | स्वच्छता आणि शहर पर्यावरणामध्ये सुधारणा | १६४१.५२ | ८ |
| ४ | | शहराचे सुशोभिकरण आणि पर्यटन स्थळांची निर्मिती | ४०५.०१ | २ |
| ५ | | आपत्कालिन व्यवस्थापन आणि आपत्कालिन पूर्वतयारीमध्ये सुधारणा | ३५२.०५ | २ |
| ६ | | नागरी सेवा आणि सुविधा केंद्राची सुधारणा | १८५.८२ | १ |
| ७ | | संस्थांतर्गत सुधारणा व पुनर्रचना | २८७.५४ | १ |
| ८ | | समाज कल्याण | ३९८.५३ | २ |
| ९ | | महापालिका मालमत्तांची सुधारणा, व्यवस्थापन आणि परिरक्षण | २५६.९३ | १ |
| १० | | सामाईक सेवा आणि संकीर्ण उपक्रम | ४९२७.२७ | २४ |
| | | एकूण | २०४१७.३१ | १०० |

**महसुली उत्पन्न- अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग ' आणि वृक्षप्राधिकरण**





| अनुक्रमांक | | महसुली उत्पन्नाची साधने | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-२०११ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|---|
| | | | (रुपये कोटीत) | |
| १ | | जकात (नक्त) | ४६५०.२१ | ३६ |
| २ | | मालमत्ता कर | २६४७.४९ | २१ |
| ३ | | जल व मलनि:सारण आकार | ७६३.९१ | ६ |
| ४ | | विकास नियोजन खात्याकडून प्राप्ती | १२७८.०० | १० |
| ५ | | शासनाकडून अनुदाने | ४४६.५७ | ३ |
| ६ | | पर्यवेक्षण आकार | ६३७.१५ | ५ |
| ७ | | घनकचरा व्यवस्थापन | ११७.०० | १ |
| ८ | | रस्ते आणि पूल यापासून प्राप्ती | २१९.२३ | २ |
| ९ | | अनुज्ञापन खात्याकडून प्राप्ती | १००.०० | १ |
| १० | | रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालये यापासून प्राप्ती | ७६.७६ | १ |
| ११ | | बाजार व देवनार पशुवधगृहापासून प्राप्ती | ८३.२६ | १ |
| १२ | | इतर प्राप्ती | १७६७.०३ | १३ |
| १३ | | उत्पन्नापेक्षा जादा खर्च ( आरंभीच्या शिलकेतून भागविला जाईल) | ४३.१९ | ... |
| | | एकूण | १२८२९.८० | १०० |

## महसुली खर्च- अर्थसंकल्पीय अंदाज 'अ','ब', 'ई', 'ग ' आणि वृक्षप्राधिकरण





| अनुक्रमांक | महसुली खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-२०११ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | आस्थापना खर्च | ७४७६.४५ | ५८ |
| २ | प्रशासकीय खर्च | ५७६.३२ | ५ |
| ३ | प्रचालन आणि परिरक्षण | २३८४.२४ | १९ |
| ४ | व्याज आणि वित्त आकार | १६३.६४ | १ |
| ५ | कार्यक्रम खर्च | १२५.१६ | १ |
| ६ | महसुली अनुदाने, अंशदाने आणि अर्थसहाय्य | ७४९.०९ | ६ |
| ७ | तरतुदी आणि निर्लेखन | २८०.९४ | २ |
| | राखीव निधीला स्थानांतरण | | |
| ८ | भांडवली लेख्याला स्थानांतरण | ६५१.५१ | ५ |
| ९ | इतर खर्च | २३६.०७ | २ |
| १० | करांचा परतावा | १८६.३८ | १ |
| | एकूण | १२८२९.८० | १०० |

**भांडवली प्राप्ती अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग ' आणि वृक्षप्राधिकरण**





| अनुक्रमांक | | भांडवली प्राप्तीची साधने | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-२०११ (रुपये कोटीत) | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १ | | कर्जे | ३४९८.६२ | ४२ |
| २ | | अनुदाने | ११४९.७१ | १४ |
| ३ | | विकास निधीतून अंशदान | १३८.८७ | २ |
| ४ | | जमिनी व इमारती इ.च्या अधिमूल्यांपासूनचे उत्पन्न | ८२.५५ | १ |
| ५ | | महसुली लेख्यातून अंशदान | ६५१.५१ | ८ |
| ६ | | संचित वर्ताळा | १३३६.०० | १६ |
| ७ | | विशेष निधीतून काढलेले पैसे | १२७०.८१ | १५ |
| ८ | | इतर प्राप्ती | १२२.८५ | २ |
| | | एकूण | ८२५०.९२ | १०० |

## भांडवली खर्च अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब', 'ई', 'ग' आणि वृक्षप्राधिकरण





| अनुक्रमांक | | भांडवली खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-२०११ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|---|
| | | | (रुपये कोटीत) | |
| १ | | रस्ते, पूल व वाहतुक प्रचालन | ११७९.०२ | १४ |
| २ | | पर्जन्य जलवाहिन्या | १०१३.५३ | १२ |
| ३ | | घन कचरा व्यवस्थापन व परिवहन | ३२९.१४ | ४ |
| ४ | | आरोग्य खाते | ४१८.४६ | ५ |
| ५ | | पाणी पुरवठा | २७२१.४७ | ३३ |
| ६ | | मलनि:सारण | ६४१.२६ | ८ |
| ७ | | अग्निशमन दल आणि आपत्कालिन व्यवस्थापन | १९५.७५ | ३ |
| ८ | | माहिती व तंत्रज्ञान खाते | १०१.५९ | १ |
| ९ | | बाजार व देवनार पशुवधगृह | १००.२५ | १ |
| १० | | महानगरपालिका मालमत्तांच्या दुरुस्त्या व गलिच्छ वस्ती सुधारणा (अर्थसंकल्प ब ) | ८१.१८ | १ |
| ११ | | प्राथमिक शाळांच्या इमारतींच्या दुरुस्त्या (अर्थसंकल्प ई) | १६९.२१ | २ |
| १२ | | इतर | १२८८.१६ | १६ |
| १३ | | खर्चापेक्षा जादा प्राप्ती | ११.९० | ... |
| | | एकूण | ८२५०.९२ | १०० |

## महसुली उत्पन्न- अर्थसंकल्पीय अंदाज ‘अ’, ‘ब’ आणि ‘ई’





| अनुक्रमांक | महसुली उत्पन्नाची साधने | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-२०११ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | जकात (नक्त) | ४६५०.२१ | ४७ |
| २ | मालमत्ता कर | १५४०.०० | १६ |
| ३ | शासनाकडून अनुदाने | ४४६.५७ | ४ |
| ४ | विकास नियोजन खात्याकडून प्राप्ती | १२७८.०० | १३ |
| ५ | रस्ते आणि पूल यापासून प्राप्ती | २१९.२३ | २ |
| ६ | अनुज्ञापन खात्याकडून प्राप्ती | १००.०० | १ |
| ७ | घनकचरा व्यवस्थापन | ११७.०० | १ |
| ८ | पर्यवेक्षण आकार | ३००.०० | ३ |
| ९ | रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालये यापासून प्राप्ती | ७६.७६ | १ |
| १० | बाजार व देवनार पशुवधगृहापासून प्राप्ती | ८३.२६ | १ |
| ११ | इतर प्राप्ती | १०५९.१४ | ११ |
| | एकूण | ९८७०.१७ | १०० |

## महसुली खर्च- अर्थसंकल्पीय अंदाज'अ','ब' आणि 'ई'





| अनुक्रमांक | महसुली खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-२०११ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | आस्थापना खर्च | ६५०६.९८ | ६६ |
| २ | प्रशासकीय खर्च | ३९८.१३ | ४ |
| ३ | प्रचालन आणि परिरक्षण | १७२९.४२ | १८ |
| ४ | व्याज आणि वित्त आकार | ७५.९८ | १ |
| ५ | कार्यक्रम खर्च | १२५.१६ | १ |
| ६ | महसुली अनुदाने, अंशदाने आणि अर्थसहाय्य | ७०३.९६ | ७ |
| | राखीव निधीला स्थानांतरण | | |
| ७ | i) भांडवली लेख्याला स्थानांतरण | ... | ... |
| ८ | ii) इतर खर्च | २०.०० | ... |
| ९ | करांचा परतावा | १८६.३८ | २ |
| १० | तरतुदी आणि निर्लेखन | १२३.७३ | १ |
| ११ | वर्षभरातील अंदाजित वर्तावळा | ०.४३ | ... |
| | एकूण | ९८७०.१७ | १०० |

## भांडवली प्राप्ती - अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब' आणि 'ई'





| अनुक्रमांक | | तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-२०११ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|---|
| | | | (रुपये कोटीत) | |
| १ | | अंतर्गत कर्ज | ३०००.०० | ६१ |
| २ | | महसुली लेख्यांकडून अंशदान | ... | ... |
| ३ | | विशेष निधीमधून काढलेले पैसे | ७९१.८० | १६ |
| ४ | | मुं. ना. वा. प्रकल्पाकरिता जागतिक बँकेकडून कर्ज / अनुदान | ३५.०० | १ |
| ५ | | विकास निधीमधून अंशदान | ८८.८८ | २ |
| ६ | | ब्रिमस्टोवॅड कामे//ज.ने.रा.ना.पु.अ. / घ.क.व्य./मिठी नदी प्रकल्पांकरिता अनुदान | ७५७.२५ | १६ |
| ७ | | इतर प्राप्ती | २०५.४० | ४ |
| | | एकूण | ४८७८.३३ | १०० |

## भांडवली खर्च - अर्थसंकल्पीय अंदाज 'अ', 'ब' आणि 'ई'





| अनुक्रमांक | तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-२०११ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | वाहतूक प्रचालन, रस्ते आणि पूल | ११७९.०२ | २४ |
| २ | पर्जन्य जलवाहिन्या | १०१३.५३ | २१ |
| ३ | संगणकीकरण | १०१.५९ | २ |
| ४ | बाजार व पशुवधगृह | १००.२५ | २ |
| ५ | आरोग्य अर्थसंकल्प | ४१८.४६ | ९ |
| ६ | घनकचरा व्यवस्थापन आणि परिवहन | ३२०.९९ | ७ |
| ७ | अग्निशमन सेवा आणि आपत्कालिन व्यवस्थापन | १९५.७५ | ४ |
| ८ | उद्याने | २८६.९० | ६ |
| ९ | इतर (अर्थसंकल्प 'अ') | ९९८.७२ | २० |
| १० | महानगरपालिका मालमत्तांच्या दुरुस्त्या आणि गलिच्छ वस्ती सुधारणा (अर्थसंकल्प ब ) | ८१.१८ | २ |
| ११ | प्राथमिक शाळांच्या इमारतींच्या दुरुस्त्या (अर्थसंकल्प ई ) | १६९.२१ | ३ |
| १२ | खर्चापेक्षा जादा प्राप्ती | १२.७३ | ... |
| | एकूण | ४८७८.३३ | १०० |





(रुपये कोटीत)

| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
| महसुली खर्च | ३३६.३७ | ४१६.५६ | ४००.०५ | ४२३.६९ | ५८१.७२ |
| भांडवली खर्च | ४७०.७७ | ६०५.८८ | ९६४.५९ | ११८८.७३ | ११७९.०२ |





(रुपये कोटीत)

| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
| महसुली खर्च | ६७४.७१ | ८५७.३२ | ८२२.५५ | ११२१.९९ | १५२५.६० |
| भांडवली खर्च | ८१.८९ | ६९.१६ | १०९.४९ | १५९.९५ | ३२०.९९ |





(रुपये कोटीत)

| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
| महसुली खर्च | ६०४.४६ | ६७४.१५ | ७४१.६९ | १०४४.३५ | १४७१.४५ |
| भांडवली खर्च | ७७.३८ | ७५.६२ | १४४.९७ | ३०३.८५ | ४१८.४६ |





(रुपये कोटीत)

| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
| महसुली खर्च | ११७.७१ | ३५१.३९ | २३५.२५ | २२६.४९ | २६८.९६ |
| भांडवली खर्च | ३३१.१६ | २७२.४९ | ६७३.७२ | १०१२.९२ | १०१३.५३ |




(रुपये कोटीत)


| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
| महसुली खर्च | ५७२.१८ | ७३९.७१ | ८८३.८८ | १२४०.१२ | १६२२.७९ |
| भांडवली खर्च | १२.९७ | ३३.५३ | ६३.५४ | ९९.८३ | १६९.२१ |




(रुपये कोटीत)


| तपशील | प्रत्यक्ष आकडे | | | सुधारित अंदाज | अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
| महसुली खर्च | ९३३.४७ | ९१०.३९ | १४६०.१५ | १९५५.६७ | २०३७.१० |
| भांडवली खर्च | ४७१.४५ | ६३९.०९ | १०९७.३५ | २७१९.९६ | ३३७१.५२ |

## महसुली उत्पन्न- अर्थसंकल्प 'ग'





| अनुक्रमांक | महसुली उत्पन्नाची साधने | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-२०११ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | जल आकार | ५०१.५८ | १७ |
| २ | जल कर | ९७.३४ | ३ |
| ३ | जल लाभ कर | ५१९.९२ | १८ |
| ४ | मलनि:सारण आकार | २६२.३३ | ९ |
| ५ | मलनि:सारण कर | १६५.८८ | ६ |
| ६ | मलनि:सारण लाभ कर | ३१०.१८ | ११ |
| ७ | इतर महसूल | १०४१.३८ | ३६ |
| | एकूण | २८९८.६१ | १०० |

## महसुली खर्च - अर्थसंकल्प 'ग'





| अनुक्रमांक | | महसुली खर्चाच्या बाबी | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-२०११ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|---|
| | | | (रुपये कोटीत) | |
| १ | | आस्थापना खर्च | ६८०.७५ | २४ |
| २ | | प्रशासकीय खर्च | १७५.८८ | ६ |
| ३ | | प्रचालन आणि परिरक्षण | ६०४.३१ | २१ |
| ४ | | व्याज आणि वित्त आकार | ८७.६६ | ३ |
| ५ | | महसुली अनुदाने, अंशदाने आणि अर्थसहाय्य | ३२५.७२ | ११ |
| ६ | | तरतुदी आणि निर्लेखन | १५६.७१ | ५ |
| ७ | | पूर्व कालावधीतील बाबी | ६.०७ | ... |
| ८ | | भांडवली लेखेला स्थानांतरण | २१०.०० | ७ |
| ९ | | इतर बाबी | ६५१.५१ | २३ |
| | | एकूण | २८९८.६१ | १०० |

## भांडवली जमा - अर्थसंकल्प 'ग'




| अनुक्रमांक | तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-२०११ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | अंतर्गत निधीमधून | ६५१.५१ | १९ |
| २ | कर्जे | ४९८.६२ | १५ |
| ३ | अंशदान / अनुदान | ८८६.४७ | २६ |
| ४ | संचित वर्ताळा | १३३६.०० | ४० |
| | एकूण | ३३७२.६० | १०० |

## भांडवली खर्च- अर्थसंकल्प 'ग'




| अनुक्रमांक | खातेनिहाय भांडवली खर्च | अर्थसंकल्पीय अंदाज २०१०-२०११ | रुपयातील हिस्सा |
|---|---|---|---|
| | | (रुपये कोटीत) | |
| १ | सामायिक सेवा | ८.७९ | ... |
| २ | जल प्रचालन | १२८०.१० | ३८ |
| ३ | पाणी पुरवठा प्रकल्प | १४४१.३८ | ४३ |
| ४ | मलनि:सारण प्रचालन | १८१.९५ | ५ |
| ५ | मलनि:सारण प्रकल्प | २०६.८३ | ६ |
| ६ | मुंबई मलनि:सारण प्रकल्प | २५२.४७ | ८ |
| ७ | वर्षभरातील अंदाजित वर्ताळा | १.०८ | ... |
| | एकूण | ३३७२.६० | १०० |